# महाभारत



## खंड ३२ : कर्णपर्व २

मराठी अनुवाद :

## श्री. अशोक कोठारे

# महाभारत

## महाभारत खंड बत्तिसावा

## कर्ण पर्व भाग दुसरा

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

# महाभारत

मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.
- हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० सप्टेंबर २०२०**

## अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा बत्तिसावा खंड, कर्ण पर्व भाग दुसरा आपण आता वाचणार अहात.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/2309234323812351236623402381235 0.html

# - कर्ण पर्व दुसरे (सुरू) –

## कर्ण पर्व

### भाग बेचाळीसावा

संजय पुढे सांगतो, कर्ण त्याचे दुःख सांगत असतो. मद्रच्या राजाचे ते बोलणे ऐकल्यावर सल्याला बोलतो, मी वासुदेवाला व अर्जुनाला चांगलाच ओळखतो. कृष्णाचे सारथ्य मला माहीत आहे. तसेंच अर्जुनेचे शौर्यसुद्धा मला ठाऊक आहे. परंतु, ज्यांची खात्री नाही त्याबाबत मी त्या दोघांशी बेडरपणे लढणार आहे. परंतु, मला जो शाप भार्गवाने दिला आहे त्याची फिकीर वाटते. भार्गवाकडून ती अस्त्रं व शस्त्र विद्या संपादन करण्याशाठी मी ब्राह्मणाचे सोंग घेऊन गेलो होतो. त्यावेळी इंद्राने अर्जुनाला फायदा व्हावा म्हणून एका अळीचे रुप घेऊन माझ्या मांडीत शिरला व जेव्हां भार्गव माझ्या मांडीवर झोपण्यासाठी त्यांचे डोके ठेवतात तेव्हां तो त्यांना चावला. त्याशिवाय मला चावला व त्यातून माझ्या रक्ताची धार सुरू झाली. त्यावेळी मी ते सहन करत होतो. ते पाहून माझे गुरू मला बोलले कीं, तुझी सहनशिलता पहाता असे खात्रीने वाटते कीं तू ब्राह्मण निश्चितपणे नाहीस. पुढे ते दरडावून मला विचारतात कीं, मी कोण आहे ते सांगावे. माझा नाईलाज झाला व मी खरे सांगितले कीं मी सुत कुळीन आहे. ते ऐकून त्यांचा क्रोध अनावर झाला. त्याना मला शाप दिला कीं, त्यांनी जे शिकवले ते मी विसरून जाईन जेव्हां माझा अंत काल समीप आला असेल. जेव्हां मला त्या मंत्रांची जास्त आवश्यकता असेल तेव्हांच मी ते मंत्र विसरून जाईन. ब्रह्म त्याच्यात असणार नाही जो ब्राह्मण नाही. असें ते नंतर बोलले. म्हणून जेव्हां मी त्या महान योद्ध्याला भिडेन नेमके तेव्हांच मला माझ्या मंत्रांचा विसर पडणार आहे हे माझ्यासाठी मोठे दुःख आहे. माझ्याकडे अशी आयुध आहेत ज्यांच्या मदतीने मी मोठ्या सैन्याचा चुटकी सरशी नाश करू शकतो. मी त्या अर्जुनाचा नाश करू इच्छित आहे. ज्याला कोणी हरवू शकत नाही. मी त्या कुंतीपुत्राची घोडदौड थांबवणार आहे. माझ्या बाणांने. त्याचे बाण कधीच फुकट जात नाहीत. ते नेमक्या ठिकाणी जातात त्याचाच मला पराभव करावयाचा आहे. आजची लढाई तू पहात रहा. मी त्याचा बरोबरीचा नव्हे त्याच्यापेक्षा जास्त चांगला धनुर्धर आहे ते सिद्ध करणार आहे. तो त्याची दैवी शस्त्र आयुध

घेऊन माझ्याशी लढणार आहे तर मी कांहीं कमी नाही सल्या, ते त्याला व इतर सर्वांना समजणार आहे. माझ्या मंतरलेल्या बाणांनी त्याला घेरणार आहे. त्या बांणांनी मी त्याचे तेज कायमचे विझवणार आहे. मी न डगमगता त्याला सामोरी जाणार आहे. त्याच्या सगळ्या युक्त्या मी फोडून टाकणार आहे माझ्या युक्त्यानी. धनंजय नेहमी सर्वांच्या पुढे असतो त्याला आज मी मागे टाकणार आहे व ते सगळे पहाणार आहेत. सर्वांना पराजित करणार्या सव्यसाचीला मी आज पराजित करणार आहे व त्याचा वध सुद्धा करणार आहे. तो अतिरथ आहे तर मी त्याहून जास्त मोठा अतिरथ आहे ते दाखवून देणार आहे. खांडववनात त्यानें जो पराक्रम केला त्याची फार स्तुती होते त्यामुळें त्याला माज आला आहे. तो मी आज उतरवणार आहे. त्याची चपळाई ख्यातनाम आहे परंतु, त्यापेक्षा जास्त चपळाई माझी आहे ते दाखवून देणार आहे मी आज. त्याचे डोके उडवले कीं सगळ्यांना समजेल कर्ण कोण आहे. तो स्वताला यम समजतो पण त्याचा यम मी कर्ण आहे ते त्याला दाखवून देईन. अरे सल्या, तू मूर्ख आहेस म्हणून तुला ते समजणार नाही. सगळ्या क्षत्रियांच्या सभेत मी त्याला आव्हान दिले होते. माझ्या क्षमाशिलपणाचा जास्तच दुरूपयोग तो पांडव करत आहे पण ते आता चालणार नाही. त्या पाडवांचा तू मामा आहेस म्हणून तू मला खच्ची करण्यासाठी ते सगळे सांगत आहेस हे न कळण्या इतका मी नासमज नाही. माझ्या सहनशक्तीचा तू गैरफायदा घेत आहेस सल्या. तुला मित्र समजण्याची मी चूक केली आहे असे मला आता वाटू लागले आहे. तू दुर्योधनाचा मित्र सांगतोस परंतु, तुझे विचार नेमके त्या विरुद्ध आहेत असे मला दिसत आहे. खरा मित्र वागणार नाही असा तू त्याच्याशी व माझ्याशी वागत आहेस. खरा मित्र त्याच्या सुखात आनंद मानतो परंतु, तुझे वेगळेच दिसते आहे. तू माझ्यामते दुर्योधनाच्या अस्तनीतला निखारा आहेस हे मी समजू लागलो आहे. मी तुला सांगतो कीं, माझ्यात ते सगळे गुण आहेत जे खर्या मित्रात असावे लागतात. ते दुर्योधनाला माहीत आहे. दुर्योधनाचे भले करण्यासाठी, त्याला विजयी करण्यासाठी, व माझ्यासाठी व देवांसाठी मी ते सगळे करणार आहे जे आवश्यक आहे. तेवढ्यासाठी मी वासुदेव आणि अर्जुनाशी लढणार आहे व त्यात त्या दोघांना ठार मारणार आहे. माझ्याकडे त्यासाठी उत्तम सामुग्री सज्ज आहे. जसे एक चिडलेला हत्ती दुसर्या हत्तीला भिडतो तसे आम्ही आज भिडणार आहोत. मी ब्रह्मास्त्र त्याच्यावर टाकणार आहे.

त्याच्यातून तो सुटण्याची शक्यता नाही. परंतु, जर माझ्यारथाची चाक त्या भार्गवाच्या शापानुसार जमिनीने धरली तर मात्र प्रश्न उत्पन्न होणार आहे. सल्या मी तुला सांगतो कीं, मी यमाला भित नाही किंवा वरुणाला भित नाही किंवा कुबेराला भित नाही, तसेंच इंद्रालासुद्धा घाबरत नाही. मी त्या लोकपाल देवतांना घाबरत नाही. माझा माझ्या विजय धनुष्यावर पूर्ण भरवसा आहे. म्हणून मला त्या पार्थाची अजिबात भिती वाटत नाही. आज त्याचा निवाडा होणार आहे कीं, कोण श्रेष्ठ धनुर्धर आहे.

मी तुला सांगतो एक घटना जी झाली जेव्हां मी नेमबाजीची तयारी करत असें. एका ठिकाणी अनेक प्राण्यांची मी शिकार केली त्यात एक ब्राह्मणाचे कोकरू माझ्या हातून मारले गेले. ते माझ्याकडून चुकून मारले गेले होते. परंतु, तो ब्राह्मण मला दोष देत बोलतो, कीं, तुझ्या रथाची चाक जमिनीत अशी फसतील कीं, त्यातून तुझा नाश होईल. त्या शापाच्या आठवणीने मला फार भय वाटते. त्याला शांत करण्यासाठी दुर्योधनाने त्या ब्राह्मणाला हजार गाई दानात दिल्या परंतु, तो शांत झाला नाही. त्याला मी अनेक हत्ती दानात दिले त्याला शांत करण्यासाठी पण तो शांत झाला नाही. त्यानंर मी त्याला अनेक सेवक व बायका दान केल्या परंतु त्याला मी शांत करू शकलो नाही. त्यानंतर मी त्याला चौदाहजार गाई दिल्या पूर्ण काळ्या रंगाच्या व सफेद रंगाचे वासरू असलेल्या परंतु, तो शांत झाला नाही. मी त्याची क्षमा मागितली तेव्हां तो ब्राह्मण बोलला, त्याने भविष्यवाणी केली होती, तो शाप नव्हता. ते खरोखरच धडणार आहे जेव्हां माझा अंत येणार आहे. आणि म्हणून त्याला तो शाप अथवा ती भविष्यवाणी बदलता येणारी नव्हती. तो पुढे मला बोलला कीं, मी त्यापुढे ब्राह्मणाच्या उपजिविकेच्या गोष्टी नष्ट करू नये. ते घडल्यानंतर मी कधी कोणाला रागवत नाही. तू मला कांहीं बोललास तरी मी चिडणार नाही. ह्या सगळ्या गोष्टी मी तुला सांगितल्या कारण मी तुला माझा हितचिंतक समजतो. आता ह्यापुढे मला ताकीद देऊ नकोस.

कर्ण पर्व भाग बेचाळीसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग त्रेचाळीसावा

कर्ण सल्याला ताकीद देतो, संजय पुढे सांगतो, शत्रूंचा नाश करणारा कर्ण सल्याला त्याची लायकी दाखवून ताकीद देतो. त्यानंतर ते पुरेसे झाले नाही म्हणून कीं काय कर्ण त्याला पुन्हा सांगू लागतो, "अरे सल्या, मी तुझ्याशी वाङ्युद्धात सुद्धा हरणार नाही. जरी सगळे देव इंद्रासह आले तरी मी त्यांच्याने पराजित होणार नाही. असा मी कृष्णाला व अर्जुनाला कां घाबरीन"? मी शब्दांच्या युद्धातसुद्धा हार मानणार्यांपैकी नाही. तू दुसर्या कोणाला जा आणि घाबरवं, माझ्यावर नको प्रयोग करू. मला तू पुष्कळ वाईट बोलला आहेस. तुझे मन नीच आहे. हा कर्ण कशानेही घाबरत नाही. सर्व प्रकारचे शौर्य ह्या कर्णात ठासून भरलेले आहे. आपण मित्र आहोत, कौरवांचे साथीदार आहोत व आपल्यात कांहीं प्रेम आहे म्हणून मी सगळे सहन करत होतो. आपला मुख्य उद्देश एकत्र येण्याचा आहे कीं, धृतराष्ट्र ह्या लढाईत जिंकावेत. त्यासाठी आपल्या सर्वांना आपले मतभेद बाजूला ठेवून एकत्रपणे लढावयाचे आहे. म्हणून मी तुझ्या उद्धट बोलण्याकडे दुर्लक्ष करत आलो आहे. म्हणून तू अजून पर्यंत जीवंत आहेस, नाहीतर मी तुझा केव्हाच वध केला असता. मला अपमान सहन करण्याचा सवय नाही युधिष्ठीरासारखी. तुझ्याशिवाय मी हे युद्ध जिंकू शकतो. मित्राचा अपमान करणे, त्याला टोचून बोलणे हे पाप समजले जाते आम्हा सुसंकृत समाजात.

कर्ण पर्व भाग त्रेचाळीसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग चव्वेचाळीसावा

संजय पुढे सांगतो, कर्ण वहीक व मद्रकांना दोष देतो. सल्य त्याला बोलतो, तू तुझे गरळ ओकणे बंद कर, तुला धरून मी माझ्या शत्रूंचा नाश करू शकतो. पुढे संजय सांगतो, सल्याचे ते कर्णाशी मग्रूर बोलणे झाल्यानंतर पुन्हा कर्ण त्याला सांगू लागतो, जे जास्त कटू होते.

कर्ण बोलतो, ऐक माझे बोलणे नीट लक्ष देऊन, ते सभेत त्या ब्राह्मणाने सांगितले ते सांगत आहे, माझ्या पदरचे नाही. त्यात कोणाला दुखवण्याचा माझा उद्देश नाही. एकदा धृतराष्ट्राच्या घरी तो ब्राह्मण आला होता तो त्याचे अनुभव सांगत होता. तो ब्राह्मण विविध देश फिरून आला होता. तो एक विद्वान ब्राह्मण होता. तो वहीकांना आणि मद्रकांना त्यांच्या चाली बद्दल दोष देत होता. तो सांगत होता कीं, शहाण्या माणसाने वहीकांशी संबंध ठेवू नये. कारण ते दुर्गुणी असतात. ते त्या पांच नद्यांच्या खोर्यात रहातात. त्या पांच नद्या आहेत गंगा, सरस्वती, यमुना, कुरुक्षेत्री व सिंधू आणि त्यांच्या उपनद्या अशा आहेत. मी लहान होतो तेव्हां पासून जाणतो की, खाटीकखाना व दारूची बुंदले त्या वहीकांच्या घराच्या पुढच्या भागात असतं. एका गुप्त कारवाईसाठी मला वहीकांच्या बरोबर रहावे लागले होते. त्यामुळे त्यावेळी मला त्यांच्या जीवन पद्धतीचा व विचारसरणीचा चांगला परिचय झाला होता. त्या नगराचे नांव होते शकल ते नदी अपगाच्या किनार्याला होते. तेथे रहाणारे वहीक जर्तीक (जाट) जातीचे होते. त्यांचे रहाणीमान फारच किळसवाणे होते. ते गौड नावांची दारू पीत असतं. ते तळलेली जवस खात असतं. त्यात चवेसाठी गोमांस व ते लसणाच्या चटणीत व आल्यात शिजवत असतं. दुसरे मसाले त्यांना माहीत नव्हते. खाण्यात भाकरी व गोमांस मुख्य असे. भातसुद्धा असें तो त्या स्वतः शिजवत नसतं तो विकत आणला जात होता. भाकर्यासुद्धा विकत आणत होते. घरात फक्त मांस शिजत असें. त्यांच्यात व्रतस्थता, शिस्त अशी नव्हती. कांहीं केले तर ते चालत होते. त्यांच्या महिला दारू पीत असतं. त्या एक वस्त्राचे झगे घालत आणि घराबाहेर नाच गाणी करत हसत

खिदळत होत्या.  त्यात कोणाला कांहीं गैर वाटत नव्हते.  त्यांच्या गाण्यांना साथ देणारी वाद्ये भेसूर आवाज करत होती.  कानाला त्रास होत होता पण त्यांना ते आवडत होते असें दिसत होते.  त्या बायका लैंगिक सुख मनमुरादपणे घेत असतं.  त्यात संयमाची आवश्यकता त्याना वाटत नव्हती.  दारू पिऊन त्या एकमेकींना बोलावत होत्या.  असे पाहिले तर त्या व्यभिचारीणी वाटत होत्या पण ते त्यांचे साधारण वागणे होते.  जे आपल्याकडे निषिद्ध समजले जाते.  त्यांना त्यात कांहीं गैर वागत आहोत असें त्यांना वाटत नव्हते.  त्यांचे वागणे त्याना चुकीचे वाटत नव्हते.  एक वहीक मला सांगत होता कीं,  एक त्यांच्यातील बाई त्याच्यावर खूष आहे व तिचा नवरा लांब कुरुजंगलात गेला आहे तो तिला भेटणार आहे.  असे वागणे आपल्याकडील बाई कधीच करणार नाही व आपला पुरूषसुद्धा त्यात भाग घेणार नाही.  पण वहीकांत ते सामान्य होते.  नवरा नसताना त्या बायका दुसर्या पुरूषास बोलावत असतं व ते पुरूषसुद्धा तिच्याकडे जात असतं.  लैगिक नैतिकता हा विषय त्यांच्यात माहीत नसावा.  त्यानंतर मी (तो ब्राह्मण सांगत आहे)  सतलज नदी ओलांडून व ईरावती पार करून माझ्या देशांत आलो.  तेथे मी माझ्या देशात आलो तेथे माझ्या समाजातील रुंद बांध्याच्या देखण्या बायका पहाण्यासाठी मी आतूर होतो.  त्यांचे अंगा बसते कपडे,  भांगात लाल शिंदूर,  काळेकुट्ट काजळ डोळ्यात अशा लाजणार्या,  मर्यादाशील बायका मला दिसू लागल्या.  त्यांची सुमधूर गाणी व तालबद्ध वाद्यांचे सूर मला ऐकावयाचे होते.  कधी आमचे पोळ्या,  मांसाचे स्वादिष्ट पदार्थ खाणार होतो.  सकस दूध पिणार होतो,  गरम मसाल्यांचा वापर केलेले मांसाचे खाद्य पदार्थ कधी खातो असें मला होत होते.  आमच्या जंगलातील समी,  पिलू,  किराल,  अशा मोठ्या वृक्षांच्या सावलीत बसणार होतो.  तेथील मोठे रुंद रस्ते पहाणार होतो.  आमच्या देशातील लोकांचे रंगीबेरंगी कपडे मला आकर्षित करत होते.  आमच्यात व त्या वहीकांत किती फरक आहे ते मला जाणवत होते.  अशारितीने त्या ब्राह्मणाने वहीकांची माहिती आम्हा सगळ्याना सांगितली होती ती तशीच मी तुला सांगत आहे.  राजा त्याच्या प्रजेच्या पाप पुण्याचा सहावा भागाचा भागिदार असतो असे आपल्या येथे समजतात.  तू वहीकांचा राजा आहेस म्हणजे तू त्यांच्या पापाचा भागिदार आहेस.  पुढे तो ब्राह्मण आणखीन सांगतो ते ऐक सल्या,  त्या शकल

नगरीत जी खूप मोठी होती, तेथे राक्षस लोकांची संख्या फार व तेथील बायका दर पंधराव्या दिवशी काळ्या रात्री ढोलकी वाजवून गाणी गात असतात. मला त्यांच्याकडचे गोमांस व गौड दारू प्यायल्या नंतर गाणे गांवे लागणार होते. वहीक शेळ्या, बकर्या, डुक्करं पाळतात त्याबरोबर गायीसुद्धा असतात व ते चरवण्याचे काम त्यांच्या बायकां करत असतात. त्या बायका परपुरूषांशी ओळख नसतांना स्मित करतात जसे आपल्या बायका कधीच करणार नाहीत. त्यांना पूर्ण स्वातंत्र्य आहे ते आपल्या बायकांना नसते हेंच खरे कारण आहे. त्याशिवाय पुरूष उंट, गाढवं, खेचरं पाळतात. जे मांसाहार करणार नाहीत ते तेथे जगू शकत नाहीत. ते लोक दारू पिऊन गाणी बजावणी करतात त्यांचा नैतिक तोल रहाणे कसे शक्य आहे? दुसर्या ब्राह्मणाने सांगितले कीं, तेथे शतद्रू व विपाशा नदीच्या दोनही बाजूस पिलू झाडाची जंगलं आहेत. त्यांच्या बायकांचे स्तन व नितंब खूप मोठे व रुंद असतात व त्या चालतात तेव्हां ते मादक हलत असतात जे आपल्या कडील सामान्य पुरूषास अस्वस्थ करणारे असते. परंतु, तेथील पुरूषांना त्याचे कांहींच वाटत नाही. कदाचित वहीक पुरूषांची बायकांकडे पहाण्याची दृष्टी स्वच्छ असावी. इरावती, चंद्रभागा, वितस्ता, सिंधू ह्या प्रदेशात रहाणार्या लोकांना आरट्ठ म्हणतात. सल्या तुला ते माहीत असणारच कारण तो तुझ्या राज्याचा भाग आहे. ते आरट्ठ लोक कोणतेही नैतिक बंधन पाळत नाहीत. पाप पुण्याचा विचार करत नाहीत. तेथे शहाण्याने जाऊ नये असे तो ब्राह्मण सांगत होता. देवांच्या पितरांच्या पुजा तेथे करण्याची पद्धत नाही. तेथे रहाणारे ब्राह्मण वेद विसरले आहेत. ते यज्ञ करत नाहीत. तेथे बहुतेक शुद्र वर्णाचे लोक असतात, म्हणून तसे असावे. ते लाकडाच्या भांड्यातून खातात. त्यांची खाणे शिजवण्याची भांडी मातीची असतात. त्यांची मातीची भांडी त्यांचे खाऊन झाल्यावर कुत्री चाटून साफ करतात, त्यानंतर ती तशीच ठेवली जातात व पुन्हा खाण्याच्या वेळी ती तशीच वापरली जातात. ते पाहून त्या ब्राह्मणाला शिसारी आली. स्वच्छतेच्या आपल्या वैदीक लोकांच्या कल्पना त्यांना अवगत नाहीत. त्याचे महत्व त्यांना माहित नाही. दगडाच्या खलबत्त्यात धान्य कुटल्यानंतर ते काढून घेतले कीं कुत्री तो खलबत्ता चाटून साफ करतो अशी रित आहे. पाण्याचा वापर साफ करण्यासाठी त्यांना माहित नाही. वहिक व आरट्ठ लोक उंट, गाढव ह्यांचे दूध

वापरतात. ते त्यापासून दही, पनीर, चीज करतात. ते त्यांच्या खाण्याचा प्रमुख भाग असतात. त्यांच्यात विवाहाशिवाय मुलं होतात, त्यात कांहीं गैर आहे असे त्यांना वाटत नाही. सर्व प्रकारचे खाद्य पदार्थ ते सेवन करतात. त्यात वर्ज कांहीं नसते. जे आवडेल ते खातात. ब्रह्मज्ञाना बद्दल ते अनभिज्ञ आहेत. ते काय आहे ते त्याना सांगूनही समजत नाही. तो ब्राह्मण बोलला त्या युगंधर नगरीत जेथे तो ब्राह्मण गेला होता माणसांना स्वर्ग, पाताल ह्या गोष्टी माहीत नाहीत. अशा ठिकाणी अन्न घेतल्यानंतर मनुष्य स्वर्गात कसा जाणार? तो ब्राह्मण आणखीन एका नगरात गेला होता त्याचे नांव अच्युतस्थल असे होते. तेथे भुतीलय नांवाच्या ठिकाणी त्यांने स्नान केले. तेथे हिमालयातून आलेल्या नद्या प्रथमच सपाट प्रदेशात आलेल्या असतात. शुचिर्भूतता तेथील लोकांना माहीत नाही. तेथे एकाच कुंडात ब्राह्मण व चांडाळ स्नान करताना त्याने पाहिले. ते लोक व्रणभेद मानत नाहीत. म्हणून आपल्या येथील ब्राह्मणांनी तेथे जाऊ नये. आपले लोक तेथे जातात तीर्थक्षेत्री पण तेथील लोकांना त्या तीर्थक्षेत्रांचे महत्व माहित नाही. वहिक पिशाच्चाना पुजतात. असे म्हणतात कीं, त्यांचे पूर्वज पिशाच्च आहेत. दोन पिशाच्च होती, एकाचे नांव वही व दुसर्याचे हिका. त्यांच्या मुळें वहीक नांव त्यांच्या वंशाला मिळाले असे सागतात. ते पिपाशा नदीत रहात होते. असे ब्राह्मण मानतात कीं त्यांना ब्रह्मदेवांनी उत्पन्न केलेले नाही. म्हणून ते कोणताही धर्म पाळत नाहीत मग ते वेद कसे शिकणार?

करशक, महीशक, कलिंग, केरली, करकोट, विरक, अशा इतर लोकांनासुद्धा वेदीक धर्म माहित नाही. म्हणून त्यांच्यापासून दूर रहावे असें तो ब्राह्मण सांगत होता. त्याप्रमाणे राक्षस बायकांचे तसेंच काहींसे असते. त्यांचे नितंब फारच मोठे असतात. जेव्हां तो त्या देशात तीर्थयात्रा करण्याच्या निमित्ताने गेला होता. त्या तीर्थक्षेत्राला आरट्ठ असें म्हणतात. तेथे रहाणारे लोक स्वताला वहिक समजतात. तेथे जे ब्राह्मण आहेत त्यांना वेद समजत नाहीत. ते यज्ञ करू शकत नाहीत. वर्णभेद ते मानत नसल्याने त्यांच्यात कसेही विवाह होतात. शूद्र ब्राह्मण असे सुद्धा सर्रास होताना त्याने पाहिले आहे. अशा मुळे त्याने केलेले अर्ध्य देव घेणार नाही असे तो ब्राह्मण सांगत होता.

प्रस्थला, मद्र, गांधार, आरट्ठ, खासी, वसत, सिंधी, सौवीर हे सुद्धा तसेंच अभद्र असतात असें ते ब्राह्मण सांगत होते. (हे सगळे सध्या पाकिस्तानात आहेत.)
कर्ण पर्व भाग चव्वेचाळीसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग पंचेचाळीसावा

कर्ण पुढे बोलतो, "अहो सल्य, आपल्याला हे सगळे माहित असले पाहिजे. तरीसुद्धा मी त्याबद्दल तुम्हाला सांगणार आहे. जरा लक्ष देऊन ऐका. एकदा एक ब्राह्मण आमच्या घरी अतिथी म्हणून आला होता. आमच्या चालीरिती पाहून त्याला त्या पसंत पडल्या. तो बोलला, कीं, तो हिमालयात बरीच वर्षे राहीला आहे. त्यानंतर तो अनेक देशांत पर्यटनाच्या निमित्ताने गेला होता. तेथे त्या त्या देशांतील चालीरिती त्यांने पाहिल्या आहेत. परंतु, कोठेही लोक दुर्गुणी जास्त असल्याचे त्याला आढळले. वेदाच्या शिकवणूकीप्रमाणे तो खरा धर्म आहे परंतु, अनेक देशांत विविध धर्म त्याने पाहिले. एकदा तो वहीकांच्या (पठाण) देशात गेला होता, तेथे माणूस प्रथम ब्राह्मण होतो व नंतर क्षत्रिय होतो. त्यानंतर वैश्य व नंतर शुद्र होतो. त्यानंतर तो न्हावी होतो. न्हावी झाल्यानंतर तो मनुष्य पुन्हा ब्राह्मण होऊ शकतो. ब्राह्मण झाल्यानंतर तो पुन्हा दास होतो. कुटूंबातील एक मनुष्य ब्राह्मण होतो. परंतु दुर्गुणामुळें तो खालच्या वर्णात जात असतो. गांधार व मद्रकांत सुद्धा जवळपास तसेंच आहे. जगात फिरल्यामुळें मला हे समजले. त्यामुळें पुण्याकडे कल कमी असतो. तुम्हाला हे माहीत आहे कां? आणखीन सांगतो ते ऐक, पुर्वीच्या काळी एक पवित्र स्त्री कांहीं गुंडानी पळवली. ते लोक आरट्ठ होते. तिला त्या लोकांनी भ्रष्ट केले. त्यावर त्या स्त्रीने त्यांना शाप दिला. ती शाप देते कीं, तुम्ही माझे पावित्र्य भ्रष्ट केले आहे जिचा कोणी पती नाही, म्हणून तुमच्या कुळातील बायका सुद्धा भ्रष्ट होतील. तुम्ही नीच लोक अहात. तुमचा कधीच उद्धार होणार नाही व माझ्या शापातून तुमची सुटका होणार नाही. त्यामुळे अरट्ठ लोकांत बहिणाचा मुलगा वारस होतो त्याचा स्वताचा मुलगा वारस होत नाही. कौरवात व पांचालांत सल्वात, मत्स्यात, नैमिषात, कोशलात, कसपौंद्रात, कलिंगात, मगधीत, छेड्डींमध्ये जे सगळे भाग्यवान आहेत, ते सगळे वेदांतील धर्म पाळतात. सगळ्या जगाला माहीत आहे कीं, वेदात जो सांगितला आहे तोंच खरा धर्म आहे. तरीसुद्धा लोक पापं करत असतात. जे पुण्यवान आहेत ते सगळे हे समजतात. परंतु ते मद्रकांच्या बाबत समजता येत नाही. ते हलकट लोक पांच नद्यांच्या प्रदेशात रहातात". ते ऐकल्यावर

सल्य कर्णाला तोंड सांभाळून बोलण्यास सांगतो कारण सल्य त्या प्रदेशातील आहे. कर्ण पुढे बोलतो, "अरे सल्या तू त्या देशाचा राजा आहेस. म्हणून तू तुझ्या लोकांच्या कर्माचा (पुण्याचा व पापाचा) सहाव्या भागाचा मालक असतोस. किंवा तू फक्त पापाचा धनी असशिल कारण तू त्यांना कधीच संरक्षण देत नाहीस. पुढे येणार्या काळात जेव्हां वेदाचा धर्म सगळ्या लोकांत पसरेल, परंतु, भिष्म पांच नद्यांच्या लोकांना नेहमी धिक्कारतात. कारण ते सुधारावयाला तयार नाहीत. अगदी कृतयुगातसुद्धा ब्राह्मण त्या लोकांच्या जीवन पद्धतीबद्दल नाराज होते. ज्या काळात लोक त्यांच्या वर्णाचे कर्तव्य पार पाडत असतं त्याकाळीसुद्धा हे लोक तसे वागत नसतं. अहो सल्य, हे तुला माहीत असेलच. पुन्हा मी आणखीन एक कथा सांगतो, एक राक्षस कल्मपाशपद नांवाचा, पाण्यात पोहतांना सांगतो कीं, जे क्षत्रिय भीक मागून जगतात ते भ्रष्ट क्षत्रिय समजावेत. कारण क्षत्रियांनी भीक द्यावयाची असते मागावयाची नसते. तसेंच जो ब्राह्मण व्रतस्थ जीवन जगत नाही तो भ्रष्ट समजावा. वहीक जगातील सर्वात जास्त फालतू लोक समजावेत, मद्र बायका भ्रष्ट समजाव्यात कारण त्याना इमानदारी माहीत नसते. ते बोलत असतांना तो राक्षस पाण्यात बुडू लागतो तेव्हां त्याला एक राजा वाचवतो. राक्षसाच्या प्रश्नांची उत्तर तो राजा देतो, ती अशी, म्लेच्छ सगळ्या माणसांत जास्त घाणेरडे लोक आहेत. त्यातील तेली जास्त घाणेरडा असतो. तेलीतील हिजडा जास्त घाणेरडा असतो. जे क्षत्रियांकडून यज्ञ करून घेतात ते त्यांहूनही जास्त घाणेरडे समजावेत. पांचाल वेदांचे पालन करतात, कौरव सुद्धा तसे करतात, मत्स्य सुरसेन यज्ञ करतात. पूर्वेकडील लोक शुद्रांचे नियम पाळतात. दक्षिणी भ्रष्ट झाले आहेत, वहीक चोर आहेत, सौराष्ट्री अक्करमाषे असतात, कृतघ्न, दारुडे, व्यभिचारी, गुरूच्या पत्नीबरोबर झोपणारा, उद्धट, गाई मारणारा, रात्री घराबाहेर विनाकारण भटकणारा, दुसर्यांचे दागिने वापरणारा, अशांच्या पापाचे काय बोलावे? तसे करणार्या अरट्टांचा मी धिक्कार करतो. जे त्या पांच नद्यांच्या प्रदेशात रहातात. पांचाल, कौरव, नैमिषी, मत्स्य. हे सगळे वेदाचा धर्म जाणतात व त्याचे पालनसुद्धा करतात. उत्तरेकडील, अंगचे, मगधी त्यांना समजत नाही तरी अंधपणे यज्ञाधी विधी करत असतात. अग्नीचे देव पूर्वेकडे पुजले जातात, दक्षिणेकडील पितराची पुजा करतात. जे यमाचे स्थान आहे. पश्चिमेवर वरुणाचे साम्राज्य आहे. उत्तरेवर सोमाचे राज्य आहे. तेथे

ब्राह्मणसुद्धा असतात. तरी राक्षस हिमालयाचे संरक्षण करत असतात. गुह्यक (शिवाची पुजा करणारे स्कंधाचे अनुयायी) गंधमादन सांभाळतात. निसंशय विष्णू सगळ्या चराचरांचे संरक्षण करत असतो. त्यात वहीकांना कोणा वाली नाही! मगधी त्यांच्या खूणांनी समजले जातात, कोसल त्यांच्या दिसण्याने समजले जातात, कुरु आणि पांचाल त्यांच्या बोलीने ओळखले जातात, सल्वाना समजणे अवघड असते जोवर ते सगळे बोलत नाहीत. पहाडी लोक तसेंच असतात. यवनी अरे राजा, सूज्ञ असतात, सुर सुद्धा तसेंच असतात. म्लेच्छ त्यांच्या तर्हेवाईक वागण्याने समजतात. मद्रकी त्याहून वेगळे असतात. अरे सल्या, तू मला कांहीं सांगू नकोस. मद्रकी लोक सर्वात जास्त गलिच्छ असतात. म्हणून त्यांच्या बायकांना सगळ्यात खराब समजले जाते. ते दारू पितात, गुरूच्या बायकोबरोबर झोपतात, गर्भपात करतात, चोर्या करतात, अशा अरङ्खांचा मी धिक्कार करतो. गुपचुप बस मला प्रत्यूत्तर देऊ नकोस". कर्ण बोलत होता "नाहीतर मी त्या अर्जुना व कृष्णा आधी तुला मारीन".

ते सगळे शांतपणे ऐकल्यानंतर सल्य बोलू लागतो, "अरे कर्णा, तुझ्या देशांचे लोक त्यांच्या मुलाबाळांना सोडून जातात. त्याचा विसर पडलेला दिसतो तुला! भिष्म काय बोलत होते अतिरथी व रथीं बद्दल ते सांगतो, रागावून माझ्याकडे पाहू नकोस कारण त्याचा कांहीं परिणाम माझ्यावर होणारा नाही. ब्राह्मण सगळीकडे असतात. तसेंच क्षत्रियसुद्धा सगळीकडे असतात. तसेंच वैश्य आणि शुद्रांचे आहे. अरे कर्णा, पवित्र बायकासुद्धा सगळीकडे असतात. इतरांच्या वैगुण्यावर बोट ठेवण्याचा विकृत आनंद घेणारेसुद्धा सगळीकडे असतात, जसा तू आहेस. विषयी माणसेसुद्धा सगळ्या लोकांत असतात. दुसर्यांचे दोष सांगावयाला सोपे असते परंतु, स्वताचे पहाण्याचे धैर्य फार थोड्यांमध्ये असते. सगळ्या देशांचे राजे त्यांच्या देशाचे धर्म सांभाळत असतात. त्यात कांहीं नवल नाही. पापी व पुण्यवान माणसे सुद्धा सर्वत्र आढळतात. कित्येक लोकांत देवाहूनही श्रेष्ठ माणसे असतात".

ते त्यांचे बोलणे होत असतांना दुर्योधन तेथे पाहोचतो व त्यांना अशा गोष्टी न करण्याची विनंती करतो. कर्णाला थोडे रागावून व सल्याला हात जोडून युद्धाकडे लक्ष देण्यास सांगतो. ते झाल्यावर ते दोघे गालातल्या गालात हसतात. त्यानंतर कर्ण सल्याला रथ अर्जुनाकडे नेण्यास सांगतो. कर्ण पर्व भाग पंचेचाळीसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग सेहेचाळीसावा

संजय पुढे सांगतो, धृष्टद्युम्नाने केलेली पांडवांच्या सैन्याची रचना पाहिल्या नंतर कर्ण मोठी गर्जना करतो. त्याबरोबर त्याचे सैन्य उत्तेजित झालेले दिसते. तो आता त्याची व्युहरचना करू लागतो. जसा इंद्राने असुरांचा विध्वंस केला होता प्राचीन काळी तसा कर्णाने पांडवांच्या सैन्याचा केला होता. कर्णाने त्याच्या रचनेत युधिष्ठीराला त्याच्या उजव्या बाजूस राहील असें पाहिले होते.

धृतराष्ट्र बोलतात, "अरे संजया, कर्णाचे मुलगे त्यांचे सैन्य पांडवांच्या विरोधात ठेवतात कां? म्हणजे धृष्टद्यम्न, भिम आणि इतर योद्धांच्या विरोधात ठेवतात कां? कोणते योद्धे कोठे योजलेले होते ते मला सांग. पांडवांच्या व्युहाची सुद्धा मला माहिती सांग. ते युद्ध कसे सुरू झाले तेसुद्धा सांग. जेव्हां कर्ण युधिष्ठीराच्या कडे जात होता तेव्हां अर्जुन कोठे होता? खांडव वनातील सगळ्यांना ठार मारणार्या अर्जुनाशी कोण लढणार होते"?

संजय सांगू लागतो, आता ऐका पुढे काय झाले. व्युहरचना केल्यानंतर दोनही बाजूंचे लढण्यास सज्ज होतात. कौरवांच्या बाजूने कृप, कृतवर्मन, मगधचा राजा आपापल्या जागा उजव्या बाजूच्या घेतात. शकूनी त्यात उलूकाबरोबर असतो. त्यांच्या बरोबर गांधारांचे योद्धे असतात. त्यांचे रुप पिशाच्चांसारखे होते. ते कौरवांच्या सैन्याला संरक्षण देणार असतात. चौतीस हजार संसप्तक त्यात होते. त्यांचे नेतृत्व दुर्योधन करत होता. कृष्ण व अर्जुन ह्यांना मारणे एवढाच एक उद्देश त्यांचा होता. मध्य भागी कर्ण होता. त्याच्या गळ्यात माळा होत्या. त्याच्या बाजूस त्याचे मुलगे त्याचे संरक्षण करण्यासाठी होते. महाशक्तीमान दुःशासन एका मोठ्या हत्तीच्या मानेवर बसला होता. त्याच्या भोवती त्याचे बंधू त्याच्या संरक्षणार्थ होते. त्याशिवाय मद्रक केकया ह्यांचे संरक्षण त्याला होते. अश्वत्थामा व इतर योद्धे त्यांच्या फौजानिशी तयार होते. त्याबरोबर म्लेच्छ सैन्य होते. कुर्हाडी व तलवारी घेऊन पायदल तयार होते. ते हत्तीला संरक्षण देण्यासाठी होते. त्याशिवाय हत्तीदल, घोडदल रथदल असे सगळे मोठे विलक्षण सुंदर दिसत होते. वृहस्पतीच्या युद्ध शास्त्रानुसार ती रचना केलेली होती. लढण्यासाठी सदैव सज्ज अशा

अनेक योद्ध्यांच्या पलटणी एका मागोमाग एक अशा उभ्या होत्या. राजा युधिष्ठीराला पाहून धनंजयाला बोलतो, "कर्णाने केलेला व्युह पाहीलास कां? त्या अवाढव्य सैन्याचा आपल्याला मुकाबला करावयाचा आहे". ते ऐकल्यावर अर्जुन त्याला बोलतो, "जसे तू सांगशिल तसेच होईल. त्या सगळ्या सैन्याचा नाश मी करणार आहे तुझ्या आज्ञेने.

युधिष्ठीर त्यावर बोलतो, "ह्या व्यवस्थेत तू कर्णावर जा व भिम दुर्योधनावर जाईल ते चांगले होईल. नकूल वृषसेनावर सहदेव शकूनीवर सतनिक दुःशासनावर आणि सत्यकी कृतवर्मनावर जाणार अहात. पांड्या अश्वत्थामावर जाईल. मी कृपांशी लढणार आहे. द्रौपदीची मुलं व शिखंडी इतर कौरवांवर जातील. बाकीचे आपले योद्धे इतर सगळ्या शत्रूशी लढतील.

संजय पुढे सांगतो, अशाप्रकारे युधिष्ठीर त्याची योजना सांगतो. धनंजय बोलतो, "तसेंच होईल". त्याप्रमाणे पांडवांच्या सैन्याची विभागणी होते. तो स्वतः त्यांच्या सैन्याच्या पुढे जातो. त्याच्या रथाचे घोडे साक्षात अग्नी होते. ज्यांची उत्पत्ती साक्षात ब्रह्मामधून झाली होती. त्या रथामधून प्राचीन काळी ब्रह्म व इशा प्रवास करत होते असा तो अर्जुनाचा रथ होता. त्या रथातून वरुण व इंद्र जात असतं, त्यातून आता कृष्ण व पार्थ जात होते. त्या रथातून कृष्ण व अर्जुन येत असलेले सल्य पहातो व कर्णाला बोलतो, "ते पहा कृष्ण व पार्थ त्यांच्या दैवी रथातून येत आहेत. तू त्याच्या बद्दल नेहमी विचार करत असतोस. त्या रथाचा आवाज सांगतो कीं, वासुदेव आणि धनंजय येत आहेत. अर्जुनाच्या रथाने मातीत वळ उठत आहेत. आणि माती हवेत उडत आहे. ती धूळ दोनही सैन्यांच्या अंगावर पडत आहे. ते पहा मांसाहारी प्राणी आपले मांस खाण्यासाठी आपल्या मरणाची वाट पहात आहेत. अरे कर्णा, पहा तो केतू सूर्याला ग्रासत आहे. ते सगळे प्राणी आकाशात सूर्याकडे पहात आहेत. पहा तुझा झेंडासुद्धा थरथरत आहे ही कशाची लक्षणं आहेत? तुझे घोडेसुद्धा कांपत आहेत. ह्याचा अर्थ मोठ्या प्रमाणात नरसंहार होणार आहे. शंखनाद मोठ्याने होत आहे चहूबाजूने ढोलकी व मृदूंग वाजत आहेत. असंख्य रथांचे आवाज ऐकू येत आहेत. अरे कर्णा, बाणांच्या सूं, सूं आवाजाने वातावरण भरलेले आहे. धनुष्यांचे टणत्कार होत आहेत. जोराने वहाणार्या वार्यामुळें रथांवरील झेंडे फडफडत आहेत. ते पांचाल पहा कसे देखणे दिसत आहेत. अरे कर्णा, कुंन्तीचा मुलगा त्याच्या रथावरील कपीमुद्रेमुळे विध्वंसक

झाला आहे. तो सगळ्यांचा नाश करण्यासाठी आला आहे. कृष्णाचे चक्र, गदा आणि सारंग धनुष्य त्याच्या बरोबर आहेत. कृष्णाच्या गळ्यात कौस्तुभ आहे ह्याचा अर्थ तेंच जिंकणार हे निश्चित. त्याबरोबर सव्यसाची त्याचे गांडीव घेऊन येत आहे. तो सगळे त्याचे शत्रू मारणार आहे. तेथे रणांगणात पहा सगळीकडे माणसांची मुंडकी पडलेली दिसत आहेत. कित्येकांचे चेहरे किती देखणे आहेत पण ते आता यमाकडे गेले आहेत. त्यांच्या अंगाला लावलेल्या चंदनाची सुगंध सगळीकडे पसरलेला आहे. त्यांची आयुध इतस्ततः पसरून पडली आहेत. मेलेले घोडे हत्ती पडलेले आहेत. त्यांच्या जीभा बाहेर आलेल्या आहेत. ते मेलेले हत्ती पहा त्यांच्या शरीरात अनेक बाण घुसलेले दिसत आहेत. अरे कर्णा पहा अर्जुनाला येतांना पाहून आपले योद्धे अस्वस्थ झालेले दिसत आहेत. मित्रांच्या घेरात असलेला अर्जुन आपल्याला दिसत नाही. जसे सूर्य ढगात गेला कीं दिसत नाही. फक्त त्याचा झेंडा दिसत आहे. कर्णा तू आज त्या पार्थाला पहाणार आहेस जेव्हां तो त्याच्या शत्रूंचा नाश करत असेल. ज्याचा सारथी कृष्ण आहे त्याचा वध करण्याचे तू योजलेले आहे. ज्याचे धनुष्य आहे गांडीव. ज्यांने संसप्तकांचा नाश केला आहे एका हाताने. असा अर्जुन तुझ्याशी लढणार आहे म्हणून तू सावध रहावे". असें तो मद्रचा राजा कर्णाला सावध करण्यासाठी सांगत असतो. कर्ण त्याला उत्तर देतो, "पहा रागावलेले संसप्तक अर्जुनावर चालून जात आहेत. त्या रणधुमाळीत तो केठे दिसत नाही. कारण तो आज संपणार आहे".

सल्य त्यावर त्याला बोलतो, अरे वरुणाला कोणी पाण्याने मारू शकते कां? अग्नी तेलाने विझेल कां? कोण वार्याला पकडेल कां? कोणी समुद्र पिऊन टाकेल कां? अरे अर्जुन कोणाकडून ही हरणारा नाही. म्हणून मी सांगतो पार्थाला मारण्याचे स्वप्न तू सोडून दे दुसरे कांही उद्दिष्ट ठेव कारण त्याला मारणे शक्य नाही. तो कुंत्तीपुत्र भिम पहा . तो कधीच थकत नाही कारण त्याला तसा आशिर्वाद वायूदेवांने दिला आहे. त्यासा जखमांचा त्रास होत नाही. युधिष्ठीर पहा अरे कर्णा तो पावित्र्याची पुतळी आहे. त्याच्या दोन बाजूना आहेत दोन अश्विनी. तेसुद्धा न हरणारे आहेत. ते द्रौपदीची मुलं पहा, त्यांच्यात पांचालांचे रक्त आहे. ते अर्जुनासारखेच आहेत. द्रुपदाचा पुत्र धृष्यद्युम्न पहा, त्याच्या शौर्याचे काय सांगावे. सतवतांचा सत्यकी पहा. तो तर दुसरा इंद्रच आहे". सल्य व कर्ण अशाप्रकारे संभाषण

करत असतांना दोन पक्षांची सैन्य एकमेकांत लढण्यासाठी घुसतात जसे गंगा व यमुना संगमात एकमेकांत घुसतात.
कर्ण पर्व भाग सेहेचाळासावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग सत्तेचाळीसावा

धृतराष्ट्र बोलतात, "दोन पक्ष लढण्यासाठी सज्ज झाल्यावर मला सांग संजया, पांर्थाने संसप्तकांचा कसा मुकाबला केला"?

संजय पुढे सांगतो, कौरवांचे अफाट सैन्य पांडवांच्या सैन्यला घेरत आहे हे अर्जुनाने पाहिले, त्याने धृष्टद्युम्नाच्या नेतृत्वाखाली पांडवांची सैन्य व्युहरचना तयार केली. धृष्टद्युम्न त्याच्या पेहेरावात दुसरा सूर्य असा दिसत होता. ते सगळे त्यांच्या मामाच्या मार्गदर्शनात पुढे जात होते. ते संसप्तकांना पहातात. त्याना पाहिल्यावर अर्जुनाचा राग अनावर होतो. तो त्याचे गांडीव काढतो. संसप्तक अर्जुनाला ठार मारण्यासाठी त्याच्यावर धावून जातात. त्यांचे हत्ती, घोडे सगळे त्याच्या भोवती जमा होऊ लागतात. तो संघर्ष आगळा वेगळा होता. तलवारी, चक्रायुध (कृष्णाच्या सुदर्शन चक्रासारखे आयुध), कुर्हाडी अशी आयुध त्यांच्याकडे होती. अर्जुनाने पूर्वी निवातकवच असुरांशी युद्ध केले होते त्याची आठवण होत होती. त्यांची संख्या मोजता येत नव्हती. ते मोठ्याने गर्जना करत होते. परंतु, अर्जुनाने त्या सगळ्या घेराव घालणार्या योद्ध्यांना रुद्राप्रमाणे नष्ट केले. त्याच वेळी कौरवांचे पांचाल, छेड्डी, श्रींजय ह्यांच्या बरोबर युद्ध होत होते. त्यात कृपाचार्य प्रमुख होते. त्यांच्यासह कृतवर्मन होता. शकूनी, मदत करत होता. त्याचे गांधार सैन्य त्यात भाग घेऊन होते. मोठमोठ्याने ओरडत ते पांडवांवर चालून जात होते. पांडवांच्या रथांचा चुराडा करत ते पुढे जात होते. ते कोसल, मत्स्य, कुरुष, कौकेया आणि सुरसेना मोठ्या ताकदीने लढत होते. जीवन आणि पाप प्रसिद्धी, स्वर्ग आणि पुण्याचा मार्ग देत होते. त्या लढणार्यात क्षत्रिय, वैश्य व शुद्र असे सगळे लढत होते. त्यावेळी कुरु सेनेचा दुर्योघन त्याच्या भावंडाबरोबर कर्णाला संरक्षण देत होता. त्यात सल्याची सेना होती. त्याच्या मंतरलेल्या आयुधानी तो युधिष्ठीराचे सैन्य मारत जात होता. शेकडो सैनिक मरत होते. ते करतांना कर्णाला फार आनंद होत होता. जसे देव व दानवांचे युद्ध होत आहे असें वाटत होते. कर्ण पर्व भाग सत्तेचाळीसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग अठ्ठेचाळीसावा

धृतराष्ट्र बोलतो, कर्णाने पांडवांच्या फौजांचा नाश केल्यानंतर तो युधिष्ठीराला मारण्यासाठी पुढे जातो, त्याला पांडवांपैकी कोण विरोध करतात ते मला सांग, अरे संजया.

संजय पुढे सांगतो, धृष्टद्युम्न पांडवांचे नेतृत्व करत आहे ते पाहून कर्ण त्याच्याकडे जातो. युद्धनाद सुरू होतात. मोठी ढोलकी वाजवली जाऊ लागतात. त्या ध्वनीने सगळे आसमंत दणाणून निघते. त्या दणक्यांने कित्येक कमजोर मरून पडले. कर्णाने प्रभाद्रकांचे सत्तर योद्धे त्यात मारले. छेड्डी व पांचालांचे कित्येक तो मारतो. कर्ण ते करत असतांना बेडर पांचाल त्याच्या रथाला वेढा देतात. त्या लढाईत कर्ण पांच मोठे योद्धे पांचालांचे मारतो. त्यात भानुदेव, चित्रसेना, सेनाविंदू, तपन, शुरसेना असे होते. पांचालांचे मोठे नुकसान झाले होते. कर्णाचे दोन संरक्षक जे त्याचे पुत्र होते ज्यांची नांवे होती, शुशेन व सत्यसेना पांचालांशी लढू लागले. कर्णाचा मोठा मुलगा वृषसेन कर्णाचे पुढून संरक्षण करत होता. धृष्टद्युम्नचे नेतृत्वात सत्यकी, द्रौपदीची पांच मुलं, भिम स्वतः. जनमेजय, शिखंडी व त्यांच्या बरोबर छेड्डीचे सैनिक कैकेया, प्रभद्रक, पांचाल, नकूल सहदेव, मत्स्य, कर्णावर चालून जातात. कर्णाला वाचवण्यासाठी त्या हल्ल्याला तोंड देतात. शुशेन भिमाचे धनुष्य तोडतो. भिमाला जखमी करतो. मोठ्याने गर्जना करतो. भिम नवीन धनुष्य घेतो, शुशेनाला जखमी करतो. त्यानंतर भिम भानुदेवाला मारतो. त्याचे घोडे, सारथी असे सगळे मारून टाकतो. कर्णाच्या मुलाचा वध केल्यानंतर भिम कौरवांच्या सैन्याचा नाश करण्यास सुरूवात करतो. त्यानंतर भिम कृप व कृतवर्मनाचे धनुष्य तोडतो. दुःशासनावर मारा करतो. शकूनीवर सहा बाण मारतो. उलूक व पतत्री (शकूनीचा बंधू) त्यांचे रथ मोडून टाकतो. त्यानंतर भिम शुशेनाला आव्हान देतो. बोलतो, "आता तू मेलास". भिम त्याला मारण्यासाठी बाण लावतो पण कर्ण ते बाण उडवतो. कर्ण त्यानंतर भिमावर बाणांचा मारा करू लागतो. भिम नवीन धनुष्य घेतो व शुशेनावर नेम धरतो. परंतु, कर्ण तो

उडवून देतो. शुशेन नकूलावर नेम धरतो. नकूल त्याच्यावर बाणांचा मारा करत रहातो. शुशेन नकूलावर बाणांचा मारा करू लागतो. नकूल शुशेनाच्या सारथ्याला मारतो. शुशेन चिडलेला नकूल व सहदेवांवर मारा करतो. सत्यकी वृषसेनाचा सारथी मारतो. वृषसेनाचे धनुष्य तोडतो. त्याचा झेंडा पाडतो. त्यानंतर वृषसेनाला छातीत बाण मारून इजा करतो. त्यामुळे वृषसेन बेशुद्ध होतो. त्याच्या रथात पडून रहातो. परंतु, चटकन उठतो. त्याची तलवार घेऊन युयुधनाला मारण्यासाठी त्याच्यावर धावतो. युयुधन उलट त्याच्यावर वार करतो. दुःशासन ते पहातो कीं कर्णाचा मुलगा अडचणीत आहे. तो त्याला त्याच्या गाडीत घेतो. दुसर्या रथात तो चढतो व तेथून सत्यकीवर बाणांचा मारा करू लागतो. त्यांची लढाई होत असते. वृषसेन पुन्हा कर्णास संरक्षण देण्याचे काम करू लागतो. सत्यकी दुःशासनाचा रथ तोडून टाकतो. दुःशासन बेसहारा होतो. परंतु, तो दुसर्या सज्ज रथात चढतो व त्याचे लढणे चालू ठेवतो. धृष्टद्युम्न कर्णावर बाण मारतो. कर्णावर इतर पांडवांचेसुद्धा अनेक बाण मारत असतात. अशारितीने पांडवांचे कर्णावर मोठा हल्ला करत असतात. कर्ण त्या सगळ्या पांडवांच्या प्रमुख योद्ध्यावर बाणांचा मारा करून त्यांना जेरीस आणत असतो. त्यावरून त्याचे युद्धकौशल्य स्पष्ट दिसत होते. त्याच्या बाणांनी सगळे आसमंत भरलेले होते. कर्ण त्याच्या रथात उड्या मारतं, नांचत बाण मारत होता. त्याच्या नांचण्यामुळें त्याला मारणे सोपे नव्हते. तो त्याच्या प्रतिस्पर्धांचे झेंडे पाडत होता. त्याशिवाय सारथी मारत होता. त्याच्या सततच्या बाणांच्या वर्षावामुळे त्याला पांडवांच्या फौजांतून युधिष्ठीरा पर्यंत जाणे शक्य झाले होते. छेड्डींच्या तीस योद्ध्यांच्या जवळ गेल्यावर तो त्याना मारतो व नंतर युधिष्ठीरा जवळ पोहोचतो. सत्यकी व शिखंडी त्यांच्या राजाला वाचवण्यासाठी कर्णाच्या रथाला वेढा देतात. त्यावेळी रणवाद्ये पुन्हा वाजू लागतात. त्यांचा आवाज गगनाला भिडत असतो. पुन्हा कौरव आणि पांडव युद्ध रंगात येते. कौरवांचे नेतृत्व कर्णाकडे होते व पांडवांचे युधिष्ठीराकडे होते.

कर्ण पर्व भाग अठ्ठेचाळीसावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग एकोणपन्नासावा

संजय पुढे सांगतो, पांडवांच्या फौजांना पार करत कर्ण युधिष्ठीरापर्यंत जातो. ते करतांना तो अनेक शस्त्रं व अस्त्रांचा परामर्ष घेत असतो. ते करत असतांना तो अनेकांची मुडकी उडवत असतो. कित्येक त्याच्या भयाने रणांगणातून पळून जातात. द्रविड, अंधक, निशाद पायदलाचे सत्यकीच्या नेतृत्वाखाली कर्णावर चालून जातात. कर्णाच्या माराने त्यांचे सर्वस्व नष्ट झाल्यामुळें ते हार मानतात. कित्येक मरून जातात. कर्णाचा जोर विलक्षण होता. त्या सगळ्यांना पराभूत केल्यानंतर कर्ण पुन्हा युधिष्ठीराकडे त्याचा मोर्चा वळवतो. परंतु, त्याला सत्यकी व इतर योद्ध्याचा विरोध होतो व तो युधिष्ठीरापर्यंत जाऊ शकत नाही. युधिष्ठीर कर्णाला बोलतो जो फक्त थोड्या अंतरावर अडवलेला होता, "अरे कर्णा, कर्णा, अरे दूरदृष्टी नसलेल्या सुता, तू नेहमी पार्थाला आव्हान देत असतोस, दुर्योधनाच्या नादी लागून तू आम्हा पांडवांचा द्वेष करत असतोस, तुझ्या सगळ्या द्वेषाने भरलेल्या सामर्थ्याची आता परीक्षा होणार आहे. मी आज युद्धात तुझी ती मनीषा पूर्ण करणार आहे". असे बोलून तो त्याला दहा बाण मारतो. त्यानंतर कर्ण त्याचे बाण मारतो. त्या द्वंद्वात युधिष्ठीर संतापाने कर्णाचा अंत करण्याच्या उद्देशाने आणखीन कांही बाण मारतो.

त्या बाणांने कर्णाच्या डाव्या खांद्याला जखम होते. त्या आघाताने कर्ण खाली कोसळतो. त्याच्या हातातून त्याचे धनुष्य सुद्धा पडते. तो बेहोष होतो. ते पाहून कौरवांचे सैनिक मोठा गोंधळ करतात. त्याना वाटते कर्ण मेला. पांडव त्याने खूष होऊन जोरा जोरानो विजयाच्या गर्जना करू लागतात. परंतु, तो कर्ण लवकरच शुद्धीवर येतो. युधिष्ठीरीचा वध करण्याचे ठरवतो. त्याचे विजया धनुष्य काढतो, आणि पांचालांचे दोन युवराज चंद्रदेव व दंडधर मारून टाकतो. जे युधिष्ठीराचे संरक्षण करत होते. युधिष्ठीर कर्णाला तीस बाण मारतो. कर्ण युधिष्ठीराला हसतो व त्याच्या अंगावर बाण मारतो. त्यानंतर तो शुसेन व सत्यसेन ह्यांना जखमी करतो. कर्ण मोठ्याने गर्जना करतो. त्यानंतर तो पांडवांच्या सैन्याचा संहार करू लागतो. सत्यकी, चेकीतन, युयुत्सू, शिखंडी, द्रौपदीची मुलं, प्रभाद्रक, नकूल, सहदेव, भिमसेन, शिशुपाल, कुरुष, मत्स्य, सुरस, कैकेया, कोसल, काशीस, असे

सगळे योद्धे कर्ण व वृषसेनावर चालून जातात. पांचाल युवराज जनमेजय कर्णावर अनेक बाण मारत असतो. पांडवांचे योद्धे त्यांची विविध शस्त्रं घेऊन कर्णावर स्वारी करतात. त्यामुळें कर्णाला ब्रह्मास्त्र काढावे लागते. त्याच्या जोराने पांडवांचे सैन्य जळले जात होते. त्यानंतर कर्ण गमतीने हसावे तसें हसत युधिष्ठीराचे धनुष्य तोडतो. त्यानंतर तो युधिष्ठीराचे चिलखत फाडून टाकतो. रक्ताने भरलेला युधिष्ठीर कर्णावर एक शलाक जो लोखंडाचा होता, फेकतो. परंतु, कर्ण ते शलाक तोडून टाकतो. युधिष्ठीर कर्णावर तलवारीने वार करतो व त्याला जखमी करतो. कर्णाच्या अंगातून भळभळा रक्त वाहू लागते. त्या अवस्थेत कर्ण पांडवावर बाणांचा मारा करत असतो. तो युधिष्ठीराचे बाणांचे भाते तोडून टाकतो. त्यानंतर युधिष्ठीर रथात बसून पळून जातो. त्याचे सहाय्यक सारथी मारले गेले होते. तो खूप नाराज झालेला दिसत होता. कर्णाला त्याच्या आईचे शब्द आठवतात, कीं तो अर्जुन सोडून कोणा इतर पांडवांना मारणार नाही. त्यावेळी सल्य त्याला सांगतो कीं, "अरे कर्णा, ह्याला असे कोंडीत पकडून धरू नकोस. जर त्याने शाप दिला तर आपले भस्म होईल. त्यावेळी कुत्सितपणे हसत कर्ण युधिष्ठीराला उद्देशून बोलतो, "अरे उच्चकुलिन क्षत्रिया, असा रणभूमी तू कसा सोडून जात आहेस? उच्चकुलिन क्षत्रिय असें घाबरून पळून जात नाहीत. मला वाटते तू क्षत्रियांच्या कर्तव्याबद्दल अनभिज्ञ आहेस. तू ब्राह्मणांत राहून वेद शिकलास, यज्ञ करत आहेस, तू लढण्याच्या कामात शून्य आहेस. पुन्हा लढण्याच्या कामात येऊ नकोस. ते तुझे काम नाही, तुझ्या तंबूत जा आणि परत येऊ नकोस. खर्या योद्ध्यांना आव्हान देण्याच्या भरीस पडू नकोस. घरी जा नाहीतर त्या भिम, अर्जुन आणि कृष्णाच्या मागे लपून बस". ते झाल्यावर कर्ण त्याला सोडतो व पांडवांच्या इतर योद्ध्यांशी लढू लागतो. युधिष्ठीर पळून जात आहे ते पाहिल्यावर त्याच्या मागे छेड्डी, पांचाल, योद्धे त्यांना संरक्षण देण्यासाठी निघतात. त्यांचे नेतृत्व सत्यकी करत असतो. पांडवांचे योद्धे जात आहेत ते पाहून कर्णाला आनंद होतो. तो त्या परतणार्या सैन्याचा पाठलाग करू लागतो. त्यावेळी कौरवांचे रणवाद्ये वाजवून कर्णाच्या जयाचे कौतुक करतात. त्यावेळी युधिष्ठीर श्रृतकिर्तीच्या रथातून कर्णाचे कौतुक पहात असतो. त्याच्या फौजांचा होणारा विनाश त्याला बघवत नाही. तो ओरडून त्याच्या सौनिकांना बोलतो, "अरे, तुम्ही असे गप्प कां? लढायला जा", ते ऐकल्यावर पांडवांचे सैनिक कौरवांवर चालून

जातात. त्यांचे नेतृत्व भिमसेन करत होता. मोठा गदारोळ होतो. भीषण युद्ध पुन्हा प्रारंभ होते. बाणांच्या वर्षावामुळे आकाशात अंधार पसरतो. त्यात असंख्य माणसें, घोडे, हत्ती मारले जातात. त्या गोंधळाचा आवाज आकाशात स्वर्गाकडे पोहोचतो. त्यामुळें अप्सरा, ऋषी, यक्ष असें सगळे ते युद्ध पहाण्यासाठी आकाशात गर्दी करतात. मरणार्या योद्ध्यांना ते त्यांच्या स्वर्गीय रथातून इंद्राकडे घेऊन जातात. ते पाहून लढणार्या दोनही बाजूच्या योद्ध्याचा उत्साह वाढतो व ते मरण्यासाठी लढू लागतात. त्या लढाईत धुळरा वातावरणात इतका उडतो कीं, कोणी कोणाला पाहू शकत नव्हते. रक्ताची नदी वाहू लागते. त्यात मेलेल्या लोकांचे देह तरंगत होते. ते दृष्य मोठे भयंकर होते. रक्त व मातीच्या चिखतात कांहीं रुतले होते. त्याना धड लढतासुद्धा येत नव्हते. कांहीं त्यातच मारले जात होते. लढवय्ये त्यामुळे फार नाराज झालेले दिसत होते. पांडवांचे योद्धे भिम व सत्यकीच्या नेतृत्वात तुमच्या फौजांवर तुटून पडत होते. त्यांच्या जोरापुढे तुमचे मुलगे हतबल झालेले दिसत होते. तुमचे सैनिक त्यांच्या शस्त्रासह रणभूमीतून पळून जात असलेले दिसत होते. जसे हत्ती पळतात जेव्हां सिंहांचा कळप त्यांच्या मागे लागतो.

कर्ण पर्व भाग एकोणपन्नासावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग पन्नासावा

संजय पुढे सांगतो, पांडवांचे शूरयोद्धे तुमच्या सैन्यावर जोरांने हल्ला करतच होते. दुर्योधन त्यांना अडवण्याची कोशिस करत होता. तो जोराने ओरडून तुमच्या योद्ध्यांना सांगत होता कीं, लढा परंतु, कोणीही ऐकत नव्हते. त्यानंतर कौरवाचे सैन्य शकूनीच्या व कर्णाच्या नेतृत्वाखाली भिमाशी लढू लागते. कर्ण सल्याला सांगतो कीं, ते भिमाकडे जातील. ते भिमाकडे पोहोचतात. भिम कर्णाला त्याच्या कडे येतांना पहातो व संतापाने लालेलाल होतो. तो कर्णाचा नाश करण्याचे ठरवतो. तो सत्यकीला व धृष्टद्युम्नला सांगतो, "तुम्ही दोघे युधिष्ठीराला संरक्षण देण्यासाठी जाणे चांगले. तो मोठ्या संकटातून माझ्या समक्ष सुटला आहे. माझ्या समक्ष त्याचे वस्त्र व चिलखत फाडले गेले आहे. ते कर्णाने दुर्योधनाला खूष करण्यासाठी केले होते. त्याचा आज मी अंत करणार आहे. आज एकतर मी त्याला ठार मारीन अथवा तो मला ही माझी पवित्र प्रतिज्ञा आहे माझ्या राजासाठी". असे सांगून तो पांडव कर्णाच्या रथाकडे निघाला. ते करतांना भिम भिमगर्जना करतो जी सगळ्या दिशांना ऐकू जाते. भिमाला येत असतांना पाहून सल्य राजा कर्णाला बोलतो, "तो पहा पांडव येत आहे, तो बहुतेक करून त्यांचा इतक्या वर्षाचा राग तुझ्यावर ओकणार आहे असें दिसते. त्याला ह्या आधी कधी मी अशा उग्र रुपात पाहिलेला नाही. अगदी जेव्हां त्याचा मुलगा घटोत्कच व पुतण्या अभिमन्यू मारले गेले तेव्हासुद्धा तो आजच्या सारखा उग्र झाला नव्हता.

संजय पुढे सांगतो, असे सल्य कर्णाला बोलत आहे तेव्हढ्यात वृकोदर त्यांच्या समीप येऊन ठेपला. ते पाहून कर्ण सल्याला हसत हसत बोलतो, "अरे मद्रच्या राजा तू जे बोलत आहेस ते सगळे खरे आहे. भिम शूर आहे व मोठा धाडसीसुद्धा आहे. त्याला त्याच्या शरीराची पर्वा नसते. त्यामुळे त्याच्या शौर्याला तोड नाही. विराटाकडे लपून रहात असतांना त्यांने किचकाचा वध निव्वळ हातांने केला आहे. आज तो पांडवांचा प्रमुख योद्धा आहे. परंतु मला अर्जुनाला मारावयाचे आहे, भिमाला नाही. माझी ती मनीषा भिमाशी लढतांना कदाचित पूर्ण होईल असें वाटते. समजा, मी भिमाला मारले तर पार्थ त्याला

संरक्षण देण्यासाठी खात्रीने येईल. मग मी अर्जुनाला मारीन व माझी इच्छा पूर्ण होईल". ते कर्णाचे ऐकून सल्य त्याला उत्तर देतो, "तसे असेल तर चला आपण भिमाकडे जाऊ".

सल्याला कर्ण बोलतो, "एकतर मी अर्जुनाला मारीव किंवा तो मला मारेल".

अशारितीने बोलत लढण्याच्या उद्देशाने ते तेथे जाऊ लागतात.

संजय पुढे बोलतो, त्यानंतर सल्य त्यांचा रथ वेगांने भिमाकडे नेऊ लागतो. त्यावेळी भिम कौरवांचे सैनिक मारण्यात गर्क होता. त्यावेळी शंखनाद व ढोलक्यांचा आवाज ऐकू येत होता. तेथे भिम व कर्ण समोरासमोर आले होते. कर्णाला समोर पाहून भिमाचा पारा वर गेला. तो कौरवांच्या सैन्याला त्याच्या बाणांने दूर पिटाळू लागतो. त्या दोघाचे द्वंद्व फारच भयंकर होते. वृकोदर कर्णाच्या छातीत बाण मारतो. कर्ण त्याच्या बदल्यात भिमावर बाणाचा वर्षाव करू लागतो. कर्ण भिमाचे धनुष्य मोडतो. त्यानंतर कर्ण त्याच्या अंगावर अनेक बाण मारत असतो. भिमाला अनेक जखमा झालेल्या होत्या. तरीसुद्धा तो कर्णावर एक जबरदस्त बाण मारणार असतो. धनुष्याची दोर तो चांगली खेचतो व जोराने तो बाण कर्णावर मारतो. तो बाण सूं सूं असा आवाज करत कर्णाच्या अंगात घुसतो. त्या बाणाच्या आघाताने कर्ण त्याच्या रथात बेहोष होऊन पडतो. सल्य समजतो कीं कर्ण हरला आहे. तो लागलीच त्यांचा रथ रणांगणातून बाहेर काढतो. त्यानंतर भिम दुर्योधनाचे योद्धे मारण्यास सुरूवात करतो. जसा इंद्र दानवांचा नाश करत असे प्राचीन काळी.

कर्ण पर्व भाग पन्नासावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग एकावन्नावा

धृतराष्ट्र बोलतात, "ते युद्ध फारच मुष्किल असे होते. जे भिमाने जिंकले. त्यात त्यांने कर्णाला त्याच्या रथाच्या माळ्यावर झोपवले होते. तेथे एकच माणूस आहे जो पांडवांचा नाश करू शकेल. परंतु, त्याला भिमाने लोळवलेले पाहून माझा मुलगा काय करतो ते मला सांग.

संजय पुढे सांगतो, कर्णाचा पराभव झालेला पाहून तुमचा मुलगा त्याच्या भांवांना बोलतो, "आता वेळ न दवडता जा, कर्णाला वाचवा. तो मोठ्या अडचणीत पडला आहे त्या भिमामुळे". ते ऐकल्यावर संतापलेले तुमचे मुलगे भिमावर चाल करतात. त्यामध्ये श्रृतर्वण आणि दुर्धर, क्रथ, विवित्सू, विकट, सोम, निशंगिन, कवशिन, पशिन, नंद, उपनंदक, दुष्प्रदर्शक, सुवाहू, वटवेग, सुवर्चस, धनुग्रह, दुर्मद, जलासंध, साल, सह, असें होते. ते भिमाला वेढा घालतात. चहोबाजूने ते त्याच्यावर बाणांचा वर्षाव करतात. परंतु, भिम त्यांना त्वरित ठार मारण्यास सुरूवात करतो. त्यांच्या बरोबर त्यांच्या इतर योद्ध्याना सुद्धा तो मरून टाकतो. विवित्सू मरतो ते पाहिल्यानंतर इतर कौरव भिमाला आणखीन बाण मारत रहातात. त्यानंतर तो विकट व सह मारतो. त्यानंतर क्रथाला मारतो. त्यानंतर तो नंदाला, उपनंदाला मारतो. ते पाहून तुमचे मुलगे भिमाशी न लढता तेथून पळून जातात. कौरवांचे शिरकांड होत आहे ते पाहून कर्णाला फार वाईट वाटते. तो पुन्हा भिमाशी लढण्यासाठी तेथे जातो. पुन्हा त्यांच्यात एक भयंकर द्वंद्व होते. पुन्हा भिम कर्णाला ताब्यात घेतो. ते दुर्योधनाच्या समक्ष होते. दोघे जोराचा बाणांचा मारा एकमेकांवर करत असतात. ते युद्ध तुझे मुलगे पहात असतात. कर्ण भिमाचे धनुष्य तोडतो. भिम एक मोठे परिघ (फेकून मारावयाचे चक्राकार शस्त्र) कर्णावर त्याचा वध करण्याच्या इराद्याने फेकतो. कर्ण मात्र त्या परीघाचे शतशः तुकडे करून ते निष्प्रभ करतो. त्यांच्यामध्ये पुन्हा धनुर्युद्ध सुरू होते. त्यानंतर कर्णाने जोराने एक बाण भिमावर फेकला. तो भिमाला जखमी करतो. त्यामुळें चिडलेला भिम कर्णावर एक बाण त्याच्या शरीरात जोरात घुसेल अशा प्रकारे मारतो. तो बाण कर्णाचे चिलखत फाडून त्याच्या अंगात घुसतो व नंतर मातीत पडतो. त्या बाणामुळे

कर्णाला मोठी जखम होते व तो फार संतापतो. परंतु, तो त्या घावामुळें थरथरत असतो. त्यानंतर तो भिमावर पांच बाण मारतो. भिमाचा झेंडा पाडतो. त्यानंतर दुसर्या बाणांने तो भिमाच्या सारथ्याला यमाकडे धाडतो. त्यानंतर त्याचे धनुष्य तोडतो. भिमाचा रथ सुद्धा तो मोडून टाकतो. भिम त्याची गदा घेतो त्याने तो कौरवांच्या सैन्याला मारू लागतो. संतापलेला भिम कौरवांच्या हत्तीना मारू लागतो. तो हत्तींच्या वर्मावर घाव घालून त्याना मारत होता. त्या हल्ल्यामुळे ते हत्ती सैरावैरा पळू लागले. तरी त्यांच्या माहूताने त्या हत्तीना वळवून पुन्हा भिमावर ते हल्ला करतात. भिम त्या लढाईत सातशे हत्ती यमसदनाला पाठवतो. त्यांच्यावरील झेंडे मातीत पडलेले दिसत होते. त्यांत सुवलांचे पन्नास हत्ती होते. त्यानंतर भिम तुमचे शंभर रथ मोडतो. त्याशिवाय पायदलातील शेकडो सैनिकांना ठार मारत असतो. ते पाहून आपले सैन्य रणांगण सोडून पळू लागते. भिमाच्या गर्जना ऐकल्या कीं, तुमचे सैन्य तेथून पळून जात होते. शकूनीचे तीन हजार सैनिक त्यांच्या सगळ्या सस्त्रासह भिमाने यमाकडे पाठवले. भिमाच्या हल्ल्यामुळें ते ओरडत होते. त्यानंतर भिम एका रथात चढतो. त्यानंतर तो पांडव कर्णाच्या मागे लागतो. त्यावेळी कर्ण युधिष्ठीराच्या मागे लागला होता. युधिष्ठीर त्याच्यापासून दूर पळत होता. ते करत असतांना तो कर्णावर बाण मारत होता. ते पाहून भिम त्याच्या बाणांनी सगळे आसमंत भरून टाकतो. भिम येत आहे असे पाहिल्यावर कर्ण युधिष्ठीराला सोडतो व भिमाकडे निघतो. त्यांच्यामध्ये बाणयुद्ध सुरू होते. त्यावेळी सत्यकी भिमाची बाजू घेऊन कर्णाशी मुकाबला करू लागतो. कर्णाला त्या दोघांना आवरणे सोपे नव्हते. तरी तो सत्यकीकडे दुर्लक्ष करत फक्त भिमावर लक्ष केंद्रीत करून लढू लागतो. त्यांच्यामध्ये द्वंद्व सुरू होते. त्या दोघांच्या बाणांमुळें आकाशात अंधार पसरला होता. त्यावेळी सुवलाचा मुलगा शकूनी, कृतवर्मन, कृप, अश्वत्थामा पांडवांच्या सैन्याचा नाश करण्यात गुंतले होते. रणभूमीत मोठा गोंधळ उडाला होता. सूर्य मावळतीकडे झुकला होता तेव्हां ते युद्ध होत होते. त्या भीषण युद्धाचे काय वर्णन करावे? लढणारे योद्धे मोठ्या मोठ्याने ओरडत होते ते ऐकू येत होते. त्यात हत्तींचे चित्कार व घोड्यांचे खिंकाळणे भर घालत होते.

मला वाटत होते कीं, त्या सगळ्या योद्ध्याचा क्षण आला होता. त्या लढाईतून कोणीही जीवंत सुटणार नव्हते. कर्ण पर्व भाग एकावन्नावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग बावन्नावा

संजय पुढे सांगतो, ते क्षत्रिय एकमेकांचा जीव घेण्यासाठी आतूर झालेले होते. रथांच्या झुंडी घोडे व पलटणी हत्तीदल असे सगळे तेथे लढत होते. गदांचे एकमेकांवर आदळणे काटेरी गदांचे आवाज सतत ऐकू येत होते. बाणांचे वर्षाव तर सारखेच होत होते. घोडेस्वार घोडेस्वाराशी, पाईक पाईकाशी, हत्तीस्वार हत्तीस्वाराशी अशी लढाई होत होती. त्यांचा उद्देश फक्त एकच की दुसर्याला ठार मारणे. त्यामुळे ती रणभूमी भयंकर झाली होती. सगळीकडे रक्तच रक्त दिसत होते. त्यात मेलेल्यांचे शरीराचे भाग पडलेले दिसत होते. असंख्य मुंडकी पडलेली होती. त्यांची शस्त्रं विखूरलेली पडलेली होती. हत्ती एकमेकांना त्यांच्या सुळ्यांनी भोसकत होते. त्यांचे रक्त सांडत होते. योद्ध्यांनी फेकलेले बाण, भाले त्या अजस्त्र प्राण्याला लागत व त्याला जखमा करत होते. कांहीं प्रचंड हत्ती डोंगरासारखे दिसत होते. मेल्यानंतर ते रणभूमीत आडवे पडल्याने मोठी जागा अडवत होते त्यामुळें त्यातून जाणे मुष्किल होत होते. रथ अडकत होते. पडलेले हत्ती विव्हळतांना रडत असल्याचे समजत होते. घोड्यांची सुद्धा तशींच अवस्था होती. माणसेसुद्धा तशीच विव्हळत पडलेली दिसत होती. कोणाला कोणाची दया येत नव्हती. मृत्यूचे राज्य सगळीकडे पसरलेले दिसत होते. कित्येकांचे आप्त त्यांच्या मेलेल्या नातेवाईकास शोधत असल्याचे दिसत होते. त्यांचे रडणे ऐकू येत होते. कित्येक त्यांच्या आप्ताच्या नावांने त्यांना जोराने हांकां मारत होते. कित्येकांचे फक्त हात दिसत होते. कित्येकांची फक्त मुंडकी दिसत होती. कांहीं फक्त धडं उरलेली होती. कोणाचे धडं ते समजत नव्हते. अनेक प्रकारचे शस्त्रं तेथे पडलेली होती. कांहींना रक्ताचे डाग होते. रणभूमीत पसरलेल्या धुळीमुळें सैनिक ते कोणाशी लढत आहेत ते ओळखू शकत नव्हते. ऐंद्रासारख्या अस्त्राने दोनही बाजूचे मारले जात होते. रक्ताचे पाट वहात होते. ते पाहून कांहीं घाबरत होते तर कांहींना मजा वाटत होती. ते रक्त यमाच्या दारी जात आहे असें वाटत होते. मृत्यूचे साम्राज्य पसरलेले होते. कित्येक मांसाहारी हिंस्त्र श्वापद मेलेल्यांचे मांस खात होते. कावळे, गिधाडं ह्यांची चंगळ होती. असे सगळे आजूबाजूला होत असतांना खरे योद्धे त्यांचे

लढणे चालू ठेवत होते. त्यांना त्या श्वापदांची भिती वाटत नव्हती. असंख्य बाण पडलेले होते. कित्येक हिंस्त्र पशू त्या बाणांनी मारले जात होते. योद्धे एकमेकांना त्यांची नांव सांगत होते. कोणासाठी ते लढत आहेत ते समजत होते. शत्रूपक्षाचा आहे असें समजले कीं ते एकमेकांशी लढत होते. मारून टाकत होते. त्या युद्धात कौरवांचे सैन्य लढण्यात आता भाग घेण्यास तयार नसल्याचे दिसत होते. त्यांना समजले होते कीं, त्यांच्या बाजूचा पराभव झाला आहे. मग कशाला उगाच मरावयाचे. कांहीं राजे त्यांचे सैन्य परत पाठवत होते. युद्धातून बाहेर पडत होते त्यांना दुर्योधन थांबवू शकत नव्हता.

कर्ण पर्व भाग बावन्नावा संपला.

# कर्ण पर्व
## भाग त्रेपन्नावा

संजय पुढे सांगतो, त्या महायुद्धात जेव्हां अनेक क्षत्रिय कामी आले, गांडीवाचा आवाज सगळे ऐकत होते. अर्जुन संसप्तकांचा संहार करत होता. कौसल व नारायण फौजा त्यात होत्या. ते जिंकण्याच्या इर्शेने लढत होते. ते अर्जुनावर बाणांचा वर्षाव करत होते. पार्थाने शुशर्मनावर वार केला. त्यावेळी संसप्तकसुद्धा त्याच्यावर हल्ला करत होते. शुशर्मन पार्थावर बाणा मारतो. त्यानंतर तो अर्जुनाच्या झेंड्यावर बाण मारतो. ते झाल्यामुळें त्यावर बसलेला कपी मोठ्या मोठ्याने गर्जना करू लागतो. त्या आवाजाने सगळे भयभीत होतात. ते संसप्तकांचे सैनिक युद्ध करण्याचे थांबवतात. कौरवांचे मात्र अर्जुनावर बाणांचा मारा करुन त्याला त्याच्या रक्ताने भिजवत असतात. तोसुद्धा त्यांना रक्ताच्या आंघोळी घालत होता. सगळे जोरांने ओरडत होते. त्यातील कांहीं केशवाचा व अर्जुनाचा हात पकडून त्यांना अभिवादनं करत होते. त्यांना ते करत असतांना आनंद होत होता. कारण वस्तुतः ते कृष्णाचे सैन्य होते पण कौरवांसाठी लढत होते. कृष्ण मात्र त्यांचे हात झटकून टाकत होता. अर्जुनाच्या बाणांच्या वर्षावात ते मारले जात होते. अर्जुन कृष्णाला बोलतो, "अशा परिस्थितीत माझ्याशिवाय कोणी त्यांचा संहार करू शकणार नाही". असे बोलून, तो त्यांचे शंख वाजवू लागतो. त्यानंतर कृष्ण त्याचे पांचजन्य वाजवतो. ते ऐकल्यावर संसप्तकांमध्ये पांगापांग सुरू होते. अर्जुन नांग अस्त्र वापरून त्या योद्ध्यांचे पाय सापाने पकडल्याने लंगडे करत असतो. त्यांचे पाय लंगडत असल्यामुळे ते कांहीं करू शकत नाहीत. त्यानंतर तो त्या अडकलेल्या संसप्तकांचा संहार करू लागतो. जसे तरक दैत्याशी इंद्र लढत होता त्या प्राचीन काळी. ते मारल्यानंतर त्यांचा रथ जो त्या संसप्तकांनी पकडून ठेवला होता तो मोकळा होतो. त्यावेळी मोठा महारथी शुशर्मन त्याचे सैन्य अशाप्रकारे मारले गेले आहे ते पाहून सौपर्ण अस्त्र काढतो. त्या अस्त्रामुळें आकाशातून असंख्य गरूड येतात व नाग अस्त्रामुळें आलेले नाग ते खाऊ लागतात. पाय सुटे झाल्यानंतर ते संसप्तक पुन्हा लढू लागतात. ते अर्जुनाच्या रथावर हल्ला करतात. अर्जुन ते सगळे तोडत असतो. त्यांचा संहार तो करू लागतो. शुशर्मन अर्जुनाच्या छातीत बाण मारतो. त्यामुळे अर्जुन त्याच्या रथात

कोसळतो. ते पाहून संसप्तकांचे मोठ्याने ओरडून त्यांचा आनंद व्यक्त करतात. ते सांगू लागतात, "पार्थ मेला, पार्थ मेला". ते त्यांची रणवाद्ये वाजवू लागतात. परंतु, लवकरच पार्थ सावध होतो. तो ऐंद्र अस्त्र काढतो. त्यामुळें हजारो बाण आकाशातून त्या संसप्तकांवर येतात व त्यांना मारून टाकतात. ते पाहून संसप्तक व गोपाल योद्ध्यांत भितीचे वातावरण उत्पन्न होते. त्यांच्यात असा कोणी नव्हता जो अर्जुनाशी लढू शकेल. अर्जुन त्यांचा संहार करू लागतो. त्यावेळी अर्जुन दहा हजार योद्धे मारून टाकतो. तीन हजार हत्ती मारतो. तरीसुद्धा ते बेडर संसप्तक धनंजयाला पुन्हा वेढा घालतात. त्याना मरण्याची भिती नसते. जिंकणे हा एकच उद्देश त्यांचा वाटत होता. त्यानंतर अर्जुन व तुमचे कौरव ह्यांच्यात जोराचे युद्ध सुरू होते.

कर्ण पर्व भाग त्रेपन्नावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग चौपन्नावा

संजय पुढे सांगतो, त्यानंतर कृतवर्मन, कृप आणि द्रोणांचा मुलगा, कर्ण, उलूक, शकूनी दुर्योधन स्वतः त्याचे भाऊ पहात असतात कीं, त्यांचे सैन्य पांडवांच्या धडाक्याने हादरलेले आहे. जसें वादळात सापडलेल्या नौकेचे होते तसे त्याचे झाले होते. थोड्या काळासाठी ते युद्ध भीषण रुप धारण करते. कृपांने सोडलेले असंख्य बाण श्रींजयाच्या सैन्याची दाणादाण उडवत होते. शिखंडी रागाने कृपांवर चाल करतो. त्यांच्यावर जोराचा मारा करतो त्याच्या बाणांचा. कृप त्या बाणांना आवरण्याचा प्रयत्न करत असतात. शिखंडी अखेरीस कृपाचार्यांना मोठी जखम करतो. त्यावर कृप शिखंडीचे घोडे मारतात. त्याचा सारथी मारला जातो. त्याचा रथ मोडण्याचा प्रयत्न करतो. शिखंडी त्याच्या रथातून उडी मारून खाली उतरतो. कृपांवर धावून जातो. त्याच्या हातात तलवार असते. कृप त्यांच्या बाणांनी त्याला घेरतात. ते त्यांचे कृत्य विलक्षण कौतुकास्पद होते. त्यामुळे शिखंडी बंदिस्त झाला. तो लढू शकत नव्हता. ते पाहून धृष्टद्युम्न शिखंडीच्या मदतीला जातो. त्यावेळी अश्वत्थामा युधिष्ठीरावर हल्ला करत असतो. दुर्योधन नकूल व सहदेवांवर बाणाने मारा करत असतो. कर्ण भिमसेनाच्या मागे लागलेला आहे. तो कुरूषांच्या सुद्धा मागे लागला आहे. कृप शिखंडीवर बरेच बाण मारतो. परंतु, तो ते सगळे बाण त्याच्या ढालीने हाणून पाडतो. कृप त्यानंतर ती ढाल तोडण्याचा प्रयत्न करतात. ते पाहून सगळे योद्धे त्यांचे कौतुक करतात मोठ्यानो ओरडून. ढाल गेल्यानंतर शिखंडी त्याची तलवार घेऊन कृपांवर जात असतांना सुकेतू श्रृतकेतूचा मुलगा, शिखंडीला वाचवण्यासाठी पुढे सरसावतो. तो कृपांवर असंख्य बाणांचा वर्षाव करतो. ते पाहून शिखंडी तेथून सटकतो. सुकेतू कृपांवर बाणांचा मारा करत रहातो. कृपांचा तिरकमटा तोडतो. त्यानंतर त्यांच्या सारथ्याला घायाळ करतो. ते झाल्यामुळे कृप संतापतात. ते सुकेतूच्या सारथ्याला जखमी करतात. त्यानंतर ते सुकेतूला घायाळ करतात. त्यानंतर ते सुकेतूचे डोके उडवतात. तरी तो डोक्याशिवाय तसांच कांहींकाळ उभा होता मग कोसळला. त्याचा वध झाल्याने त्याचे लष्कर घाबरते. ते कृपापासून दूर जातात. त्या सुमारास कृतवर्मन धृष्टद्युम्नाला अडवतो.

तेथे वृश्नी व पांचालांत युद्ध सुरू होते. ते फार भीषण होते. जसे दोन ससाणे एकमेकांशी लढतात. पांचाल कृतवर्मनाला जखमी करतो. त्यांच्या बाणांनी ते दिसेनासे होतात. धृष्टद्युम्न कृतवर्मनाचे बाण उलटवत असतो. थोड्या लढाई नंतर धृष्टद्युम्न कृतवर्मनाचा सारथी ठार मारतो. कृतवर्मन युद्धातून गेला. त्यानंतर पुन्हा धृष्टद्युम्न कौरवांच्या सैन्याचे शिरकांड करू लागला. जोराजोराने ओरडत तो लढत होता.

कर्ण पर्व भाग चोपन्नावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग पंचावन्नावा

संजय पुढे सांगतो, युधिष्ठीराला सत्यकी व द्रौपदीच्या मुलांनी संरक्षण दिले आहे ते पाहून अश्वत्थामा युधिष्ठीरावर बाणांचा मारा करू लागतो. त्याचे बाण मंतरलेले होते. त्या बाणांनी तो युधिष्ठीराला घेरून टाकतो. सगळे आकाश बाणांनी भरलेले होते. दुसरे कांहीं दिसत नव्हते. बाणांची झालर जणू आकाशात पसरून घातली आहे असे वाटत होते. बाणांच्या सोनेरी चमकी मुळे त्या झालरीला सोन्याची जडीबुट्टी केली आहे असे वाटत होते. ते दृष्य विलक्षण सुंदर दिसत होते. त्याच्या पुढे सत्यकी आणि युधिष्ठीर व इतर योद्धे निष्प्रभ ठरलेले होते. अश्वत्थामाच्या कौशल्याने सगळे योद्धे भयचकीत झाले होते. स्वतः अश्वत्थामा तळपत्या सूर्यासारखा दिसत होता. पांडवाचे सैन्य मोठ्या प्रमाणात कापले जात होते. त्यावेळी मृत्यूचे भय टाकून सत्यकी, युधिष्ठीर, आणि द्रौपदीची मुलं अश्वत्थामावर चालून गेले. सत्यकी अश्वत्थामाला बाणांने भोसकतो. त्यानंतर युधिष्ठीर त्याला बाण मारतो. प्रतिविन्ध्य सात बाण मारतो. श्रृतकर्मन तीन मारतो, श्रृतकिर्ती पांच मारतो, सुतसोम नऊ मारतो, सतनिक सात मारतो. त्यानंतर त्यांचे इतर योद्धे सुद्धा अश्वत्थामावर बाणांचा वर्षाव करतात. त्यानंतर अश्वत्थामा श्रृतकिर्तीचे धनुष्य तोडतो. तो दुसरे धनुष्य घेऊन लढाई करत रहातो. त्यानंतर पुन्हा अश्वत्थामा पांडवांवर बाणांचा मारा सुरू करतो. त्यानंतर तो हसत हसत युधिष्ठीराचे धनुष्य मोडून टाकतो. मोठ्याने गर्जना करतो. त्यानंतर अश्वत्थामा सत्यकीच्या सारथ्याला खाली पाडतो. त्यामुळें सत्यकीचे घोडे सैरावैरा धावू लागतात. तरी इतर पांडव योद्धे युधिष्ठीराच्या नेतृत्वाखाली द्रोणाच्या मुलावर हल्ले करत असतात. अश्वत्थामा त्या सगळ्यांना आटपत नव्हता. तो पांडवांचे सैन्य मारत होता. त्यामुळे पांडवांची बाजू फार अस्वस्थ झाली होती. सगळ्यांना वाटू लागले कीं, आता पांडव हरणार. अश्वत्थामाला पांडव ओरडून सांगतात कीं, "तू समजतोस की पांडवांना त्याच्याबद्दल अजिबात प्रेमभाव नाही असे दिसते कारण ते सगळे त्याला मारण्यासाठी उतावीळ झाले आहेत. प्रत्यक्षात परिस्थिती अशी आहे कीं, ब्राह्मणाचे कर्तव्य

अध्यात्मिक साधना करणे व अभ्यास करणे असे आहे. ते सोडून तू क्षत्रियांचा धर्म स्वीकारला आहेस. म्हणून तुझ्या बद्दल प्रेम वाटणे कसे शक्य होईल"? तुझ्या समक्ष आम्ही कौरवांचा संहार करणार आहोत. तू ब्राह्मण वर्णाला लागलेला धब्बा आहेस. ते ऐकल्यावर द्रोणांचा मुलगा फक्त हसतो परंतु, कांही बोलत नाही. तो पुन्हा बाणांचा वर्षाव करू लागतो. अनेक पांडवांचे योद्धे त्यात मरत असतात. युधिष्ठीर ती रणभूमी सोडून जातो. त्यानंतर अश्वत्थामासुद्धा निघून जातो. युधिष्ठीर कौरवांच्या फौजांवर हल्ले करू लागतो. त्यांचा निर्दयपणे संहार करू लागतो.

कर्ण पर्व भाग पंचावन्नावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग छप्पन्नावा

दोनही बाजूच्या लढवय्यांचा भीषण संहार होत होता. पांचाल, छेड्डी व कैकायांच्या मदतीने लढणार्या वृकोदराशी कर्ण झूंजत होता. भिमाच्या समक्ष कर्ण त्याचे योद्धे मारत होता. त्यामध्ये छेड्डी, पांचाल, श्रींजय व कुरुषांचे योद्धे सुद्धा होते. भिम मात्र कर्णाच्या वाटेला न जाता फक्त कौरवांचा विध्वंस करण्यावर भर देत होता. कर्णसुद्धा पांचालांचे धनुर्धारी मारत होता. त्यावेळी पार्थ संसप्तकांचा नाश करत होता. अरे राजा, (धृतराष्ट्राला उद्देशून संजय बोलतो) तुमच्या चुकीच्या धोरणांमुळे हा चांगल्या लोकांचा संहार होत होता. ते क्षत्रिय वेड्यासारखे एकमेकांना मारत आहेत.

दुर्योधन नकुलाला बाणांने जखमी करतो. त्याचे चार घोडे मारतो. त्यानंतर तो तुमचा मुलगा सहदेवांचा झेंडा पाडतो. नकूल संतापाने दुर्योधनाला नऊ बाण मारतो. सहदेवसुद्धा त्याच्यावर जोराचा मारा करतो. दुर्योधन व त्या दोन भावांचे युद्ध जोरात चालू होते. ते दोन आश्विनीपुत्र त्यांचे नवे तिरकमटे घेऊन सज्ज झाले तेव्हां ते फारच सुंदर दिसत होते. ते त्यांच्या चुलत भावावर तुटून पडले. त्यांच्या न थांबणार्या बाणांच्या वर्षावा पुढे तुमच्या मुलांचे कांही चालत नव्हते. दुर्योधनाला फार राग येत होता कीं तो मार खात आहे. तो सारखे बाण फेकत होता. त्या वर्षावा मुळें दोनही आश्विनीकुमार दबले गेले होते. तुमच्या मुलाच्या बाणांच्या घेरावात ते दिसत नव्हते. सगळ्यांना वाटू लागले कीं, माद्रीची मुलं मरणार. त्यावेळी पांडवांचा सरसेनानी प्रिशताचा मुलगा त्यांच्या मदतीसाठी सरसावला. दुर्योधनाला ते आव्हान आवडले असावे असे दिसले. तो हसू लागला. त्यांने एक गर्जना केली सिंहासारखी. प्रिशताच्या मुलाचे धनुष्य तो तोडतो. ते टाकून धृष्टद्युम्न दुसरे घेतो. त्याचे सगळे शरीर जखमांनी भरलेले होते. तो कांही सर्पबाण तुमच्या मुलावर फेकतो. ते तुमच्या मुलाच्या अंगात घुसून आरपार जातात व जमिनीवर पडतात. दुर्योधन त्याच्यावर दहा बाण मारतो. ते प्रिशताच्या मुलाच्या कपाळात जातात. त्याबरोबर तो दुर्योधनाचे घोडे मारतो, त्याचा सारथी मारतो. त्याची छत्री पाडतो. त्याचे सुंदर चित्र असलेला

झेंडासुद्धा पाडतो. त्यानंतर तुमचे इतर मुलगे दुर्योधनाला घेऊन जातात. त्या सुमारास कर्णाने सत्यकीचा पराभव केला होता व तो दुर्योधनाला वाचवण्यासाठी तेथे जाऊ लागतो. घनघोर युद्ध होत होते. त्यानंतर कर्ण पांचालांच्या सैन्यावर चालून जातो. ती दुपारची वेळ होती. त्यावेळा असंख्य माणसं, हत्ती व घोडे मारले जात होते. सगळे पांडवांचे कर्णावर चालून जातात. कर्ण पांचालांचा नेता व्याघ्रकेतू शुशर्मन ह्यांच्यावर बाणांचा वर्षाव करू लागतो. त्याशिवाय चित्रसेना, उग्रयुध, जय, शुक्ल, रोचमन आणि सिंघसेना ह्यांना सुद्धा घेरतो. ते शूरयोद्धे कर्णाला वेढा देतात. त्यांच्यात युद्ध सुरू होते. कर्ण त्यांना पुरून उरतो. त्यानंतर तो त्यांचे असंख्य योद्धे यमाकडे धाडतो. रागावलेला कर्ण जिश्नू, जिश्नूकर्मन, देवपी, चित्रसेना, चित्रयुध, हरी, सिंघकेतू, रोचमन आणि सलभ ह्यांना ठार मारतो. त्या शिवाय इतर बरेच योद्धे तो मारतो. ते करत असतांना तो स्वतः रक्तबंबाळ झाला होता. तो लढतांना जोरांने ओरडत होता. रणभूमी मेलेल्या हत्तीने भरलेली होती. ते सगळे कर्णाच्या रथाभोवती पडत होते. त्या आधी न भिष्माने, द्रोणांनी असा संहार केला होता. जसें सिंह इतर प्राण्यांत न डरता फिरत असतो तसा कर्ण पांचालांच्या फौजांमधून फिरत होता. कर्णाच्या तावडीत सांपडलेले कोणी जीवंत सुटत नव्हते. मोठे रथी महारथी कर्ण चुटकी सरशी ठार मारत होता. पांचालांचा तो होणारा संहार युधिष्ठीराला पहावत नाही व तो कर्णावर चालून जातो. त्याच प्रमाणे धृष्टद्युम्न व द्रौपदीची मुलं सुद्धा जातात. पांडवांचे शेकडो योद्धे कर्णाला वेढा देऊन असतात. शिखंडी, सहदेव, नकूल, नकूलाचा मुलगा आणि जनमेजय त्याबरोबर सत्यकी, अनेक प्रभाद्रक धृष्टद्युम्नाच्या नेतृत्वाखाली कर्णावर चालून जातात. कर्ण एकटा त्यांना रोकत असतो. जसे एकटा इंद्र प्राचीन काळी असंख्या दानवांवा हरवत होता. अशारितीने कर्ण पांडवांशी लढत होता, तेथे भिमसेन कौरवांचे सैन्य मारत होता. त्यात वहीक, कैकेया, मत्स्य, वसत, मद्र, सैंधव होते. भिम त्याच्या हत्तीबाणांने असंख्य हत्तींची कत्तल करत होता. त्याच्या बाणांमुळें असंख्य रथी मरत होते. डोके नसलेली शरीर सगळीकडे पडलेली दिसत होती. भिमाला घाबरून दुर्योधनाचे सैन्य गप्प उभे होते. स्वतः रक्तबंबाळ झालेले योद्धे तरीसुद्धा लढत होते. ते होत असतांना अर्जुन संसप्तकांचा नाश करण्यात गुतला होता.

अर्जुन कृष्णाला सांगतो कीं, त्याच्या पुढे तो संसप्तक टिकत नाहीत. तो पुढे बोलतो, "श्रींजयांचे सैन्य दुभागलेले दिसत आहे, कर्णाचा झेंडा दिसत आहे. त्या जवळ युधिष्ठीराचा झेंडा दिसत आहे आपण तेथे जाऊ". मला त्याच्याशी लढावयाचे आहे. परंतु, तुला जे योग्य वाटते तेंच कर". ते ऐकल्यावर कृष्ण हसतो व बोलतो, "कौरवांचा नाश लवकर करून टाक. कौरवांच्या सैन्याकडे जाऊ. तेथे त्यांचा नाश करून टाक. त्यानंतर ते दोघे तेथे जातात. तेथे गेल्यावर साक्षात यमा सारखे तो कौरवांचे मारू लागतो. दुर्योधन त्याच्या संसप्तकांना अर्जुनावर जाण्याची आज्ञा करतो. ते सैन्य पुन्हा अर्जुनावर चालून जाते. सर्व बाजूने ते अर्जुनावर हल्ला करतात. अर्जुनाच्या बाणांनी सगळे आकाश भरले होते. त्या ठिकाणी दहा हजार योद्धे संसप्तकांचे मारल्यानंतर दुसर्या संसप्तकांच्या फौजांवर तो हल्ले करू लागतो. त्याच्या बाणांने अनेकांचे अवयव तुटून पडत होते. कंबोजांचा सुदक्षिन अर्जुनावर बाणांचा मारा करू लागतो. अर्जुन त्याचे सगळे बाण उलटवतो. त्यानंतर त्याला ठार मारतो. त्यानंतर पुन्हा घनघोर युद्ध सुरू होते. त्यामध्ये कंबोजांबरोबर शक, यवन असे होते. पुन्हा रक्ताचा सडा पडू लागतो. मोठा संहार झाला होता. सव्यसाचीने ती संसप्तकांचा फळी तोडल्यानंतर अश्वत्थामा तेथे येतो. तो अर्जुनावर चालून जातो. तो बाणांचा मारा करू लागतो. पांडवांच्या फौजा मारू लागतो. तो कृष्णावर बाण मारू लागतो. त्याच्या बाणांनी अर्जुन व कृष्ण झाकले जातात. त्याच्या बाणांने कृष्णाला भोवळ येते. ते पाहून सगळे चराचर जग काळजी करू लागते. सिद्ध, चरण त्या ठिकाणी जमू लागतात. ते पुटपुटू लागतात, "सगळ्या सृष्टीचे भले हो". त्या आधी संजयाने अश्वत्थामाची ती चलाखी पाहिलेली नव्हती. अश्वत्थामाच्या धनुष्याचा टणत्कार सगळीकडे ऐकू जात होता. क्षणभर अर्जुनाला वाटले कीं, त्याची ताकद संपली आहे. ते पाहून कृष्ण संतापतो. एक मोठा श्वास घेतो. तो बोलतो, "असे मी कधी पाहिलेले नाही. तो तुझ्यापेक्षा जास्त चपळ असल्याचे दिसत आहे. त्याला तू प्रतिकार करू शकत नाहीस असें कसे? तुझ्याकडे गांडीव आहे, तू तुझ्या रथात आहेस, तुला काय झाले आहे? तुझ्या हातांना काही इजा झाली आहे कां"? तू त्याला सोडू नकोस. त्याला तुझा गुरूबंधू म्हणून माफ करू नकोस. हि वेळ तशा गोष्टांसाठी योग्य नाही". कृष्णाचे ते ऐकून पार्थ ध्यानात येतो. त्याचे गांडीव सरसावतो व दहा बाण मारतो. अश्वत्थामाचे धनुष्य तोडून टाकतो. त्याच्या

खांद्याला इजा करतो. त्याची छत्री पाडतो. त्याची इतर शस्त्रं तोडून टाकतो. अश्वत्थामाला झालल्या इजेमुळे तो खाली बसतो.

त्यानंतर पार्थ कौरवांच्या सैन्याचा नाश करत असतो. तुमच्या चुकीच्या धोरणांचा परिणाम स्वरुप हे युद्ध होत असते. विभत्सू संसप्तकांचा व भिम कौरवांच्या सैन्याचा नाश करत होते. त्या रणभूमीत असंख्य धडं पडलेली दिसत होती. युधिष्ठीर त्याला झालेल्या जखमांनी विव्हळत त्याच्या तंबूत रणभूमीपासून दूर झोपलेला होता.

कर्ण पर्व भाग छप्पन्नावा संपला.

## कर्ण पर्व

## भाग सत्तावन्नावा

### (अश्वत्थामा प्रतिज्ञा घेतो)

संजय पुढे बोलतो, दुर्योधन त्याच्या दोस्तांना बोलतो कीं, "आपल्या सगळ्यांना स्वर्गात जाण्याची संधी मिळालेली आहे त्याचा लाभ घ्यावा. ते क्षत्रिय भाग्यवान आहेत ज्यांना अशी संधी मिळते. शूर क्षत्रिय पांडवांना मारतील अथवा त्याना पांडव मारतील". ते दुर्योधनाचे ऐकून तेथे जमलेले क्षत्रिय आनंदाने गाणी वाजवू लागतात. अश्वत्थामा बोलतो माझ्या पित्याने शस्त्र खाली ठेवल्यानंतर सगळ्यांच्या समक्ष धृष्टद्युम्नाने त्याचे डोके उडवले. त्याचा मला फा राग आहे. मी त्या सगळ्यांना मारणार आहे. मग तो कोणीही असो. ते ऐकल्यावर कौरवांचे सैन्य पांडवांवर चालून जाते. त्यानंतर पुन्हा संहार सुरू होतो. तसे होत आहे ते समजल्यावर, स्वर्गातील अप्सरा व इतर दैवी शक्ती तो संहार पहाण्यासाठी एकत्र येतात. ते दैवी लोक आनंद व्यक्त करू लागतात. त्या स्वर्गातून सुगंधी वारा पृथ्वीवर येऊ लागतो. त्यामुळें जास्त उत्साहीत झालेले क्षत्रिय जोरांने एकमेकांचा नाश करू लागतात. ते युद्ध जास्त भीषण झाले.

कर्ण पर्व भाग सत्तावन्नावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग अठ्ठावन्नावा

### (वासुदेव अर्जुनाला युद्धाच्या परिस्थितीची कल्पना देतो)

संजय पुढे सांगतो, अशारितीने ते युद्ध रंगत होते ज्यामध्ये अर्जुन, कर्ण व भिमसेन रांगाने लढत होते. अश्वत्थामाला पराभूत केल्यावर पार्थ वासुदेवाला बोलतो, "पहा त्या कर्णामुळे आपले सैन्य पळत आहे. त्यांचा नेता युधिष्ठीर कोठे दिसत नाही. त्याचा झेंडासुद्धा दिसत नाही. अजून दिवसाचा तिसरा भाग बाकी आहे. कौरवांपैकी कोणी माझ्याशी लढण्यासाठी येत नाही. म्हणून आपण युधिष्ठीर कोठे असेल तेथे जाऊ. तो सुरक्षित आहे ते पाहून मी स्वस्थ होईन. ते ऐकल्यावर गोविंद सव्यसाचीला बोलतो, "पहा किती भयंकर संहार होत आहे. एक क्षत्रिय दुसर्या क्षत्रियाला मारत आहे. हे सगळे त्या दुर्योधनाच्या सत्तेच्या हव्यासामुळे होत आहे. रणांगणात पडलेले धनुष्य पहा, कितीतरी बाण विखरून पडलेले दिसत आहेत. त्यांचे बाणाचे भाते इकडेतिकडे पडलेले आहेत. त्याशिवाय तलवारी, भाले असे कितीतरी जे सोन्याने मढवलेले आहेत दिसत आहेत. कित्येक शलाक मातीत पडलेले आहेत. कित्येकांना रक्त लागलेले आहे. कित्येक कुर्हाडी, फरशा कांहीं त्या मेलेल्या योद्ध्यांच्या हातात तशाच आहेत. लोखंडी गदा, काटेरी गदा असे बरेच शस्त्रसामुग्री मातीत विसावा घेत आहेत. त्याशिवाय ते लढणारे योद्धे पहा मरून पडलेले दिसत आहेत. त्यांना माहीत नाही ते कोणासाठी मेले. त्याशिवाय ते हत्ती, घोडे त्यांचे कोणाशी वितुष्ट नसतांना नाहक मरत आहेत. ह्या पापाचा धनी कोण"?

माणसांचे भाग तुटलेले दिसत आहेत. कोणाचे कोणाला माहीत नाही. दागिने पडलेले आहेत. कित्येकांची मुंडकी पडलेली आहेत. कोणाचे डोळे उघडे आहेत त कोणाचे अर्धवट मिटलेले आहेत. मेलेले घोडे व हत्ती त्यांच्या जखमांतून वहाणारे रक्त मातीला लाल रंग देत आहे. कित्येक मृत सैनिकांच्या अंगात बाण रुतलेले आहेत. ते सुंदर रथ पहा कसे मोडून गेलेले दिसत आहेत. ते बनवण्यासाठी किती खर्च झाला व वेळ गेला पण नष्ट होण्यास कांहींच वेळ लागला नाही. प्रचंड आकाराचे हत्ती डोंगरासारखे आडवे पडलेले आहेत त्यावरून जाणे अशक्य असल्याने योद्ध्याना त्यांचे रथ मोठ्या कष्टाने काढावे

लागतात. कित्येकांचे झेंडे पडलेले आहेत कोणाचा कोणता आता कोणी सांगू शकणार नाही. हत्तीवरील अंबार्या मोडून पडलेल्या आहेत. त्यांच्यावरील शाली रक्तात भिजलेल्या इतस्ततः पडलेल्या दिसत आहेत. घोड्यांच्या पाठीवरील जीन निसटून पडलेली दिसत आहेत. त्यांच्या लगामी सापासारख्या पसरलेल्या दिसत आहेत. अनेक राजांचे रत्नजडीत मुकूट पडलेले दिसत आहेत. अनेक जखमी योद्धे जमिनीवर तडफडत पडलेले आहेत ज्यांच्यामध्ये अजून जीव आहे. कांहीं तडफडत मरत आहेत. ते कण्हत आहेत ते ऐकवत नाही. कित्येकांचे आप्त त्यांच्या समक्ष मरत असलेले पाहून ते टाहो फोडत आहेत. कांहीं तहानेने पाणी शोधण्यासाठी गेले आहेत. कांहीं पळून जाण्याच्या तयारीत आहेत. मृत्यूला इतक्या जवळून पाहिल्याने घाबरलेले ओरडत पळत आहेत. कांहीं वेड लागल्या सारखे ओरडत फिरत आहेत. अशारितीने कृष्ण अर्जुनाला त्या युद्धभूमीचे सांगत होता. ते तसे बोलत युधिष्ठीराकडे जात असतात. तो पार्थाला दाखवतो कीं कांहीं त्यांचे राजे युधिष्ठीराला भेटण्यासाठी जात आहेत. त्याचवेळी तो कर्णाचा अवतार दाखवतो. तो रागांने सगळीकडे पहात असलेला दिसत होता. त्या राजांत पांचालांचे, श्रींजयांचे, सोमकांचे होते. त्यांचे नेतृत्व धृष्टद्युम्न करत होता. त्याच्या बरोबर भिम होता. ते पार्थाला येतांना पहातात तसे त्यांना मार्ग देण्यासाठी दूर होतात. कृष्ण पार्थाला दाखवतो कीं, कर्ण कौरवांचे पळणारे सैन्य जमा करत आहे. त्याच्या बाजूला अश्वत्थामा होता. अशारितीने कृष्ण अर्जुनाला त्या युद्धभूमीची माहीती देत होता. त्याच वेळी पुन्हा युद्ध सुरू झाले. गर्जना करत दोनही फौजा एकमेकांवर हल्ला करतात. एकच गोंधळ सुरु होतो. पुन्हा संहाराला सुरूवात होते.

कर्ण पर्व भाग अठ्ठावन्नावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग एकोणसाठावा

**(धृष्टद्युम्न कर्ण व अश्वत्थामा बरोबर लढतो)**

संजय पुढे सांगतो, त्यानंतर कुरु व श्रींजय पुन्हा एकमेकांशी लढत असतात. त्यातील श्रींजयांचे नेतृत्व युधिष्ठीर करत होते. कुरु सैन्य कर्णाच्या नेतृत्वाखाली होते. त्यांचे युद्ध भीषण होते. अनेक यमाच्या घरी गेले. रक्ताचे पाट वहात होते. त्यानंतर संसप्तक उरले होते. त्यानंतर धृष्टद्युम्न व इतर राजे पांडवांचे कर्णावर चालून गेले. ते विजयाची गाणी मोठ्याने ओरडून गात होते. परंतु, कर्णाशी युद्ध सुरू झाल्यावर दृष्य बदलले. ते विखूरले व कर्णाच्या भडिमाराने तेथून पळून जाऊ लागले. धृष्टद्युम्न कर्णाशी लढत राहीला. कर्णाने तो अपमान समजून त्याचे धनुष्य तोडले. तो त्याच्या रक्ताने भरला होता. त्यानंतर तो दुसरे धनुष्य घेतो व कर्णावर मारा करतो. कर्ण त्यामुळे चिडतो व एक जोरदार बाण त्याच्यावर फेकतो. ते होत असतांना सत्यकी ते कर्णाने फेकलेले मध्येच तोडून टाकतो. कर्ण सत्यकीला विरोध करू लागतो. कर्ण व सत्यकी ह्यांच्यात द्वंद्व होत असते. ते पहाण्यासारखे होते. ते होत असतांना अश्वत्थामा मध्येच घुसतो, धृष्टद्युम्नावर हल्ला करतो. धृष्टद्युम्नाला अश्वत्थामा बोलतो, अरे ब्राह्मणाच्या हत्यारा, आता मी तुला सोडणार नाही. तो त्याच्यावर जोरांने हल्ला करतो. दोघे तुल्यबळ जोराने लढत असतात. द्रोण जेव्हां धृष्टद्युम्नाला पहात तेव्हा ते खद्ध होत असत कारण त्यांना माहीत होते कीं, तो त्यांचा व्याध आहे. त्याच प्रमाणे आता धृष्टद्युम्नाला अश्वत्थामात त्याचा मृत्यू दिसू लागतो. अश्वत्थामा त्याला पाहून बोलतो, "अरे नीच पांचाला, तुला माझ्या पित्याच्या मृत्यूसाठी माझ्या हातून मरावे लागेल. तुला पार्थाचा आधार नसेल तर तू मेलास असे समज. नाहीतर तू माझ्या पुढून निघून जा". ते ऐकून तो प्रिशताचा मुलगा त्याला उत्तर देतो, ज्या तलवारीने तुझ्या पित्याचे डोके कापले त्याच तलवारीने तुझे डोकेसुद्धा मी उडवणार आहे. तू केवळ नांवापुरता ब्राह्मण आहेस, तुझे सगळे क्षत्रियासारखे आहे जे तुझ्या पित्याचे होते तेंच तुझे आहे. असे बोलून तो अश्वत्थामावर बाणांचा मारा करू लागतो. अश्वत्थामासुद्धा तेंच करतो. ते कर्णाच्या समोर होत होते. कर्ण त्यावेळी पांडवांच्या फौजांशी लढत होता. त्यात युधमन्यू व द्रौपदीची मुलं

होती. त्याना सत्यकी मदत करत होता. तो सगळ्यांच्या नजरेत भरत होता. अश्वत्थामा धृष्टद्युम्नचे धनुष्य तोडून टाकतो. त्याचे घोडे मारतो व त्याला बेसहारा करतो. तेव्हां तो त्याची तलवार काढतो. त्याने तो अश्वत्थामाचे धनुष्य बाण तोडतो, अश्वत्थामा प्रिशताच्या मुलाला बाद करू शकत नाही. तो त्याचे धनुष्य खाली ठेवतो व खाली उतरून पांचालाच्या मागे धावत जातो. कृष्ण अर्जुनाला सांगतो आपण धृष्टद्युम्नाला अश्वत्थामापासून वाचवले पाहिजे नाहींतर तो त्याला मारून टाकील. ते अश्वत्थामा जेथे होता तेथे पोहोचतात. त्या दोघाना येतांना पाहून अश्वत्थामा धृष्टद्युम्नाला ठार मारण्यासाठी त्याच्यावर हल्ला करतो. तो त्याला खेचून नेऊ लागतो. पार्थ अश्वत्थामावर अनेक बाण असें मारतो कीं, तो अडकला जातो. द्रोणाचा मुलगा धृष्टद्युम्नाला सोडून देतो. परत त्याच्या रथात येतो. त्याचे धनुष्य घेतो व पार्थावर बाणांचा मारा करू लागतो. त्यावेळी सहदेव धृष्टद्युम्नाला घेऊन जातो. अर्जुन अश्वत्थामाला बाणाने पिंजून टाकतो. अर्जुनाचा एक बाण अश्वत्थामाच्या खांद्याला इजा करतो. त्यामुळे तो बेहाष होतो. ते सगळे कर्ण पहात असतो. तो त्याचे विजय नांवाचे धनुष्य काढतो, व अर्जुनावर वार करणार असतो तेव्हां अश्वत्थामाचा सारथी त्याला घेऊन जातो. पांचालांचे धृष्टद्युम्नासाठी आनंदाने वाद्य वाजवू लागतात. ते झाल्यावर कृष्ण व अर्जुन पुन्हा संसप्तकांच्या मागे जाऊ लागतात.

कर्ण पर्व भाग एकोणसाठावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग साठावा

### (युधिष्ठीर मोठ्या संकटात सापडतो)

संजय पुढे सांगतो, युधिष्ठीराचा उल्लेख करत कृष्ण अर्जुनाला बोलतो, "अरे पार्था, तुझा ज्येष्ठ बंधूचा पाठलाग कौरवांचे सैन्य करत आहे. ते त्याला मारतील अथवा कैद करतील असे दिसते. महारथी पांचाल त्याचे संरक्षण करत आहेत. दुर्योधन त्याची फौज घेऊन युधिष्ठीरा मागे लागला आहे. त्याला त्याचे बंधू मदत करत आहेत. ते सगळे चांगले योद्धे आहेत. त्या प्रचंड फौजेला सत्यकी व भिमाने रोखले आहे. जसे दैत्यांना इंद्राने रोखले होते जेव्हां ते अमृत नेण्याचा प्रयत्न करत होते. परंतु, कौरवांचे ते सैन्य फार मोठे असल्याने त्यांना सर्वस्वी रोखणे शक्य नव्हते, ते पहा पुन्हा युधिष्ठीराकडे जात आहेत. असेंच होत राहीले तर युधिष्ठीर दुर्योधनाच्या कब्जात जाण्याचा धोका आहे. दुर्योधनाचे सैन्य उत्तमरित्या सज्ज आहे, त्याचा व्युहसुद्धा चांगला आहे त्यामुळे युधिष्ठीर खरोखरच फार मोठ्या संकटात आहे. एकदा कर्णांने त्याला हरवले होते पण जाऊ दिले होते परंतु, ह्यावेळी तसे जाऊ दिले जाणार नाही. दुर्योधन त्याचा वध करील अथला त्याला कैद करील. दोनही गोष्टी पांडवांसाठी नाकुष्कीच्या असतील. त्यात पुन्हा युधिष्ठीर जी व्रतवैकल्ये करतो त्यामुळे अशक्त झाला आहे. त्याच्या अतिसात्त्विक प्रवृत्तीमुळे त्याचे क्षात्र तेज कमी झालेले आहे. जो दोष अर्जुनामध्येसुद्धा आढळतो. मला वाटते बहुतेक करून तो हरला आहे. भिमाचे ओरडणे थांबले आहे आणि धृतराष्ट्राचे जोरजोराने शंखू वाजवून विजयाचे दाखवत आहेत त्यावरून मला वाटते की, कदाचित युधिष्ठीर मारला गेला आहे. कर्ण युधिष्ठीरावर विविध अस्त्र वापरत आहे त्याचा अर्थ काय समजावयाचा? ते पहा पांचाल व पांडव सैनिक त्याच्या मदतीसाठी धावत आहेत. राजाचा झेंडा कोठे दिसत नाही. कदाचित कर्णाने तो पाडला असेल. ते सगळे नकूल, सहदेव, सत्यकी, धृष्टद्युम्न, शिखंडी ह्यांच्या समक्ष होत आहे कां? कर्ण आपल्या फौजांचा नाश करत आहे. आपले योद्धे रणभूमी सोडून पळत आहेत. त्यांचे ओरडणे ऐकू येते. कर्णाचा झेंडा दिमाखात फडकत आहे तो दिसत आहे. आता कर्ण भिमसेनावर चालून गेला आहे. ते करत

असतांना तो पांडवांचे सैन्य मारत आहे. कर्ण तुला त्या रणभूमीत शोधत आहे. कर्णाचे शौर्य पाहून कौरवांचे सैनिक त्याचे कौतुक करत आहेत. तो त्याच्या योद्ध्याना उत्तेजन देण्यासाठी भाषण देत आहे. तो त्यांना आदेश देतो कीं, ते पांडवांवर चालून जातील. संघटीत रहा, एकत्र हल्ला करा, श्रींजयाना जीवंत सोडू नका. असे सारखे तो त्याच्या सैनिकांना सांगत होता. त्याच्या डोक्यावर शुभ्र रंगाची छत्री होती. तिला शंभर काड्या होत्या. तो बाणांचा वर्षाव करत असतांना अर्जुन कोठे दिसतो कां ते शोधत होता. त्याची नजर अखेरीस तुझ्या झेंड्यावर पडते. तो कपीमुद्रा असलेला झेंडा फडकत होता. ते पहाताच कर्ण त्याच्या सारथ्याला त्या दिशेने रथ नेण्यास सांगतो. तो अर्जुनाच्या दिशेने बाण मारावयाला सुरूवात करतो. त्याचा उत्साह भिववणारा होता. कर्ण त्याच्या मृत्यूकडे झेपावतो. जसे मच्छर ज्योतीवर झेपावते. दुर्योधनाच्या भल्यासाठी तो ते करत होता. कर्णाला एकटा अर्जुनाकडे वेगांने जातांना पाहून दुर्योधन कांहीं ठरवून त्याच्याकडे जातो. त्या पापी दुर्योधनाचा सुद्धा तू वध करावास म्हणजे सगळे युद्ध संपेल. कर्णावर तू असा वार कर कीं सगळे बघत बसतील. कर्ण मोठ्या त्वेषाने तुझ्याकडे येत आहे. त्याला थाबवणे दुर्योधनाला आता शक्य नव्हते. अरे कुंत्तीपुत्रा, तुला पुण्ण्याच्या मार्गाने सगळे साध्य करावयाचे आहे. तुझ्या क्षमतेचा चांगले करण्यासाठी तुला उपयोग करावयाचा आहे. त्या कर्णावर आता चाल करून जा". कृष्ण सांगत होता. पुढे तो बोलतो, "असंख्य हत्ती, घोडे, रथ एकत्रपणे तुझ्यावर चालून येत आहेत. त्यांना तुझे शौर्य दिसू दे". त्यावेळी कर्ण वेगांने अर्जुनाकडे येत होता. कर्णाचा झेंडा धृष्टद्युम्नाच्या झेंड्या जवळ दिसू लागला. म्हणजे ते दोघे भिडणार होते. ते सांगत असतांना कृष्ण मध्येच बोलतो कीं, युधिष्ठीर जीवंत आहे. भिमाने खूणेने ते कळवले होते. तो पांडवांच्या सैन्याच्या अग्र स्थानी होता. त्याच्या भोवती श्रींजय व पांचाल होते, त्यात सत्यकी होता. ते सगळे कौरवांच्या सैन्याचा नाश करत होते. दुर्योधनाचे सैनिक रक्ताने भरलेले रणभूमी सोडून जात होते. त्यांना थांबवण्याचा कोणी प्रयत्न सुद्धा करत नव्हता. भिमाचे बाण त्यांचा पाठलाग जणू करत होते. कौरवांची बाजू खचलेली दिसत होती. त्यांचे विविध रगाचे व तारे आणि चंद्राच्या प्रतिमा असलेले बावटे रणांगणात इतस्ततः विखरुन पडलेले दिसत होते. धृतराष्ट्राचे हत्ती बेवारशासारखे धावत असतांना पांचालांचे सैनिक भिमाच्या नेतृत्वाखाली त्यांना आणखीन

पळवत होते. पांचाल विजय घोष करत होते. शंखू वाजवत होते. पांचाल कौरवांचा नाश करत होते. पांचालांचा तो विजय वाखाणण्यासारखा होता. पांचालांचा जोर इतका होता कीं, कर्ण, कृप, अश्वत्थामा कोणीही त्यांना आटपू शकत नव्हते. धृष्टद्युम्नाच्या नेतृत्वाखाली ते पुढे जात होते. अरे अर्जुना, भिमाच्या बाणाने मेलेल्या हत्तींची प्रचंड धुडं रणांगणास व्यापून टाकत होती. निशादांचा राजा भिमावर चाल करतो. भिमाचे दहा हत्तीबाण त्याच्या हत्तीला ठार करतात. तो त्या हत्तीबरोबर खाली कोसळतो. भिम एका मागोमाग एक असे हत्ती मारत असतो. त्या हत्तींवर लावलेले झेंडेसुद्ध खाली कोसळत असतात. भिम पुरंदराच्या सारखा जिंकत होता. तीन अक्षौहिणी सैन्य दुर्योधनाचे त्याना बाद केले होते. संजय पुढे सांगतो, ते त्याचे कर्तृत्व पाहून अर्जुनाला आणखीन जोर येतो व तो त्याच्या गांडीवाने कौरवांचे सैन्य मारू लागतो. शूरवीर संसप्तक त्या युद्धात मारले जातात. जे वाचतात ते पळून जातात. बहुतेक यमाच्या घरी अथवा इंद्राच्या घरी जातात.

कर्ण पर्व भाग साठावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग एकसष्ठावा

### (भिमसेनाची कमाल)

धृतराष्ट्र विचारतो, "जेव्हां भिम व युधिष्ठीर कौरवांच्या सैन्याचा संहार करत होते तेव्हां माझे अफाट लष्कर खच्ची झाले होते, तेव्हां माझी मुलं काय करत होती"?

संजय सांगतो, भिमाचा त्वेष पाहून कर्णाला राग येतो. तो त्याच्यावर चाल करतो. पांडवांचे योद्धे सुद्धा न घाबरता कर्णावर हल्ले करू लागतात. भिमसेन, सत्यकी, शिखंडी, जनमेजम आणि धृष्टद्युम्न प्रभद्रकांच्या जोडीने पांचाल योद्‌ध्यांच्या मदतीने कर्णावर चालून जातात. त्याच वेळी कौरवांचे सैन्य पांडवांवर हल्ले करू लागते. मोठा संहार होऊ लागतो. त्यामध्ये शिखंडी कर्णावर वार करतो. धृष्टद्युम्न दुःशासनावर हल्ला करतो. नकूल वृषसेनावर जातो. युधिष्ठीर चित्रसेनावर चाल करतो. त्यांची द्वंद्वे सुरू होतात. सहदेव शकूनीचा मुलगा उलूकशी लढत असतो. सत्यकी शकूनीवर वार करतो. अश्वत्थामा अर्जुनाच्या मागे जातो. कृप युधमन्यूच्या मागे जातात. कृतवर्मन उत्तमौजसाला आव्हान देतो. त्यावेळी भिम त्याच्या अजस्त्र शक्तीने सगळ्या कौरवांवर चालून जातो. भिष्माचा वध करणारा शिखंडी कर्णाला अडवत असतो. कर्णाला तो यशस्वीरित्या अडवतो त्यामुळें कर्णाचा राग अनावर होतो त्याचे ओठ थरथरू लागतात. कर्ण त्या रागात शिखंडीवर जोराचा मारा करतो. शिखंडी कर्णाला नव्वद बाणाने जखमी करतो. त्यानंतर कर्ण शिखंडीचे घोडे मारतो. त्यानंतर त्याचा सारथी मारतो त्याचा झेंडा पाडतो. शिखंडी त्याच्या रथातून उडी मारून खाली येतो व कर्णावर एक जोरदार शलाक फेकतो. कर्ण तो शलाक तोडून टाकतो. त्यानंतर कर्ण शिखंडीला अनेक बाण मारतो. ते सगळे तो चुकवतो. कर्णाला सोडून तो निघून जातो. त्यानंतर कर्ण पांडवाच्या सैन्याचा संहार करू लागतो. आग लागल्यासारखे सगळे पांडवांचे लष्कर मरत होते. त्यावेळी धृष्टद्युम्न दुःशासनाला भोसकतो. त्यामुळे चिडलेला दुःशासन त्याच्यावर कित्येक बाण मारतो. ते बाण धृष्टद्युम्न तोडतो. दुःशासनाच्या छातीत तो बाण मारतो. त्यामुळे चिडलेला प्रिशताचा मुलगा त्याचे धनुष्य तोडतो. ते पाहून कौरवांचे सैनिक मोठ्याने आरडाओरड करतात. दुःशासन धृष्टद्युम्नावर

बाणांची मारा करू लागतो नवीन धनुष्य घेऊन. तुझ्या मुलाचे शौर्य पाहून आकाशातील प्रेक्षक त्याचे कौतुक करतात. धृष्टद्युम्न अडकला आहे हे समजल्यावर पांडवांचे त्याला संरक्षण देण्यासाठी पुढे होतात. दुःशासनाला घेराव घालतात. तेथे युद्ध पुन्हा जोर धरते. वृषसेन त्याच्या पित्याच्या बाजूला सतत रहात असतो. वृषसेन नकुलला बाणाने जखमी करतो त्या बदल्यात नकूल त्याला जखमी करत असतो. त्या दोघांच्या फौजासुद्धा तशाच लढत असतात. तुमच्या कांहीं फौजा रणांगण सोडून जात आहेत असे पाहिल्यावर कर्ण त्याना थांबण्यास सांगत असतो. तो त्या फौजांच्या बरोबर गेल्यावर नकूल कर्णाच्या मुलाशी लढत रहातो. वृषसेन नकूलाला सोडतो व त्याच्या पित्यामागे जातो. सहदेवाने उलूकाचे घोडे मारले होते. त्याचा सारथीसुद्धा मारला होता. उलूक रथ सोडतो, त्रिगर्तांच्या पलटणीत आश्रय घेतो. सत्यकी शकूनीला जखमी करतो. शकूनी त्याचा झेंडा पाडतो. सत्यकी शकूनीला अनेक बाण मारून जखमी करतो. त्याचे घोडे यमाकडे धाडतो. शकूनी त्याचा रथ सोडतो. तो उलूकीच्या रथात चढतो. उलूकी त्याला सत्यकीपासून दूर घेऊन जातो. सत्यकी त्यानंतर तुमच्या फौजांचा नाश करण्याचे काम करू लागतो.

दुर्योधनाला भिम दोनदा रथातून बाहेर फेकतो. ते पाहून पांडवांचे सैन्य आनंद व्यक्त करतात. त्यानंतर दुर्योधन भिमाचा नाद सोडून निघून जातो. त्यावेळी तो सगळ्या कुरु सैन्यास एकत्रितपणे वृकोदरावर हल्ला करण्याचे आदेश देतो. त्या प्रमाणे ते करतात. प्रचंड हलकल्लोळ माजतो. युधमन्यू कृपांना भोसकतो. त्यांचे धनुष्य मोडतो तेव्हां कृप नवीन धनुष्य घेतात. युधमन्यूचा झेंडा पाडतात. त्याची छत्री मोडतात. त्यानंतर युधमन्यू रण सोडून जातो. उत्तमौजस कृतवर्मनावर चाल करतो. त्या दोघांतील द्वंद्व भीषण होते. कृतवर्मन अचानकपणे उत्तमौजसाला छातीत बाण मारतात. तो त्याच्या रथात कोसळतो. त्याचा सारथी त्याला घेऊन रणांगणातून निघून जातो. आता सगळे कुरु सैन्य एकट्या भिमावर चाल करतात. दुःशासन व उलूक हत्तीवर बसून भिमावर लहान बाणांचा वर्षाव करत असतात, भिम त्यावेळी दुर्योधनाला अडवत असतात, ते तो सोडतो व त्या हत्तींकडे निघतो. तो त्याच्या हत्तीबाणाने कित्येक हत्ती ठार मारतो. आकाशात त्याचे बाण तरंगत असलेले दिसत होते. त्याच्या हल्ल्यामुळे ते हत्ती पळून जातात. मेलेल्या हत्तींमुळें रणांगणात फिरणे, रथ चालवणे मुष्किल झाले होते. आकाशातील प्रेक्षक पहात असतात

कीं, भिमाचे दोन बाहू बाणांचा बर्षाव करत आहेत. त्यात ते हत्ती मरत होते. भिमाचे हत्तीना मारण्याचे कसब विलक्षण होते. जसे रुद्र संहार करत आहे.

कर्ण पर्व भाग एकसष्टावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग बासष्ठावा

### (कौरव पळणार्या युधिष्ठीराचा पिच्छा पुरवतात)

संजय पुढे सांगतो, त्यावेळी अर्जुन त्याच्या रथातून कृष्णासह तेथे येतो. तेथे तो तुमच्या घोडेस्वारांना आव्हान देतो. तुमचा मुलगा दुर्योधन त्यामुळे संतापलेला अचानक पुढे येतो त्याची पलटण घेऊन व युधिष्ठीराला घेरा घालतो. तो युधिष्ठीराला अनेक बाण मारतो. युधिष्ठीराला कैद करण्याचा त्यांचा उद्देश असतो. तो उद्देश समजल्यावर पांडवांचे सैन्य त्याच्या संरक्षणाकरता त्याच्याकडे जाते. त्यात नकूल, सहदेव, धृष्टद्युम्न कौरवांच्या अक्षौहिणी सैन्यात घुसतात त्यांच्या राजाला संरक्षण देण्यासाठी. भिमसेन कौरवांचे अनेक रथी नष्ट करत तेथे पोहोचतो. कर्ण त्याच्या मंतरलेल्या बाणांनी त्या पांडवांच्या शूरवीराना अडवण्याची प्रयत्न करत असतो. सहदेव त्याचे दैवी आयुध मंत्राने संपन्न करत दुर्योधनावर फेकतो. त्यामुळे दुर्योधन रक्त ओकू लागतो. दुर्योधनाची ती अवस्था पाहून कर्ण त्याला मदत करण्यासाठी त्याच्याकडे निघतो. कर्ण त्याचे अस्त्र काढतो, युधिष्ठीराचे सैन्य मारू लागतो. ते सेन्य त्या जागेतून पळून जाते. दोनही बाजूचे बाणांचा वर्षाव करत होते. त्या बाणांमुळे आकाश भरून गेले होते. त्याने युधिष्ठीराला त्याच्या बाणांनी जबर जखमी केले होते. त्यामुळे चिडलेला पांडव कर्णावर जोराचा मारा करू लागतो. त्यांचे द्वंद्व विलक्षण होते. पहाणारे भयचकीत झाले होते. कौरवांचे सैन्य धर्माचा मुलगा मारत होता. त्या मारामुळे तुमचे सैन्य पांगून गेले. कर्णाला ते सहन होत नाही. तो युधिष्ठीरावर बाणांचा मारा करू लागतो. युधिष्ठीरसुद्धा त्याला बाण मारत असतो. त्यावेळी कर्ण स्मित हास्य करत धर्माच्या मुलाच्या छातीत तीन बाण मारतो. त्यामुळे तो बेहोष होतो व रथातच पडून रहातो. तो त्याच्या सारथ्याला परत फिरण्याचा आदेश देतो. ते पाहून धृतराष्ट्राचे त्याला कैद करण्यासाठी पुढे सरसावले ते लक्षात येताच पांडवांचे केकया सतराशे योद्धे त्यास संरक्षण देण्यासाठी पुढे होतात. त्यावेळी भिम दुर्योधनाला अडवतो व त्याच्या भावाकडे जाऊ देत नाही.

कर्ण पर्व भाग बासष्ठावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग त्रेसष्ठावा

### (युधिष्ठीर त्याच्या तंबूत परततो)

संजय पुढे सांगतो, त्यावेळी कर्ण त्याच्या बाणांचा वर्षाव कैकेयांवर करू लागतो, कर्णाच्या समोर जे आले त्या सगळ्यांना कर्ण यमाकडे पाठवतो. ते सगळे पांचशे होते. कर्णाचा जोर पहाता पांडवांचे योद्धे भिमाच्या आश्रयाला जाणे पसंत करतात. रथांचे नुकसान करत कर्ण युधिष्ठीराच्या मागे लागतो. त्यावेळी युधिष्ठीर बाणांच्या जखमाने व्यथीत झालेला त्याच्या रथातून पांडवांच्या तळावर उपचार करण्यासाठी जात होता. त्याला नकूल व सहदेव नेत होते. युधिष्ठीराच्या त्या परिस्थितीचा जरासाही विचार न करता कर्ण त्याच्यावर बाण मारतो. परंतु, युधिष्ठीर त्यांने न डगमगता कर्णाच्या छातीत बाण मारतो. त्यानंतर माद्रीचे दोघे कर्णावर तुटून पडतात. कर्ण त्याना प्रतिकार करत त्यांचे घोडे मारतो. त्यानंतर कर्ण युधिष्ठीराचा जिरोटोप तोडतो. त्यानंतर कर्ण नकूलाच्या रथाचे असे नुकसान करतो कीं, ते दोघे सहदेवाच्या रथात चढतात. त्यावेळी त्यांच्या मामाला त्यांची दया येते. सल्य करणाला सांगतो कीं, तो त्याचा समय ह्यांच्याशी लढण्यात व्यर्थ घालवत आहे. त्यांने पार्थाचा शोध घ्यावा व त्याला आव्हान द्यावे. ह्यांच्याशी लढण्यात तुझे शस्त्र संपदा कमी होत आहे, तू थकत आहेस, तुझा भाता रिकामा होत आहे, अशाने जर तू त्या अवस्थेत पार्थाला भेटलास तर तुझी हार निश्चित होणार म्हणून तू तुझी सगळी शक्ती पार्थावर खर्च केली पाहिजेस. अशा छोट्या लोकांशी लढण्यात तुझा वेळ व्यर्थ घावलू नकोस. जर पार्थाने तुला पटकन मारले तर तुझी काय इज्जत राहील त्याचा विचार कर. योद्धा नेहमी त्याच्या बरोबरीच्या योद्‌ध्याशी लढतो. ते ऐकूनही त्याकडे दुर्लक्ष करत कर्ण युधिष्ठीरीवर बाण मारत रहातो. तो युधिष्ठीराला रणभूमीतून पळून लावतो तेव्हांच त्याच्या मनाला शांती मिळते. सल्याचा सल्ला कर्ण मानत नाही तेव्हां सल्याला मनातल्या मनात राग आलेला असतो पण तो न दाखवता तो हसत बोलतो, "ज्याला मारण्यासाठी दुर्योधनाने तुझी नेमणूक केली त्याच्याकडे जा, अरे कर्णा. ह्या युधिष्ठीराला मारून काय मिळणार आहे आपल्याला. तो आधीच मेलेला आहे. ते दोघे कृष्ण त्यांचे शंखू वाजवून तुला आव्हान देत

आहेत त्याकडे तू कां दुर्लक्ष करत आहेस? काय तू अर्जुनाशी लढण्याचे टाळत आहेस कां? तो अर्जुन कौरवांचे सैन्य बरबाद करत आहे तेथे लक्ष दे ह्यांना सोडून दे. तेथे पहा, अर्जुन आपल्या फौजांचा खत्मा करत आहे. त्याला सत्यकी व धृष्टद्युम्न पुढून व युयुधन व उत्तमौजस मागून संरक्षण देत आहेत. भिमसेन आपली सगळी सेना मारत चालला आहे अशा वेळी युधिष्ठिराकडे वेळ व्यर्थ घालवू नकोस. भिम दुर्योधनाशी लढत आहे व तो त्याला मारत आहे. अशावेळी तू तेथे असले पाहिजेस". दुर्योधन जर भिमाकडून मारला गेला तर युद्ध संपले असे होईल. जा तुझ्या राजाला संरक्षण दे". दुर्योधन संकटात आहे हे समजल्यावर कर्ण भानावर येतो व माद्रीच्या मुलांना सोडून त्या ठिकाणी जाण्याचे सांगतो. कर्ण त्यांचा पिच्छा पुरवणे बंद करतो व भिमाकडे निघतो. तेव्हां युधिष्ठीर नकूल आणि सहदेव त्यांच्या ठिकाणी जाऊ शकतात. अत्यंत जखमी अवस्थेत राजा त्याच्या बिछान्यावर निजतो, तेथे त्याला औषधोपचार सुरू होतात. आपल्या ज्येष्ठ भावाला सोडून माद्रीचे दोघे लढण्यासाठी पुन्हा  जातात. तेथे गेल्यावर ते आपापली जागा घेतात.

कर्ण पर्व भाग त्र्याहत्तरावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग चौसष्ठावा

### (युद्ध पुढे चालू आहे)

संजय पुढे सांगतो, अश्वत्थामा त्याचा फौजेसह पार्थाच्या जवळ जाऊ लागतो. अर्जुन कृष्णाच्या सानिध्यात त्या फौजेला सामोरी जातो. अश्वत्थामा त्या दोघांवर बाणांचा वर्षाव करतो. ते दृष्य सगळे पहात असतात. अर्जुन ब्रह्मास्त्र काढतो. परंतु, अश्वत्थामा ते बाद करतो. अर्जुनची सगळी आयुध तो बाद करत असतो. त्यावेळी अश्वत्थामा यमासारखा दिसत होता. तो वासुदेवाला आठ बाण मारतो. अर्जुन त्याच्या बाणाने कौरवांचे सगळे घोडे मारून टाकतो. जमिनीवर रक्ताचा पाट वाहू लागतो. अश्वत्थामाचे मोठे सैन्य त्यांने मारलेले असते. अश्वत्थामासुद्धा तेंच करत असतो. दोनही बाजूंचे सैनिक मरत असतात. त्यामुळे एकच गोंधळ उडालेला असतो. अश्वत्थामा अर्जुनाला लक्ष्य करून बाण मारु लागतो. अर्जुन त्याचे धनुष्य तोडतो. ते झाल्यावर अश्वत्थामा काटेरी गदा घेऊन अर्जुनावर वार करतो. अर्जुन त्याच्यावर बाणांचा मारा करू लागतो. त्यात ती गदा मोडून जाते. त्यामुळे चिडलेला अश्वत्थामा ऐंद्र आयुधाने अर्जुनाला घेरण्याचा प्रयत्न करू लागतो. त्याचे बाण आकाशातून अर्जुनावर येत असतात. अर्जुन ते ऐंद्र बाद करतो. अर्जुनाच्या बाणांच्या मारामुळे त्रस्त झालेला अश्वत्थामा कृष्णावर हल्ला करतो. शंभर बाण त्याच्यावर तो फेकतो. अर्जुन त्यावर प्रतिहल्ला करतो. त्यात अश्वतथामाचे सगळे अंग बाणाने भरते. तरी तो कृष्णावर बाण मारत रहातो. एका हातात घोड्यांची लगाम धरून तो बाण मारत असतो. सगळे त्याचे कौतुक करतात. थोड्याच वेळांत त्याचे घोडे रथातून निसटतात व पळून जातात. ते पाहून एकच आरडाओरड ऐकू येते. त्यावेळी पांडवांची सरशी होत असल्याने ते जोराचा मारा करतात कौरवांवर.

शकूनी आणि कर्ण थांबवल्या सारखे दिसतात. त्यांचे सैन्य पळून जाऊ लागते. कौरवांचे सैनिक कोणाचेही न ऐकता रणभूमी सोडून जात असतात. त्यामुळे व्यथित झालेला दुर्योधन कर्णाला बोलतो, "अरे कर्णा पहा आपले सैन्य निघून जात आहे. तुझ्या असण्याचा कांहीही फायदा मला होत नाही. कांहीं असे कर की परिस्थिती सुधारेल. दुर्योधनाचे ते बोल ऐकून कर्ण त्याच्या सारथ्यास, सल्याला सांगतो कीं, "आता माझ्या आयुधांची

करामत पहा. आज मी सगळे पांडव मारून टाकणार आहे. तुझ्या घोड्यांना वेगांने पळव. त्यानंतर तो त्याचे जुने व प्रसिद्ध धनुष्य विजय घेतो, त्यावर मंत्रविधी करून भार्गव अस्त्र लावतो व ते रणांगणात सोडतो. त्या बरोबर त्यातून लक्षावधी छोटे बाण निघतात व सगळ्या रणांगणात पसरतात. पांडवांच्या सैन्याला त्यामुळे कांही दिसेनासे होते. एकच गोंधळ उडतो. ते जोराजोराने ओरडू लागतात. त्यामुळें हत्ती बिथरतात. पांडवांचे असंख्य सैनिक, घोडे, हत्ती कोसळून पडतात. ते पाहून कर्ण फार खूष झालेला दिसत होता. अशारितीने संहार झाल्याने पांचाल व छेड्डी सैनिक त्यांचे संतुलन बिघडल्याने बेचैन झालेले दिसतात. आता पांडवांवर रणांगण सोडून जाण्याची पाळी आली होती. तो भयंकर संहार पाहून सगळे प्राणी घाबरून गेले होते. श्रींजयाचे लोक अर्जुनाला व कृष्णाला हांका मारत होते. जसे यमाच्या राज्यातील यमाला हांका मारतात. ते पाहून अर्जुन कृष्णाला बोलतो, "ते पहा भार्गव अस्त्राचा परिणाम. ते कधीच बाद करता येत नाही. कर्णाचा रुबाब पहा. साक्षात यमाचा अवतार वाटतो. तो माझ्याकडे संतापलेल्या नजरेने पहात आहे. मला त्याच्याशी लढावेच लागेल. लढाईत एकतर जिंकणे असते अथवा हरणे. मृताला त्याचा मृत्यू हेच यश असते. कारण तो सर्व गोष्टींतून मुक्त झालेला असतो. कृष्ण त्याला आठवण करून देतो कीं, त्याने (अर्जुनाने) युधिष्ठीराला वचन दिले आहे कीं, तो कर्णाचा वध आज करणार आहे. कर्णाला थकवा येत असतो तसा तुम्हा पांडवांना येत नाही ह्याचा फायदा तू उठवला पाहिजेस. ते प्रथम ठरवतात कीं, ते जाऊन त्यांच्या राजाची प्रकृती कशी आहे ते पहातील व नंतर कर्णाचा परामर्श घेतील. ते दोघे रणांगणात पहात असतात कीं, त्याना कोठे कोण दिसते. अश्वत्थामाचा पराभव केल्यानंतर आता तो कर्णाचा नाश करणार असतो. त्यासाठी कर्णाच्या मृत्यू योगाची ते दोघे प्रतिक्षा करत असतात. कारण त्याशिवाय त्याच्याशी लढून कांही साध्य होणारे नसते. कर्णाचा मृत्यूयोग समीप येत होता तरी तो थोडा दूर होता म्हणून ते दोघे त्या वेळांत त्यांच्या राजाला भेटून येण्याचे ठरवतात.

कर्ण पर्व भाग चौसष्ठावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग पासष्ठावा

संजय पुढे सांगतो, अश्वत्थामाचा पराभव करून धनंजय पांडवांच्या सैन्याचा उत्साह वाढवतो. ते अधिक जोमांने लढू लागतात. तो त्याचा भाऊ कोठे दिसतो कां ते पहात असतो. तो भिमाला विचारतो कीं त्यांचा राजा कोठे दिसतो कां"? भिम सांगतो, "तो युद्धभूमी सोडून गेला आहे. त्याला भारी जखमा झाल्या आहेत. कर्णाने त्याला जखमी केले आहे. त्याला घेऊन तंबूत उपचारासाठी नेले आहे. तेव्हां तू तेथे जाऊन राजाला काय होत आहे रणभूमीत ते सांग". पुढे भिम त्याला बोलतो, "मी जर आता येथून हललो तर कोणी समजतील कीं मी घाबरलो आहे तसे होऊ नये म्हणून तू त्याच्याकडे जा.

अर्जुन त्याला सांगतो, ते संसप्तक माझ्या पलटणीच्या समोर आहेत. त्यांना हटवल्या नंतरच मी जाऊ शकतो. ते ऐकल्यावर भिम त्याला सांगतो, "माझ्या शक्तीवर विश्वास ठेव मी त्यांना आवरीन. तू त्वरित राजाकडे जा.

संजय पुढे सांगतो, त्याचे आश्वासन स्वीकारून अर्जुन त्याप्रमाणे जाण्याचे ठरवतो व कृष्णाला तसे सांगतो.

संजय पुढे सांगतो, ते निघण्या आधी कृष्ण भिमाला बोलतो, "अहो भिमदेव, आम्ही तेथे जात आहोत. येथे कौरवांचे जे आहेत त्यांचा संहार करून टाक". त्यांनतर हृषिकेष त्वरने रथ काढतो. ते युधिष्ठीराला भेटण्यासाठी निघतात. ते पहातातच कीं, राजा त्याच्या बिछान्यावर झोपलेला आहे. ते पहातातच कीं, राजा सुरक्षित आहे. ते पाहून त्यांना संतोष होतो. युधिष्ठीर त्यांचे हर्षभराने स्वागत करतो. जसे बृहस्पतीने शंकर व विष्णूचे स्वागत केले जेव्हां ते असुर जांभाचा वध केल्यानंतर त्याला भेटले होते. युधिष्ठीराला वाटत होते कीं अर्जुन कर्णाचा वध करून ते सांगण्यासाठी आला आहे. त्याप्रमाणे तो राजा त्यांना असे बोलतो,

कर्ण पर्व भाग पासष्ठावा संपला.

## कर्ण पर्व

## भाग सहासष्ठावा

संजय पुढे सांगतो, युधिष्ठीर बोलतो, "अरे कृष्णा व धनंजया तुमचे स्वागत असो. तुम्हा दोघांचे दर्शन मन प्रसन्न करते, अरे अच्युता व धनंजया. तुम्ही जखमी न होता कसे लढता ते मला समजत नाही. तो धृतराष्ट्रींचा नेता कर्ण सगळ्या प्रकारची शस्त्र अस्त्र घेऊन लढत आहे. त्याला त्याचे मुलगे वृषसेन व शुशेना संरक्षण देत असतात. दोघे मोठे धनुर्धारी आहेत. त्याच्याकडे भार्गवाकडून घेतलेली शस्त्र व अस्त्र आणि आयुध आहेत. त्यांच्या मदतीने तो धृतराष्ट्राला वाचवत असतो. तो कौरवांचे नेतृत्व करत आहे. तो मोठ्या संख्येने आपले सैन्य मारत आहे. तो अग्नीदेवांसारखा शक्तिमान व वायूदेवासारखा वेगवान आहे. ते त्याच्या मित्रांचा त्राता आहे. त्याचे व्यक्तीमत्व धीरगंभीर आहे. त्याचा वध करण्यानेच आपले काम होणार आहे. जसे असुरांचा नाश केल्यानंतर देवांना शांती मिळाली तसे होणार आहे. आज अहो अच्युत व अर्जुन ऐका, मी आज कर्णाशी लढलो, त्याला ठार मारण्याचा प्रयत्न करत होतो. त्याने माझे झेंडे व स्तंभ पाडले. माझ्या दोघा सहकार्यांचा वध केला. माझे घोडेसुद्धा त्याने मारले. मी बेसहारा झालो होतो. तेवढ्यात युयुधन, धृष्टद्युम्न, नकूल व सहदेव आणि द्रौपदीची मुलं तेथे होती ती तेथे आली व मला घेऊन येथे आली. कर्णाने माझा पराभव केला होता. मी माझी शक्ती पणाला लावली होती. तो कर्ण माझा सतत अपमान करत होता. मी आजवर जीवंत आहे कारण भिमाची व तुझी ताकद. मी आणखीन काय बोलणार? मला तो अपमान सहन होत नाही. त्या कर्णाच्या भयाने मला झोप लागत नाही. मला त्याचा फार तिरस्कार वाटतो. मला वाटते माझा अंत जवळ आला आहे. कर्णाचा नाश झाला नाही तर मी मरणार आहे. मला तो सगळीकडे दिसतो. मला तो सहजपणे मारू शकला असता पण त्याने मला मारले नाही. मला माझा धिक्कार वाटतो. असा माझा अपमान कधी झालेला नाही. म्हणून मला सांग कीं, तू त्या कर्णाचा नाश केव्हा करणार आहेस? तो लढण्यात इंद्रासारखा आहे. त्याची हिम्मत यमासारखी आहे. तो धृतराष्ट्रींचा तारा आहे. त्याला तू कसे मारणार ते सांग. सगळ्यांच्या समक्ष त्याचे डोके उडवून दे. त्याचा उद्धटपणा मला फार त्रास देतो. तो तुला नेहमी

आव्हान देत असतो मग तू ते कां घेत नाहीस. त्याला तुझ्या बाणांने भरलेला व जमिनीवर पडलेला पहावयाचा आहे. तो दुर्योधना पुढे सांगत असतो कीं, तो तुला मारणार आहे. त्यानेसुद्धा प्रतिज्ञा घेतली आहे की, तो तुला मारल्याशिवाय धृतराष्ट्राचे पाय धुणार नाही. तो कृष्णाला सभेत बोलला होता, तो कृष्णाला व धनंजयाला ठार मारल्याशिवाय परत येणार नाही. तो सांगत होता पांडव कमजोर आहेत, त्याचा मुडदा त्याच रणभूमीत मला पहावयाचा आहे. अरे सव्यसाची मला शब्द दे कीं तू त्याचा वध आज करणार आहेस. मला त्याचे डोके त्याच्या शरीरापासून तुटलेले पहावयाचे आहे. तू माझे म्हणणे समजतोस कां? भिष्माने त्याला फक्त अर्धा रथी म्हणून सांगितले होते. माझ्या हृदयातील आग तेव्हांच शमेल जेव्हां तो मारला जाईल. त्याचा वध झाला आहे असें वृत्त मला ऐकावयाचे आहे. म्हणून मला सांग ते तू कसे साध्य करणार"? जसे विष्णू इंद्राची प्रतिक्षा करतो वृत्राच्या वधाची वार्ता ऐकण्यासाठी तसा मी तुझी प्रतिक्षा करत रहाणार आहे.

कर्ण पर्व भाग सहासष्ठावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग सदुसष्ठावा

संजय पुढे सांगतो, युधिष्ठीराचे ते रागावून बोलणे ऐकल्यावर जिश्नू त्याला सांगतो कीं, "संसप्तकांबरोबर लढत असतांना तेथे द्रोणांचा मुलगा आला. तो कौरवांच्या सैन्याचे नेतृत्व करत होता. त्याचे विषारी बाण तो मारत होता. मला पाहून तो व त्याचे सैनिक मला गराडा घालतात. त्याचे पांचशे सैनिक मी मारतो. त्यानंतर मी व द्रोणांचा मुलगा लढू लागतो. तो त्या कौरवांच्या लष्कराला संरक्षण देण्यासाठी प्रयत्न करत होता ज्यांना मी मारत होतो. तो मला व कृष्णाला बाण मारतो. आठ बैलगाड्या भरून बाण व शलाक तो आणत असतो व आमच्यावर मारत होता. परंतु, ते सगळे मी उलटवत होतो. त्यानंतर तो माझ्यावर वार करतो. हजारो बाण मारतो. त्या बाणांमुळें काळी ढगं तयार होतात. त्याच्या हाताची चपळाई विलक्षण होती. स्वतः भोवती फिरत तो चौफेर बाण फेकत होता. मला व कृष्णाला तो पांच बाण मारतो. ते मी उलटवतो. त्यामुळे त्याच्या अंगावर इतके बाण लागतात कीं, तो साळूंखी सारखा दिसू लागतो. त्याच्या अंगातून रक्ताच्या धारा लागतात. त्यांनतर तो कर्णाच्या संरक्षणात जातो. मी त्यांचे सैन्य मारत आहे ते पाहून कर्ण माझ्याकडे येऊ लागतो. त्याच्या मदतीला त्यांचे पन्नास रथी होते. त्या सगळ्यांना मी यमाकडे धाडतो. त्यानंतर मी आपल्याकडे आलो आहे कारण आपण मला बोलावले आहे. पांचाल तेथे कर्णाच्या माराने बेजार झाले आहेत. प्रभाद्रक जोराने लढत आहेत. परंतु ते सगळे कर्णाच्या पुढे फार काळ टिकणार नाहीत. त्यातील बर्याच जणांना त्याने यमाकडे धाडलेले आहे. तो मला शोधत असतो. आपण अश्वत्थामाशी लढत होता. त्यांने आपल्याला जबर जखमी केले आहे. त्यानंतर कर्णाचा व आपला मुकाबला झाला. आता आपण आराम करत अहात मला आशा आहे आपण मजेत अहात. मी भार्गव अस्त्राचा प्रयोग पहात आहे रणभूमीत. आता श्रींजयांत कोणी लढवय्या उरलेला नाही. आता फक्त सत्यकी व धृष्टद्युम्न उरले आहेत. ते मला संरक्षण देणार आहेत. पांचालांतील युधमन्यू व उत्तमौजस मला मागून संरक्षण देणार आहेत. आपण त्या महान लढवय्या कर्णाशी लढलात असे समजले. त्याने आपल्याला असे जखमी केले तेसुद्धा समजले. काळजी करू नका,

मी त्याचा आज परामर्श घेणार आहे. आमचे द्वंद्व पहाण्यासाठी आपण याल तर मला बरे वाटेल. तेथे प्रभाद्रक जोराने मुसंडी मारत आहेत कौरवांच्या सैन्यावर. त्यांच्यातील सहा हजार लढत आहेत. ते सगळे स्वर्गात लवकरच जातील. मी माझे सगळे पणाला लावून कर्ण व त्याचे सगळे मारून टाकणार आहे, नाहीतर मी मरणार आहे. मी माझी प्रतिज्ञा आज पूर्ण करणार आहे. मला आपल्या आशिर्वादाची आवश्यकता आहे. तेथे पलिकडे भिम जोरांने लढत आहे. मी कर्णावर लक्ष केंद्रीत करणार आहे".

कर्ण पर्व भाग सदूसष्ठावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग अडूसष्ठावा

संजय पुढे सांगतो, कर्ण अजून जीवंत आहे हे समजल्यावर पांडवांचा मोठा अर्जुनावर फार रागावतो. त्या क्रोधाच्या भरात तो पार्थाला बोलतो, "अहो महाशय, आपल्या सैन्याचा सर्वकडे पराजय होत आहे, त्याची थोडी लाज आपल्याला वाटते कां? भितीने तू भिमाची साथ सोडून कर्णाला मारू न शकल्यामुळें स्वताच्या मातेच्या कुशीचा असा अपमान करतो आहेस कीं त्याची कोणालाही लाज वाटावी. भर युद्धात भिमाची साथ सोडण्याची चूक तुझ्याकडून झाली आहे. द्वैतवनात तू मला आश्वासन दिले होतेस कीं, कर्णाचा पराभव तू एकटा करणार आहेस. अरे पार्था, तू आता भित्रेभागूबाई सारखा कारणं देत ते करण्याचे टाळत आहे". जर तू तेथे मला बोलला असतास कीं तू कर्णाचा वध करू शकणार नाहीस तर मी त्याप्रकारची अपेक्षा तुझ्याकडून केलीसुद्धा नसती. तसे झाले असते तर कर्णाचा बंदोबस्त मी दुसर्या प्रकारे करण्याचे योजले असते. परंतु, तू खोटी आश्वासनं देत गेल्यामुळें आता ही परिस्थिती उपस्थित झाली आहे. असे तू का केलेस ते मला समजले पाहिजे. तुझ्या कडून मोठ्या अपेक्षा मी करत राहीलो व त्याप्रमाणे तुला दुवा देत गेलो, परंतु, तू खोटा निघाला आहेस ह्याचे मला मनस्वी दुःख होत आहे. असा विश्वासघात तू कां केला आहेस"? तुझ्या हिम्मतीने आम्ही आमचे गेलेले राज्य मिळवण्याचे योजत आहोत. त्यावर पाणी पडणार कीं काय अशी चिंता मला खात आहे. गेली तेरा वर्षे आम्ही तुझ्या कर्तृत्वाच्या आशेने जगत आलो आहोत. जसा शेकतरी पावसाच्या भरवशावर बियाणे पेरून वाट पहात असतो तशी आमची गत झाली आहे. मला आमची आई सांगते कीं, तू जन्मलास तेव्हां आकाशवाणी बोलली कीं, तिच्या पोटी दुसरा इंद्र जन्मलेला आहे. तो सगळे दुर्जन नष्ट करील. तू खांडव वनातील सगळे पराभूत करशील. तू मद्र, कलिंग, कैकेया सगळे मारशील. तो कौरवांचा नाश करील, त्याच्यापेक्षा सरस धनुर्धारी जगात होणार नाही. हा पुत्र सगळ्या ज्ञानाच्या शस्त्राच्या शाखा आत्मसात करून सगळे जग पादाक्रांत करील. तो सौंदर्यात सोमाचा दुसरा अवतार असेल, वेगात वायू असेल, संयमांत मेरु पर्वत असेल, तेजात सूर्य असेल, धाडसात इंद्र असेल, पराक्रमात विष्णू असेल, तो

सगळ्या शत्रूंचा नाश करील, तो मित्राचा रक्षण कर्ता असेल, तो त्याची घराणेशाही संपन्न करील, असे अनेक ऋषींच्या समक्ष ती वाणी झाली. परंतु, प्रत्यक्षात जे दिसत आहे ते मात्र विपरीत आहे. काय देवसुद्धा असत्य बोलतात कां? तुझी स्तुती करणारे अनेक ऋषी मला भेटले आहेत ते सगळे खोटी स्तुती करत होते असें समजावयाचे कां? दुर्योधनाचा विजय होणार आहे कां? कारण तू कर्णाला भित आहेस. तू उत्तम घडणावळ असलेल्या रथातून जातोस, तुझा सारथी तुझ्या पसंतीचा तुझा सखा आहे. मग कोठे कमी आहे कीं तू कर्णाला तोंड देण्यास घाबरत आहेस? तुला संरक्षण देणारी कपीमुद्रा आहे, तुझी तलवार उच्च दर्जाच्या पोलादाची आहे. हा तुझा अद्वितीय तिरकमटा, गांडीव तुझ्याकडे आहे. अशा परिस्थितीत कर्णाशी दोन हात करण्यास तू कां, कां कूंकरत आहेस "? अरे तू इतका नालायक ठरत आहेस कीं मी आज्ञा करतो कीं, तू ते गांडीव कृष्णाला दे व तू सारथ्य कर कारण तुझी तींच योग्यता आहे असे मला एक राजा म्हणून वाटत आहे. कृष्ण त्या गांडीवाने कर्णाचा वध लिलया करून टाकेल ह्याबद्दल होणालाही शंका नसावी. जर आज तुला कर्णाला मारता आले नाही तर तींच माझी आज्ञा असेल व त्या प्रमाणे कृष्ण गांडीव चालवेल व तू तो रथ चालवशिल. कृष्णाने नाही घेतले तर दुसर्या कोणा योग्य जसे सत्यकी, धृष्टद्युम्न अशाना ते गांडीव दे व तू आराम करत बस. तसे केलेस तर आपला जो अपमान होऊ घातला आहे तो टळेल. ते चांगले झाले असते जर तू कुंतीच्या पोटी जन्मला नसतास. असे दुर्भाग्य आम्हाला पहावे लागले नसते. तुझ्या सर्वच गोष्टींचा मी धिक्कार करत आहे. त्या सगळ्या उत्तम गोष्टींचे नाव तुझ्या नालायकपणामुळे खराब होत आहे.

कर्ण पर्व भाग अडूसष्ठावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग एकोणसत्तरावा

संजय पुढे सांगतो, असे युधिष्ठीर बोलल्यानंतर अर्जुन रागात त्याची तलवार काढतो. ते पाहून केशव त्याला विचारतो, "अरे तू कां तलवार उपसली आहेस, येथे मारण्यासारखे कोणी नाही. तूर्त भिमसेन कौरवांचा परामर्श घेत आहे. तू युद्धावरून आला आहेस, युधिष्ठीराला भेटण्यासाठी. तो आता बरा आहे. अशावेळी अशी तलवार काढण्याचे कारण काय? तुझ्या मनात कांही गोंधळ झाला आहे कां"? कृष्णाचे ते बोल ऐकून पार्थ युधिष्ठीराकडे रागावून पहात बोलतो. "मी त्या माणसाचे डोके उडवणार आहे जो मला सांगेल कीं, मी माझे गांडीव दुसर्याला द्यावे आणि तशी त्याची इच्छा आहे असे तो सांगतो आहे. असे हा माणूस सांगत आहे असे मला समजले. मी त्याला कधीच माफ करणार नाही. हा माणूस त्याच्या पुण्याची फार जपणूक करत असतो. तसे करून मी माझी प्रतिज्ञा पूर्ण करीन. त्याकरता मी तलवार उपसली आहे. त्याला मारून मी सत्याचे ऋण फेडणार आहे. तसे केल्यांने माझ्या मनाला आराम मिळेल. मी अशा परिस्थितीत काय करावयाला पाहिजे असें तुला वाटते"?

संजय पुढे सांगतो, गोविंदा त्यावर बोलतो, "छे, छे, पार्था, तुला मोठ्यांशी कसे वागावयाचे ते अजून समजत नाही. तू रागावतोस जेव्हां तू रागावले नाही पाहिजेस. नितीशास्त्र शिकलेला कोणी अशाप्रकारे वागत नाही. वरवर पहाता योग्य वाटणार्या बर्याच वागणूकी शास्त्राप्रमाणे अयोग्य असतात हे लक्षात घे. ज्याला काय योग्य व काय अयोग्य ते समजत नाही त्यांचा असा गोंधळ होत असतो. अरे पार्था, तू आता तशा अवस्थेत आहेस असें दिसते. त्यासाठी शास्त्राचा चांगला अभ्यास करावयाला पाहिजे. तू स्वताला मोठा नितीमान समजत आहेस. परंतु, तसे नाही असे तुझ्या ह्या वागण्याने दिसत आहे. अरे पार्था, मुक्या प्राण्याना निष्कारण मारणे पाप आहे. तो मोठा गुण समजला जातो. खोटे बोलले तर चालेल पण निष्कारण मारणे चालणार नाही. असें असतांना तू तुझ्या ज्येष्ठ बंधूला ठार मारण्याच्या गोष्टी कशा करू शकतोस? लढत नसलेला, पळून जाणारा, शस्त्र खाली ठेवलेला, जखमी, अशांवर वार करावयाचा नसतो असे युद्धशास्त्र सांगते. ते सगळे

नियम तू पाळतोस. मग आता तू तुझ्या निःशस्त्र भावाला कसा मारण्यासाठी पुढे झालास? पुढचा पाठचा विचार न करता तू असे कसे करत आहेस"? मी तुला सांगतो त्या मागील रहस्य जे भिष्माने युधिष्ठीराला सांगितले होते. तेंच विदूराना सांगितले तसेंच कुंतीनेसुद्धा सांगितले आहे. ते रहस्य मी तुला समजावून सांगतो. ते ऐक, सत्यापेक्षा श्रेष्ठ कांहीं नाही. परंतु, सत्य काय ते समजणे प्रथम फार अवघड असते. त्याची लक्षणं समजली तरच सत्य लक्षात येते. सत्याची व्याख्यासुद्धा करता येत नाही. जेव्हां त्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न होतो तेव्हां असत्य सत्य वाटू लागते व सत्य असत्य वाटू लागते. असा विरोधाभास त्यात अनुभवास येतो. उदाहरणार्थ पहा. लग्न करतांना अथवा स्त्रीशी तिच्या संम्मतीने भोग घेतांना किंवा जेव्हां जगणे अशक्य (कोणाचा जीव वाचवण्यासाठी) झालेले असते, किंवा जेव्हां सगळी संपत्ती हातातून जाण्याची वेळ आलेली असते, किंवा ब्राह्मणाला वाचवण्यासाठी तेव्हां ते वाचवण्यासाठी माणूस खोटे बोलतो. नितीशस्त्रात ह्या पांच प्रसंगी खोटे बोलणे क्षम्य समजले जाते. अशा प्रसंगी खोटे सत्य समजावयाचे व खरे असत्य समजावयाचे असते अशी प्रथा आहे. ह्या ठिकाणी अरे पार्था, हित व अहित हे निकस ठरतात. जे हितकारक आहे ते सत्य व जे अहितकारक आहे ते असत्य असे व्यावहारिक शास्त्रात समजावे असे ठरलेले आहे. ह्या ठिकाणी पाप पुण्याचा सुद्धा विचार होत असतो. ज्या विचारांमुळे व कृतीमुळें माणसाची अध्यात्मिक उर्जा कमी होते त्याला पापकारक समजले जाते व ज्याने वाढते त्यांना पुण्यकारक समजले जाते. असा साधारण नियम आहे. साधारणपणे सत्याचा संबंध पुण्याशी व असत्याचा पापाशी जोडला जातो. जो नितीशास्त्र चांगला जाणतो त्याला ह्यातील भेद समजणे अवघड नसते. अशा परिस्थितीत एकादा वरवर पहाता दुष्टपणा करत आहे असे दिसत असले तरी त्यात पाप नसते. त्या उलट वरवर पहाता चांगुलपणा वाटणारी कृती पापाला मदत करणारी ठरत असेल तर तो चांगुलपणा पापकारक असू शकतो. प्राचीन काळी वलकांने एका अंध श्वापदाला ठार मारले परंतु, त्यामुळें त्याला पाप लागले नाही. त्याउलट नदीजवळ रहाणारा कौशिका वरवर चांगले वाटणारे कृत्य करून पापी ठरला होता.

अर्जुन त्यावर प्रश्न विचारतो, "अहो सूज्ञ, मला त्या गोष्टी सांगा म्हणजे मला हा विषय चांगला समजेल".

वासुदेव सांगतात, एके काळी एक शिकारी होता. त्याचे नांव होते वलक. तो उपजिविकेसाठी व्याध झाला होता. त्याला एरव्ही प्राणी मारणे आवडत नव्हते. त्याने द्वेष, मत्सर, गर्व, घमेंड, सूडबुद्धी ह्या पापकारक प्रवृत्तींचा पूर्णपणे त्याग केला होता. म्हणून त्याची अध्यात्मिक उर्जा चांगली होती. एकदा शिकार शोधण्यासाठी फिरत असतांना त्याला योग्य शिकार मिळत नाही. अखेरीस त्याला एक शिकार दिसते. तो एक अंध प्राणी होता. त्याच्या गंध ज्ञानाने तो त्याचे व्यवहार करत होता असें वलकाला समजते. तो एका झर्यावर पाणी पित होता. त्याला पहाताच वलक त्याची शिकार करतो. ते होतांच वलकाच्या अंगावर स्वर्गातून फुलांचा वर्षाव होतो. स्वर्गातून एक दैवी वाहन अप्सरांच्या बरोबर स्वर्गीय वाद्यवृंदांच्या सानिध्यात त्याला नेण्यासाठी येते. त्या अंध श्वापदाने मोठी तपस्या केली होती, त्याकरता त्याला असा आशिर्वाद प्राप्त झाला होता कीं, तो अनेक लहान प्राणी खाऊ शकेल. परंतु, त्याला मारल्यामुळें, वलक स्वर्गात गेला. त्यातील नैतिक मुल्य समजणे फारच अवघड आहे, पार्था. दुसरे उदाहरण देतो, कौशिकाचे. तो एक सन्याशी होता. त्याचे शास्त्राचे ज्ञान अल्प होते. तो गांवापासून दूर रहात होता. तो जेथे रहात होता तेथे कांहीं नद्यांचा संगम होत होता. तो एकदा प्रतिज्ञा करतो कीं, मी फक्त सत्य बोलेन. त्यामुळें तो फार ख्यातनाम झाला होता. त्याच्या खरे बोलण्याची पुष्कळ तारिफ होत असें. एकदा कांहीं लोक चोराच्या भितीने वनात शिरले होते. जेथे कौशिक रहात होता. ते चोराला शोधणारे त्याला सत्यवचनीला विचारतात, "कोशिका, कांहीं लोक येथून जातांना तू पाहिलेस कां"? त्यावेळी खरे सांगण्याच्या व्रतात असलेला कौशिका खरे सांगतो, त्यानंतर ते लोक त्या चोरांना पकडतात व ठार मारतात. त्यामुळें मोठे पाप होते केवळ कौशिकाने खरे सांगितले म्हणून. त्यामुळे कौशिका नरकात गेला. पाप व पुण्य ह्यात फार लहान फरक असतो बर्याच प्रसंगी. तो समजणे ह्यालाच शहाणपण म्हणतात. त्या सगळ्या गोष्टी शास्त्रात दिल्या जात नाहीत. जीवनाच्या अनुभवातून माणूस ते शिकत असतो. शास्त्रात सगळे बारकावे सांगता येत नाहीत. म्हणून जो केवळ शास्त्राच्या नियमांवर अवलंबून असतो तो बहुधा चुका करत असतो. ह्या ठिकाणी हित व अहित हे सत्यापेक्षा जास्त महत्वाचे असतात. म्हणून सूज्ञ म्हणतात हितकारक ते सत्य व अहितकारक ते असत्य असते. कृष्ण पुढे त्याला सांगतो, "मी तुला साधारण कल्पना दिली

सत्य व असत्य कसे अजमावयाचे. परंतु, तुला तुझ्या तारतम्यांचा उपयोग करूनच अंतीम निर्णय घ्यावयाचे आहेत. तू त्याप्रमाणे ठरल कीं, तू युधिष्ठीराचा वध करावा कीं नाही". अर्जुन कृष्णाला बोलतो, "तू जे सांगत आहेस ते फार ज्ञानपूर्ण आहे. तू आमचा मार्गदर्शक आहेस. म्हणून तू आम्हाला योग्य अयोग्यची समज देण्यास लायक आहेस व जे तू सांगशिल ते मी करणार आहे. तुला माहीत आहे माझी प्रतिज्ञा कीं, जो मला सांगेल कीं, माझे गांडीव दुसर्या कोणाला द्यावे कारण तो माझ्यापेक्षा जास्त चांगला धनुर्धारी आहे, तर मी त्या सांगणार्याचा शिरच्छेद करीन. तशी प्रतिज्ञा भिमानेसुद्धा केली आहे जर कोणी त्याला तुलारक म्हणाले तर तो त्याला मारून टाकील. तू पाहिले आहेस कीं, तुझ्या समक्ष युधिष्ठीरानी मला माझे गांडीव कर्णाला देण्यास सांगण्याची चुक केली आहे तेव्हां मी त्याला माझ्या व्रतानुसार मारले पाहिजे. परंतु, माझ्या मित्रा, तू जाणतोस कीं मी युधिष्ठीराशिवाय ह्या जगात राहू शकणार नाही. अशा परिस्थितीत मी काय करावे ते सांग. तुझ्या मार्गदर्शनाची मला आवश्यकता आहे. असा मार्ग सांग कीं आम्ही दोघे एकत्र राहू शकू". ते ऐकल्यावर वासुदेव बोलतो, राजा कर्णाच्या असण्याने थकला आहे. युद्धात त्याला जबर जथमा झाल्या आहेत. त्याचा वारंवार कर्णाने पराभव केला आहे. त्यामुळे तो एकेरीला आला होता जेव्हां तो तुला विरोधात्मक रित्या उत्तेजित करण्यासाठी तसे सांगतो कीं, जर तू कर्णाचा वध करू शकत नसशिल तर ते गांडीव त्याला दे. ह्या बोलण्याचा अर्थ शब्दशः घ्यावयाचा नव्हता. त्याच्या बोलण्याचा अर्थ तू कर्णाला मारून तुझे श्रेष्ठत्व सिद्ध कर, असा होता. माणसाच्या बोलण्याचे अनेक अर्थ होत असतात, त्यातील नेमका आशय समजणे ह्याला सारासर बुद्धी वापरावयाची असते. नेहमी शब्दशः अर्थ घ्यावयाचा नसतो. आता तुला जर समजले असेल तर त्या प्रमाणे तू कर्णाचा वध करण्याचे कार्य लवकरात लवकर करावे असें त्याला सांगावयाचे होते हे तू लक्षात घेतले पाहिजेस. त्या द्युताच्या खेळाचा खरा अंत कर्णाच्या वधाने होणार आहे. अरे पार्था, तो द्युताचा खेळ अजून चालू आहे आणि हे युद्ध त्याचाच भाग आहे असे त्याला सांगावयाचे होते अप्रत्यक्षरित्या. ते तू समजून घे. म्हणून तू युधिष्ठीरीचा नव्हे तर कर्णाचा वध करावयाचा आहे हे तुझ्या लक्षात आले पाहिजे. कर्णाचा वध तू केल्याने तू श्रेष्ठ धनुर्धारी आहेस हे सिद्ध होईल ते तुझ्या भावाला हवे आहे. कर्ण जीवंत असण्यात त्याचा मृत्यू आहे असे त्याला सांगावयाचे आहे.

असे अनेक अप्रत्यक्ष आशय त्या त्याच्या बोलण्यात होते ते तू समजून घेतले पाहिजेस. मनुष्य बोलतांना अनेक रुपक, वापरत असतो ते समजण्यात खरा शहाणपणा आहे. परंतु, तुला त्याच्या बोलण्याने राग आला आहे तेव्हां तू त्याचा अपमान करून त्याचा वध केल्यासारखे करू शकतोस कारण, अरे पार्था. ज्येष्ठांचा अपमान हा त्यांच्या मृत्यूसारखाच असतो म्हणून तू त्याची निर्भस्तना कर म्हणजे तुझा उद्देश साध्य होईल व तो जीवंतसुद्धा राहिल. युधिष्ठीराचा तुम्ही सगळे सदैव मानसन्मान करत असता त्यामुळे त्याचा अहंकार वाढला आहे तो मर्यादेत आणण्यासाठी प्रसंगी त्याचा योग्य मुद्द्यावरून थोडा उपमर्द होणे त्याच्यासाठी पथ्यकारक आहे. असे अथर्वात आणि अंगिरसांच्या शिकवणीत दिलेले आहे. माणसाला नेहमीच मारण्याची गरज नसते, त्याचे मन मारणे हे प्रत्यक्ष मृत्यूपेक्षा कित्येक वेळा जास्त उपयोगाचे असते. उच्चपदस्थाला सुद्धा त्याची मर्यादा दाखवावी लागते व ते काम आता तुला करावयाचे आहे. अशा उपचाराने ज्येष्ठ आपली मर्यादा समजतात व अधिक चांगले वागू लागतात. त्यातून ते जर शहाणे असतील तर कांहीं शिकतात. तुझा भाऊ शहाणा आहे म्हणून तो त्या उपमर्दातून निश्चितपणे शिकेल. हे साध्य करण्यासाठी बर्याच वेळा लहान मुलांचा वापर केला जातो तसा मी तुझा वापर करणार आहे. ते ऐकल्यावर अर्जुनाचे शंका समाधान होते. त्यानंतर तू कर्णाचा वध करून युधिष्ठीराचे मन शांत करावयाचे आहे.

कर्ण पर्व भाग एकोणसत्तरावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग सत्तरावा

संजय पुढे सांगतो, जनार्दनाने ते सांगितल्यावर पार्थ त्याचे आभार मानतो. त्यानंतर तो त्याच्या मोठ्या भावाला कधी नाही अशा कठोर शब्दात सुनावतो, अर्जुन त्याला बोलतो, "अहो महाराज तुम्ही मला ते शहाणपण सांगू नका. आपण युद्धभूमीपासून दोन कोस लांब राहून मला अक्कल देत अहात. भिम जो प्रत्यक्ष लढत आहे त्या योद्ध्यांशी, तो जर मला कांहीं सांगेल तर मी ते ऐकेन. त्यांने अनेक योद्धे, हत्ती, घोडे आणि कित्येक लढाया मारल्या आहेत तो जोराने गर्जना करत आहे. सिंहासारखा तो लढत आहे, कित्येक मुष्किल लढाया त्याने मारल्या आहेत. रथातून उड्या मारून तो लढत आहे, गदा, तलवार, भाले, बाण अशी शस्त्र तो वापरत आहे, त्याने कित्येक इजा सांभाळत युद्ध केली आहेत. त्याची हिम्मत इंद्रापेक्षा कमी नाही, शस्त्रांना अथवा केवळ हाताने तो लढत असतो, त्याचे शौर्य कुबेराच्या व यमासारखे आहे, असा कर्तृत्ववान भिम मला जर कांहीं सांगेल तर ते मी ऐकेन. परंतु, जो सदैव दुसर्यांच्या संरक्षणात असतो त्यांने मला अक्कल दिलेली मला चालणार नाही. आता भिम एकटा धृतराष्ट्रींच्या मध्ये उभा राहून युद्ध करत आहे. असा माझा भाऊ मला अक्कल देऊ शकतो. ज्याने कलिंगच्या योद्ध्यांना मारले आहे, वंग जिंकले आहेत, अंगांचा नाश केला आहे, निशदांचा पराभव केला आहे, मगधांचा त्यांच्या हत्तीदलासह नाश केला आहे, तो मला सांगू शकतो. रथामधून बाणांचा वर्षाव करणारा, भिम हजारो हत्तींच्या सोंडी कांपतांना मी पाहिले आहे. असा योद्धा मला कांहीं सांगेल तर ते मी मान्य करीन. तो जर ओरडून मला बोलला तरी ते मी ऐकेन. सूज्ञ सांगतात, ब्राह्मणांची शक्ती त्यांच्या जिभेत असते, क्षत्रियांची त्यांच्या बाहूबलात असते, तू बोलण्यात चांगला आहेस. तू मला तुझ्यासारखा समजतोस, मी नेहमी तुझे भले करण्याचा प्रयत्न करत असतो. तुला बायको मिळवून दिली, मुल झाली सगळी सुखं तुला आयती मिळाली ते सगळे माझ्यामुळे तरी तू मला नेहमी अक्कल देत असतोस. हे सगळे ओळखून आहेत कीं, तुझ्यात कांही करण्याची हिम्मत नाही. तू तुझ्या ज्येष्ठतेचा नेहमी गैर फायदा घेणारा असतोस. द्रौपदीच्या कुशीत तू झोपतोस व मला अक्कल देत असतोस. तरी

आम्ही तुझ्यासाठी मोठ्या मोठ्या शूरवीर योद्ध्यांना मारत असतो. त्यात किती धोका असतो त्याची तुला कल्पनासुद्धा नसते. तुला त्याची फिकीरसुद्धा नसते. एका प्रकारे तू एक नालायक माणूस आहेस. तुझ्याकडून आम्हा कोणाही भावांना कांहीं सुख मिळालेले नाही, उलट त्रास सोसावा लागला आहे. मला समजत नाही, तुला राजा करून आम्हाला काय मिळणार आहे? आपले आजोबा तुला सांगत होते युद्धातील मृत्यू म्हणजे काय. ते शुरासारखे मारले गेले. त्यांना शिखंडीने मारले माझ्या संरक्षणात. तुला राजा करण्यात मला कांहीं तथ्य वाटत नाही. कारण तू स्वतः एक जुगारी आहेस. आम्ही मिळवलेले तू फुकट घालवलेस पण त्याची तुला लाजसुद्धा वाटत नाही. जुगारात ते फसतात जे नीच वृत्तीचे असतात. आम्ही राज्य मिळवले तर ते तू जुगारात पुन्हा घालवणार नाहीस असे मी कसे मान्य करू? आपल्या सूज्ञ भावाने सहदेवांने द्युताचे दोष व त्यात असलेले पाप तुला सांगितले तरी तू सुधारावयाला तयार नाहीस. असे असतांना तू मला अक्कल कोणत्या अधिकारात देत आहेस"? तू द्युत खेळण्यास तयार झालास म्हणून हे युद्ध व त्यातील संहार होत आहे. सर्वकडील देशातील योद्धे लढत आहेत कारण तू जुगार खेळालास. तुझ्या नालायकपणामुळें आम्ही कष्टाने मिळवलेले राज्य घालवून बसलो. तुझ्यामुळे आम्ही सगळे दुःख भोगत आहोत. तुझ्यासारखा मोठा भाऊ कोणाला मिळू नये. अशा नालायक माणसा तू मला अक्कल देऊन डिवचू नकोस".

संजय पुढे सांगतो, तसे कठोर बोलल्यानंतर अर्जुनाला त्याचे वाईट वाटू लागते. तो जोरा जोरांने श्वास घेऊ लागतो. तो त्याची तलवार काढतो ते पाहून कृष्ण बोलतो, "हे काय तू करत आहेस? तलवार कां काढलीस"? मला सांग म्हणजे मी माझे मत सांगीन". ते ऐकल्यावर अर्जुन त्याला बोलतो, "मी जे बोललो त्यासाठी मी माझा जीव देणार आहे". ते ऐकल्यावर केशव धनंजयाला बोलतो, तुझ्या भावाला ते ऐकवल्यानंतर तुला दुःख होण्याचे काय कारण आहे ते मला समजत नाही. म्हणून तू स्वताला मारावयाला निघालास"? अरे धनंजया, तू अशाप्रकारे मरण्यासाठी जन्मलेला नाहीस. तू तुझ्या भावाचा आत्मा दुखवला आहेस हे खरे, नैतिकता हा एक गूढ विषय आहे. त्यातील बारकावे समजणे सोपे नाही. विशेष करून अज्ञानी लोकांना ते कधीच समजत नाहीत. म्हणून मी आता काय सांगतो ते नीट ऐक, स्वताला मारून तू मोठ्या नरकात जाशिल. तुझ्या भावाचा वध केला असतास

त्या रागाच्या भरात तर तू तशा नरकात गेला नसतास. म्हणून तू स्वताला मारलेस असे समज. ते तुला जास्त उपयोगाचे असेल. ते ऐकल्यावर अर्जुन त्याचे धनुष्य घेतो व तथास्तू असे बोलतो. त्यानंतर तो युधिष्ठाराला बोलतो, माझ्यासारखा धनुर्धारी ह्या जगात नाही एक महादेव सोडून. मला तो महादेव सुद्धा मानतो. मी एका क्षणात सगळे चराचर असलेले जग नष्ट करू शकतो. त्यातील सगळे राजे तुझ्या पायाशी आणले आहेत मी. तू जो राजसूय यज्ञ केलास त्यात दक्षिणा आणि दैवी महाल तू जे दिलेस ते माझ्या हिम्मतीचे होते. मी अजिंक्य आहे. थोडे संसप्तक सोडले तर बाकीचे मी हरवले आहेत. मी सगळ्या शूरवीरांना हरवले आहे. म्हणून आता मी व कृष्ण कर्णाचा वध करण्यासाठी जाणार आहोत. त्यामुळे आमचा राजा खूष हो. मी खात्रीने त्या कर्णाला माझ्या बाणांनी मारणार आहे. त्याच्या बायका आज विधवा होणार आहेत. किंवा आज कुतीचा एक पुत्र मरणार आहे.

संजय पुढे सांगतो, असे बोलून तो त्याचे धनुष्य खाली टाकतो. मान खाली करून तो शरमिंदा झाल्यासारखा त्याच्या मोठ्या भावाला बोलतो, "अरे राजा खूष हो कारण मी तुला जे बोललो त्याची मला आता लाज वाटत आहे. मला माफ कर. मी तुला शरण जातो". त्यानंतर थोडा थांबून तो बोलतो, आता कर्णाच्या वधाचे काम त्वरितपणे उरकावयाचे आहे. मी त्यासाठी भिमास मदत करण्यासाठी जात आहे. तेथेच मी त्या कर्णाला आकाशात पाठवण्याचे काम करणार आहे. तसे बोलून तो युद्धासाठी निघतो. त्यावेळी युधिष्ठीर त्याच्या गादीवरून उठतो व पार्थाला बोलतो, "अरे अर्जुना, मी फार वाईट वागलो तुझ्याशी. त्यामुळे तू चिडून बोललास त्यात तुझा दोष नाही. तू त्यासाठी माझे डोके कापून टाकलेस तर चालेल. तुम्हा सगळ्यांना माझ्यामुळेच सगळ्या त्रासांना तोंड द्यावे लागत आहे हे मला समजते. माझे द्युताचे व्यसन सगळ्या गोष्टीना कारणीभूत आहे हे मला मान्य आहे. माझ्याशी तुम्ही कां म्हणून आज्ञाधारक असावे हा प्रश्न तुझा योग्य आहे. तेवढी माझी योग्यता नाही. मी नालायक आहे. खरे आहे तुझे बोलणे कीं, भिम हांच योग्य आहे गादीवर बसण्यासाठी. माझ्या सारख्या नकर्त्याचे ते काम नाही. तुझे कठोर शब्द मला फार लागले आहेत". असे बोलून युधिष्ठीर वनात जाण्याच्या तयारीला लागतो. ते पाहून कृष्ण बोलतो, "अरे राजा, सत्यवादी अर्जुनाची प्रतिज्ञा आहे कीं, त्यासाठीच तो

तुझा तशा अपमान करत होता. उच्च वर्णियांना अपमान मृत्यू प्रमाणे असतो. तेव्हां ती प्रतिज्ञा पूर्ण होण्यासाठी तुला थांबावे लागेल. त्या प्रतिज्ञे प्रमाणे आज पृथ्वी कर्णाचे रक्त पिणार आहे".

ते ऐकल्यावर युधिष्ठीराला ते आठवते व तो गोविंदाला मिठी मारतो. आम्ही दोघे ते विसरलो होतो व स्वताच्या उखाळ्या पाखाळ्या काढत बसलो होतो. तुझ्यामुळेंच आम्ही सगळ्या अडचणींतून पार गेलो आहोत. अरे अच्यूता, तुझ्या रुपात आम्हाला धनी मिळाला आहे.

कर्ण पर्व भाग सत्तरावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग एकाहत्तरावा

संजय पुढे सांगतो, युधिष्ठीराचे ते उत्तेजन देणारे बोल ऐकल्यावर गोविंद पार्थाला बोलतो, जेव्हां अर्जुन त्याच्या किंचित झालेल्या कर्मामुळे नाराज झाला होता. वासुदेव स्मित हास्य करत बोलतो, "तुझी जी कांहीं अवस्था असेल, तू एक गुणी मनुष्य आहेस, त्यामुळें, तुला त्या मामुली कर्माचे एवढे दुःख होण्याची आवश्यकता नाही. नैतिकता फारच गुंता गुतीची असते. विशेष करून मूर्ख माणसासाठी कारण, त्याला त्यातील बारकावे समजत नाहीत. पापाची एवढी भिती बाळगण्याचे कारण नसते. तुझ्या भावाचा वध केल्यामुळे तू नरकात गेला असतास परंतु, तू आता तुझ्या भावाचे समाधान कर व त्यातून मुक्त हो. त्याचे आशिर्वाद घे व मगच आपण कर्णाचा वध करण्यासाठी पुढे जाऊ. एकदा कर्णाचा वध तू केलास कीं, तुझा भाऊ तुझ्यावर संतुष्ट होईल व तुला माफ करील. ते ऐकल्यावर अर्जुन युधिष्ठाराचे पाय धरतो व त्याचा मनापासून क्षमा याचना करतो. तो त्याला पुन्हा पुन्हा बोलतो कीं त्याच्यावर कृपा करावी.

पुढे संजय सांगतो, त्या स्थितीत अर्जुनाला पाहून युधिष्ठीर त्याला प्रेमाने उठवतो, त्याला प्रेमांने मिठी मारतो, दोघे रडू लागतात. त्या रडण्याने त्यांचे मन शांत होते. युधिष्ठीर अर्जुनाचे कपाळ हुंगतो. त्याला आशिर्वाद देतो. मोठ्याने त्याच्या नांवे जय असें बोलतो. तोंच त्याचा आशिर्वाद असतो. पुढे बोलतो, "अरे महाबली, सगळ्यांच्या समक्ष माझे सर्वस्व काढले गेले त्या कर्णाने. जरी मी प्रयत्नाची पराकाष्ठा केली होती. त्याची कसब पाहून अरे फाल्गुना, मला फार दुःख झाले होते. मला जगण्याचे महत्व उरलेले नाही. जर तू त्या कर्णाचा वध केला नाहीस तर. जर तो नाही मेला तर मी जीव देईन. मला अशा जगण्यात तथ्य दिसत नाही". ते ऐकल्यावर अर्जुन त्याला बोलतो, "मी आपल्याला आश्वासन देतो कीं, आज मी त्याचा वध करणारच. त्यासाठी मी तुम्हा माझ्या सगळ्यांची शप्पथ घेऊन सांगतो कीं, आज कर्ण मरणारच. नाहीतर मी मरणार त्याच्या हातून. ह्यापैकी कांहीं एक होणार आहे. ह्या माझ्या गांडीवाची सुद्धा शप्पथ घेत आहे. अरे केशवा, तुझ्या प्रेरणेने मी ते साध्य करणार आहे". केशव ते ऐकून बोलतो, "तू ते करण्यास सक्षम आहेस. मलासुद्धा

तेंच अपेक्षित आहे". त्यानंतर कृष्ण युधिष्ठीराला बोलतो, "अरे धर्माच्या मुला, तू अर्जुनाला माफ केलेस हे चांगले केलेस, तो त्या योग्य आहे. केवळ दैव चांगले म्हणून तू मारला गेला नाहीस कर्णाच्या हातून".

युधिष्ठीर बोलतो, "अरे पार्था, जवळ ये आपण मिठी मारू. मी तुला केव्हाच माफ केले आहे. मी तुला आज्ञा करतो कीं, तू कर्णाचा वध करशिल.

संजय पुढे सांगतो, त्यानंतर अर्जुन वाकून युधिष्ठीराला दोनही हातांनी वंदन करतो. त्यानंतर ते पुन्हा आलिंगन देतात.

अर्जुन पुढे बोलतो, "मी कर्णाला भेटून त्याचा वध करणार आहे. त्यानंतर त्याचे सैन्य सुद्धा मारणार आहे. त्याच्या सगळ्या पापांचा पाढा आज मी वाचणार आहे. त्याला न मारता मी परत तंबूत येणार नाही.

संजय पुढे सांगतो, असे बोलून तो मुकूटधारी पार्थ रथात चढतो. युधिष्ठीराला ते पाहून फार आनंद झालेला दिसत होता. तो पार्थाला बोलतो कीं, तसे झाल्याने त्याला अजरामर ख्याती मिळणार आहे. देवांची कृपा हो, चल त्वरित लढण्यासाठी नीघ. कर्णाला मार व दुसरा पुरंदर हो.

कर्ण पर्व भाग एकाहत्तरावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग बाहत्तरावा

संजय पुढे सांगतो, युधिष्ठीराचे स्वागत करत पार्थ कृष्णाला बोलतो, माझ्या रथाची चांगली तयारी करावयाला पाहिजे. त्याचे घोडे ताजेतवाने असले पाहिजेत. त्यातील शस्त्रसाठा चांगला असला पाहिजे. कर्णाच्या वधासाठी मला पूर्ण तयाराने जावयाला पाहिजे. चल गोविंदा, आपण कर्णाच्या वधासाठी जय्यत तयारीने जाऊ. ते ऐकल्यावर कृष्ण दारुकाला सांगतो रथ तयार करावयाला. दारुक तयारीला लागतो. सगळी तयारी झाल्यावर तो अर्जुनाला सांगतो कीं, त्यांचा रथ तयार आहे. युधिष्ठीराची पार्थ सम्मती घेतो स्वारीवर जाण्यासाठी. ब्राह्मण त्याची पुजा करतात रिवाजानुसार. पार्थाला त्याच्याकडे जातांना पाहतात ते समजतात कीं, कर्ण आता मारला जाणार आहे हे निश्चित. अनेक शुभ पक्षी अर्जुनाच्या भोवती घिरट्या घालत होते त्याचा अर्थ तो जिंकणार आहे. त्याच वेळी कांहीं मांसाहारी पक्षी अर्जुनाच्या रथाच्या पुढे उडत होते. त्यांचा अर्थ असा समजला जात होता कीं, कर्णाचा वध आज निश्चितपणे होणार आहे. कृष्ण कर्णाकडे जाण्या आधी अर्जुनाला बोलतो, "अरे गांडीवधारी, तू जगातील श्रेष्ठ योद्धा आहे, पण कर्णाला कमी समजू नकोस. त्याच्यामध्ये पांडवांबद्दल तीव्र द्वेष भाव आहे तो त्याला मोठी शक्ती देत असतो. त्याच्याकडे कांहीं उत्तम गुण आहेत जे त्याला शक्ती देत असतात. जसे उत्तम गुण माणसाला सामर्थ्य देतात त्याप्रमाणे कांहीं दुर्गुण (मद, मत्सर, गर्व) कांहीं नकारात्मक शक्तीसुद्धा तसे सामर्थ्य देत असतात. तुला कर्णाच्या नकारात्मक उर्जेला तोंड द्यावयाचे आहे. त्या नकारात्मक शक्ती जास्त तीव्र असतात व त्यांना तोंड देणे तुझ्या सारख्या सकारात्मक शक्ती असलेल्या माणसाला सोपे नसते. कारण सकारात्मक शक्तीमध्ये कांहीं गुण असतात जसे सहनशिलता, क्षमाशिलता, दयाबुद्धी, व ते उत्तम गुण माणसाला एका प्रकारे कमजोर करतात. अरे अर्जुना, तुझ्यात ते उत्तम गुण आहेत म्हणून तुला प्रत्येक वेळा माझी गरज असते कोणाचाही वध करतांना. तू स्वताच्या मनाने त्याबद्दल निर्णय घेऊ शकत नाही. ह्याची मला काळजी वाटते. त्यापेक्षा वृकोदर पहा, तो सत्त्वगुणी असला तरी त्याच्यात ती व्यवहारिकता ठासून भरलेली आहे त्यामुळे पापकर्मी कौरव त्याला

घाबरतात. ती व्यावहारिकता तुझ्यात व युधिष्ठीरात नाही म्हणून तू व युधिष्ठीर नेहमी कोणताही निर्णय घेतांना चाचपडता. ते चांगले नाही. कर्णाशी तू वृकोदरासारखा होऊन लढशिल तर निश्चितपणे त्याचा वध करशिल. तुझ्यासारख्या सत्त्वगुणी लोकांतील सहनशिलता व दयाबुद्धी, क्षमाशिलता ह्यांचा पापशक्ती नेहमी फायदा उठवत असतात. म्हणून त्या केव्हां आचरावयाच्या व केव्हां नाही ते सांगणारी व्यावहारिकता माणसात असावी लागते. आणखीन काय सांगू मी तुला"? आता कर्णाबद्दल कांहीं सांगतो ते ऐक, कर्ण हा एक पराक्रमी योद्धा आहे. बर्याच अंशी तो तुझ्यापेक्षा जास्त तीव्र असतो त्याच्या द्वेष, सूडबुद्धीमुळे. त्याच्यात अग्नीचे तेज आहे कारण तो सूर्य उपासक आहे. त्याचा क्रोध यमासारखा आहे. शरीराने तो तुझ्यापेक्षा जास्त धिप्पाड आहे. तो तुझ्या सारखाच देखणा आहे. त्यामुळे कांहीं अप्सरा व गंधर्व त्याला अनुकूल असतील. त्याचा आत्मविश्वास जबरदस्त आहे. त्याची दुर्योधनाबद्दलची भावना प्रामाणिक आहे. त्याचा तुमच्याबद्दलचा तिरस्कार अतितीव्र आहे. युद्धात व इतरत्र हिंसा करण्यासाठी क्रोध, तिरस्कार, सूडबुद्धी मदत करतात त्या कर्णामध्ये आहेत ज्या तुझ्यात नसल्यामुळे तू त्या बाबत त्याच्यापेक्षा कमी ठरशिल. हे सगळे नीट समजून तू तुझी मानसिकता तयार कर. तरच तू त्याला मारू शकशिल. नको तेव्हां तुझ्यात व युधिष्ठीरात दयाबुद्धी, क्षमाशिलता जागृत झाल्यामुळे कौरवांचा फायदा होत आला आहे ते ह्यावेळी होऊ देऊ नकोस. तशी जागृकता बाळगलीस तर कर्णाचा वध तू करू शकशिल. सहनशिलता, दयाबुद्धी व क्षमाशिलता ह्या चांगल्या लोकांसाठी (सत्पात्र दान) वापरावयाच्या असतात परंतु, बर्याच वेळा त्या पापी लोकांना (अपात्र दान) सुटण्यासा मदत करतात जर त्या पापी लोकांना दाखवल्या तर. तसे होऊ देऊ नकोस. हे सगळे चांगले ध्यानात घेऊन तू कर्णाचा वध करशिल आज. त्याचा वध करून तू समाजातील त्या दोषांचा नाश करणार आहेस व युधिष्ठीराला आनंद देणार आहेस. मला माहीत आहे कीं तुझी हिम्मत देव आणि दानवांना हरवणारी आहे. ज्याच्या सामर्थ्याने दुर्योधन स्वतःला राजा समजतो त्याचा तू आज नाश करणार आहेस. त्याची जिभ फार चालत होती त्यामुळे द्रौपदीचा अपमान झाला ती जिभ कायमची बंद करून टाक. ज्याच्या असण्यामुळे कौरव तुला दाद देत नाहीत त्याचाच खतमा आज करून टाक. कर्ण पर्व भाग बाहत्तरावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग त्र्याहत्तरावा

संजय पुढे सांगतो, अर्जुन कर्णाचा वध करण्यासाठी जात असतांना कृष्ण त्याला बोलतो, "आज युद्धाचा सतरावा दिवस आहे. आता पर्यंत तू खूप संहार केला आहेस. त्यामुळे क्षत्रियांची संख्या कमी झाली आहे. त्यांच्या बरोबर अनेक प्राणी सुद्धा मारले गेले आहेत. पांडव, श्रींजय आणि पांचाल तुला त्यांचा अजिंक्य नेता समजून कौरवांशी लढत आहेत. त्यात मत्स्य, करूष, छेड्डी, सोमक सामील आहेत. तू एकटा तिनही जग जिंकू शकतोस. त्यात सगळे देव, असुर, माणसे असतील. कौरवांची काय बिशाद ते तुला हरवतील. सगळे स्वर्गातील देव एकत्र आले तरी ते तुझ्याकडे पाहूसुद्धा शकणार नाहीत, हरवण्याची बात सोडा. तुझ्या संरक्षणा खाली धृष्टद्युम्न आणि शिखंडी भिष्म व द्रोणांना मारू शकले ते लक्षात ठेव. अनेक अक्षौहिणी सैन्य एका हाती मारणारे कोण आहेत तुझ्याशिवाय"? भिष्म, द्रोण, कृप, अश्वत्थामा आणि दुर्योधन असे सगळे जरी आले तरी तू त्यांना पुरून उरणारा आहेस. अनेक जातीचे क्षत्रिय जसें, गोवस, दसमिय, वासती, त्याशिवाय पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील तू मारले आहेस. त्याशिवाय खासी, यवन, तुषार, कामथ, दर्वभिसर, दरद, शक, रामशी, तेंगन, अंध्रक, पुंडलीस, किराट, म्लेच्छ, समुद्रापलिकडील लोक असे सगळे तू मारले आहेस. असे सगळे दुर्योधनासाठी लढत होते त्यांना तू मारले आहेस".

"सात दिवसापूर्वी पराक्रमी जयत्सेनाचा अभिम्यूने वध केला त्याचे भलेमोठे सैन्य भिमाने मारले. त्यानंतर कौरवांचे प्रचंड सैन्य भिमावर चालून गेले, त्या सगळ्यांना तू यमाकडे पाठवले आहेस. त्या लढाईत भिष्माने पांडवांचे मोठे सैन्य ठार मारले त्यांच्या दैवी आयुधांच्या मदतीने. फार मोठा नरसंहार भिष्म करत होते. दुर्योधन त्याच्या कुवतीनुसार अनेक आपले राजे मारत होता. त्यात छेड्डी, पांचाल, कैकेया असे होते. तो श्रींजयांचे पायदलातील अनेक योद्धे मारतो. त्याबरोबर अनेक हत्ती, घोडे सुद्धा मारतो. भिष्म त्या लढाईत मोठा योद्धा म्हणून स्वताला सिद्ध करतात. अखेरीस शिखंडी तुझ्या मदतीने त्याचा वध करतो".

"त्यानंतर द्रोण भयंकर संहार करत असतात. ते जयद्रथाला कांहीं काळ संरक्षण देतात परंतु, अखेरीस तो मारला जातो तुझ्या हातून. द्रोण अखेरीस त्यांचा अंत पहातात व ते धृष्टद्युम्नाच्या हातून शिरच्छेदाने मारले जातात. भिष्म व द्रोणांनंतर कौरवांकडे कोणी नांव घेण्यासारखा सेनानी उरला नव्हता. त्यात अश्वत्थामा, कर्ण, कृप, कृतवर्मन, सल्य असे कांहीं होते. त्याना मारून तुला ही पृथ्वी युधिष्ठीराला द्यावयाची आहे. पांचालांना त्याचा आनंद मिळू दे. तुला कृपांबद्दल माया असणार म्हणून त्यांना सोडून दे. कृतवर्मन तुझा आईच्या बाजूचा म्हणून त्यालासुद्धा तू सोडशिल. सल्यसुद्धा तुझा मामा आहे. परंतु, कर्णाला तू मारू शकतोस. कारण तो तुमचा शत्रू आहे. जरी तो नात्याने व रक्ताने तुमचा मोठा भाऊ आहे. दुर्योधन कर्णाचा नेहमी उपयोग करत आला आहे. कर्णसुद्धा पांडवांचा द्वेष करत आहे. त्या कर्णाला आज मारून तू ते वैर संपुष्टात आणशिल. अभिमन्यूला त्या सहा जणांनी कसे घात करून मारले ते तुला माहित आहे. त्यात द्रोण, कृप अश्वत्थामा असे होते. अभिमन्यू त्याचे शौर्य गाजवत असतांना कर्ण मात्र त्याच्या नीच कारवाया करत होता. त्याला तरी अभिमन्यूने रणांगण सोडून जावयास लावले होते. त्यावेळी द्रोणांच्या सांगण्यावरून तो अभिमन्यूचे धनुष्य तोडतो. त्यावेळी तो त्याला हसतो. त्या सभेत कर्ण द्रौपदीला कसे हिणवतो ते आठव धनंजया. तिला तो गुलाम समजतो. त्या कर्णाच्या वागण्याने तो पांडवांचा किती द्वेष करत आहे ते दिसते. तुझे बाण कर्णाच्या सगळ्या शरीराचे तुकडे करोत. त्याला यमाकडे पाठवतो. सगळ्या कौरवांच्या राजाने दिसू दे कीं, कर्ण रथातून खाली कोसळला आहे. त्यांचे खिन्न चेहरे पहाण्यासारखे असतील. त्याचा दिमाखदार झेंडा तुझ्या बाणांनी कोसळूं दे. तो सल्य कर्णाशिवायचा रथ घेऊन गेलेला पाहू. दुर्योधनाचा पडलेला चेहरा सगळ्यांना दिसू दे. पांचाल त्यांच्या राजपूत्रांसह नकूल, सहदेव, सतनिक, दुर्मुख, जनमेजय, शुधर्मन, सत्यकी असे सगळे जोराने घोष करतील कीं कर्ण मेला. त्यानंतर कौरवांवर चालून जातील. कर्णाने त्यांचा किती नाश केला तरी ते न घाबरता कौरवांशी लढत आहेत जीवाची पर्वा न करता. अशा दोस्तांसाठी तुला जास्त लढले पाहिजे. कर्ण त्याचे भार्गव अस्त्र जे त्याला भृगूकडून मिळाले आहे ते सतत वापरतो आहे. त्याच्या मदतीने तो पांचालांचा नाश करत आहे. तेथे भिम श्रींजयांच्या मदतीने कर्णाशी लढत आहे. जर तू वेळीच हस्तक्षेप नाही केलास तर तो पांडवांचा, पांचालांचा व

श्रींजयांचा पुरता बिमोड करेल. आता जास्त काळ कर्णाला जीवंत ठेवणे मूर्खपणाचे होईल. त्याचा नाश आजच झाला पाहिजे. तुझ्या प्रतिज्ञेप्रमाणे तू काम केले पाहिजेस. तूंच कौरवांचा नाश करू शकतोस कारण तूंच कर्णाचा नाश करू शकतोस. ते महान कार्य तू आजच करणार आहेस. तुला माझ्या शुभेच्छा आहेत". असें कृष्ण अर्जुनाला सांगत असतो.

कर्ण पर्व भाग त्र्याहत्तरावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग चौर्याहत्तरावा

संजय पुढे सांगतो, केशवाचे ते बोलणे ऐकून विभत्सू काळजी करावयाचे थांबवतो व चांगल्या मनस्थितीत जातो. त्याचे गांडीव सज्ज करतो कर्णाचा वध करण्यासाठी. त्यानंतर तो केशवाला बोलतो, "जोवर तू माझा त्राता आहेस मला कशाचीच फिकीर नाही. तुला भूत भविष्य चांगलेच समजते त्याप्रमाणे विजय आमचाच आहे हे मला समजलेले आहे. मी तिनही जग जिंकू शकतो कर्णाची काय बिशाद आहे माझ्यापुढे लढेल. मी पांचालांना पळून जातांना पहात आहे, कर्णाला त्यांना मारतांना पहात आहे, त्याचे भार्गव अस्त्र सगळीकडे काम करत आहे. अशा ह्या युद्धात मी कर्णाचा वध करणार व त्याची कथा जगभर गाईली जाणार आहे. माझ्या गांडीवातून जे बाण निघतील ते कर्णाला यमाकडे नेतील. आज धृतराष्ट्र त्याच्या त्या धोरणाला दोष देईल ज्यामुळे त्यांने दुर्योधनाला त्याचा वारस म्हणून जाहीर केले. आज धृतराष्ट्र त्याची सत्ता, आनंद, सुख, समृद्धी, राज्य असे सगळे घालवून बसणार आहे. आज जेव्हां कर्णाच्या देहाचे तुकडे होतील तेव्हां दुर्योधनाला आठवतील तुझे शब्द ज्यात तू समझौता करण्यासाठी गेला होतास. आज त्या सुवलाच्या मुलाला समजेल कीं माझे बाण द्युतातील फासे झाले आहेत. माझा रथ तो सरीपट झाला आहे. कर्णाचा वध करून मी कुंतीच्या मुलांची अशांत मन शांत करणार आहे . माझे बाण कर्णाचा जीव घेणार आहेत. तुला आठवत असेल कर्णाची प्रतिज्ञा कीं, तो माझा वध करील, ती मी आज खोटी ठरवणार आहे. आज पृथ्वी कर्णाचे रक्त चाखणार आहे. ज्याने इतराना माती दाखवली त्याला आज मी माती दाखवणार आहे. कर्ण द्रौपदीला बोलला होता कीं, तिचे आता शंभर नवरे होणार, ती जीभ मी आज बंद करणार आहे. पांडवांची कुचेष्टा करणारे त्याचे तोंड आज कायम बंद होणार आहे. आम्हाला तिळाच्या बियाशी बरोबरी करतो आज त्याला समजेल कोण तीळाच्या बरोबरीचा आहे. कर्णाने मोठ्या दिमाखात दुर्योधनाला वचन दिले होते कीं, तो कौरवांना पंडूच्या मुलांपासून वाचवेल. परंतु, माझे बाण ते होऊ देणार नाहीत. ज्याच्या हिम्मतीवर विसंबून दुर्योधन आम्हाला त्रास देत होता तो आज नष्ट होणार आहे. कर्णाचा वध झाल्यावर तो धृतराष्ट्री समजेल कीं,

अर्जुन काय चीज आहे. ह्या युद्धानंतर कौरव, त्यांची मुलं, त्यांचे नोकर सगळे निराधार होणार आहेत जे पांडवांना हसत होते. आज रात्री गिधाडं कर्णाचे अंग चावून खाणार आहेत. त्याच्या मांसाचे तुकडे खाणार आहेत. आज मी कर्णाचे डोके सगळ्यांच्या समक्ष उडवणार आहे. आज कर्ण मेल्यावर युधिष्ठीराची मोठी विवंचना संपणार आहे. त्याच्या वधानंतर मी त्याचे साथीसुद्धा मारणार आहे. माझ्या अभिमन्यूचा वध करणार्यांचे अवयव मी कापणार आहे. आज मी एका मोठ्या ऋणातून मुक्त होणार आहे. आज मी त्या दुःखातून मुक्त होणार आहे ज्यामध्ये मी गेली तेरा वर्षे अडकलो आहे. मेघावताने संवराला मारले तसे मी आज कर्णाला मारणार आहे. सोमकांनो तुमचे काम आज पूर्ण होणार आहे. मला खरोखरच कल्पना करता येणार नाही सत्यकीला किती आनंद होईल जेव्हां कीं, कर्णाचा श्वास बंद करून टाकीन. आमचे बंधू, किती आनंदी होतील तेसुद्धा मला सागतां येणार नाही. अरे माधवा, आज ते माझे साथी, पांचाल, शिखंडी, माझा क्रोध पहातील. जेव्हां मी कर्णाशी लढत असेन. मी अद्वितीय आहे हे आज सगळे मान्य करतील. जसे मी क्षमाशिल आहे तसा मी क्रोधीसुद्धा आहे हे समजतील सगळे. मी एकटा सगळ्या वल्हीकांना, कौरवांना भारी गेलो आहे. माझ्या मनगटावरील खुणा पहा. त्या धनुष्याच्या आहेत. मी जेव्हां लढण्यासाठी जातो तेव्हां कोणी मला अडवू शकणार नाही".

असे धनंजय कृष्णाला सांगत असतो. त्याचे डोळे लाल झाले होते. भिमाला संरक्षण देण्यासाठी तो जात असतो.

कर्ण पर्व भाग चौर्याहत्तरावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग पंच्याहत्तरावा

धृतराष्ट्र विचारतात, "त्या जीवघेण्या समरात माझे व पांडव आणि श्रींजयाचे योद्धे गुंतलेले होते, तेव्हां धनंजयाने कोणती कामगिरी केली ते मला ऐकावयाचे आहे.

संजय सांगतो, पांडवांच्या असंख्य पलटणी त्यांचे रुबाबदार झेंड मिरवित अभिमानाने गर्जना करत, त्यांची ढोलकी वाजवत, तसेंच इतर रणवाद्ये वाजवत कौरवांशी लढत होते. त्यांच्या तलवारी चमकत होत्या. रक्ताचे पाट वहात होते. त्या युद्धात क्षत्रियांचा संहार होत होता. त्यातील रथी एकमेकांना मारून यमाकडे धाडत होते. त्यामध्ये योद्धे व त्यांचे प्राणी आणि सारथीसुद्धा मारले जात होते. कृप आणि शिखंडी द्वंद्वात गुंतलेले होते. सत्यकी दुर्योधनावर चाल करून गेला होता. श्रृतश्रव अश्वत्थामाशी, युधमन्यू, चित्रसेनाशी, उत्तमौजस कर्णाच्या मुलाशी शुशेनाबरोबर लढत होता. सहदेव शकूनीशी लढत होता. तरणाबांण सतनिक नकूलाचा मुलगा, वृषसेनाशी लढत होता. त्यात ते एकमेकांना बाण मारत होते. नकूल कृतवर्मनाशी लढत होता. धृष्टद्युम्न कर्णावर हल्ला करून जातो. दुःशासन संसप्तकांची फौज घेऊन भिमावर हल्ला करतो. उत्तमौजस त्याचे सगळे बळ वापरून कर्णाच्या मुलाचे डोके उडवतो. ते खाली पडते. तो वध झाला हे समजल्यावर कर्णाला फार दुःख होते. त्या रागात तो त्याच्या मुलाच्या व्याधाचे घोडे, रथ, झेंडा असे सगळे बाद करतो. ते होत असतांना उत्तमौजस कृपांच्या घोड्यांची कत्तल करतो त्याच्या हातातील समशेरीने. त्याशिवाय कृपाना संरक्षण देणार्या योद्ध्यांची सुद्धा तो तलवारीने कत्तल करतो. त्यानंतर तो शिखंडीच्या रथात चढतो. कृप बेसहारा झाले आहेत ते पाहून शिखंडी त्यांना मारत नाही. युद्धनितीच्या प्रथेनुसार ते असते. अश्वत्थामा कृपाना घेऊन जातो. त्यासुमारास भिम त्याच्या अभेद्य अशा सोनेरी चिलखतात कौरवांचे उरलेले सैन्य मारू लागतो जसे उन्हाळ्यातील सूर्य सर्व जग भाजत असतो.

कर्ण पर्व भाग पंच्याहत्तरावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग श्याहत्तरावा

संजय सांगतो, त्या घनघोर युद्धाच्या सुमारास भिम त्याच्या सारथ्यास बोलतो, "मला धृतराष्ट्रींच्या मध्ये घेऊन जा. वेगाने जाऊ. मी त्या सगळ्यांना यमाकडे पाठवणार आहे". ते ऐकल्यावर सारथी त्यांचा रथ त्याप्रमाणे घेऊन जातो. त्यावेळी कौरवांच्या फौजा त्यांचे हत्ती, घोडे व रथ घेऊन त्याला गराडा घालतात. भिम त्यांची कत्तल करू लागतो. त्यामुळें एकच गोंधळ उडतो. भिम साक्षात यमाचा अवतार धारण करतो. तो येतील त्या सगळ्यांचा नाश करत रहातो. त्यानंतर कौरवांचे सैनिक पळून जातात. त्या गोंधळात भिमाला समजत नाही त्याचे कोण व कौरवांचे कोण होते, त्यामुळें त्याला कळेना कोणाला मारावे, कारण चुकून तो पांडवांचे मारू गेला तर तो मोठा अनर्थ होईल. रथांवरील झेंड्यामुळे त्याला ते रथ कोणाचे ते समजत होते. तरी तो मोठ्या अडचणीत सापडला होता. युधिष्ठीर त्याला सोडून कोठे गेला तेसुद्धा त्याला समजत नव्हते. ते जीवंत आहेत का नाही तेसुद्धा समजत नाही. असे भिम त्याच्या सारथ्याशी बोलत असतो. तो सारथ्याला सांगतो कीं, आपल्या भात्यात किती बाण आहेत ते मोजून ठेव. किती कोणत्या प्रकारचे तेसुद्धा पाहून ठेव. विशोक त्याचा सारथी सांगतो, आपल्याकडे अजून साठ हजार बाण आहेत. त्यानंतर वस्त्राचे बाण दहाहजार आहेत. इतर दोन हजार आहेत. बाहेरच्या गाड्यांवर आणखीन बाण आहेत. ते सहा गाडे भरतील. त्याशिवाय कितीतरी गदा व तलवारी आहेत. शलाकसुद्धा भरपूर आहेत. आपल्याकडे शस्त्रांचा चांगला साठा आहे. त्याची फिकीर नको. ते ऐकल्यावर भिम म्हणतो, "अरे सुता, माझ्या बाणांनी सगळे रणक्षेत्र व्यापलं जाणार आहे. त्याचा परिणाम स्वरुप कौरवांचा नाश मी करणार आहे. हे रणक्षेत्र यमभूमी झाल्याचे सगळ्यांना दिसणार आहे. पुढे सगळे क्षत्रिय त्यांच्या मुलांना ती कथा सांगणार आहेत ज्यामध्ये मी कौरवांचा नाश कसा केला ते कथन केले जाणार आहे. आज कौरव युद्धात मरतील व त्यात माझी वहाव्वा सगळे करणार आहेत. त्या सगळ्या कौरवांनी माझ्या एकट्यावर हल्ला करावा व मी त्यांचा मुकाबला कसा करतो ते पहा. देव मला त्यामध्ये

मदत करतील. तो शत्रूघ्न अर्जुन माझ्या बरोबर असेल. जसे इंद्र देवांच्या मदतीला त्वरित जातो".

"ते पहा त्यांचे राजे माझ्याकडे पाहूनच पळत आहेत. ते कां पळत आहेत"? त्याचे कारण सव्यसाची बहुतेक करून येथे येत असला पाहिजे. तेथे पहा धनंजयाचे सोनेरी बाण त्या हत्ती, घोडे व रथांना लागत आहेत. कितीही मारले तरी कौरवांचे सैन्य इतके मोठे आहे कीं, नवीन नवीन फौजा रणांगणात येतच आहेत". भिमाचा सारथी विसोक विचारतो, "ते कसे काय? आपल्याला गांडीवाच्या टणत्काराचा आवाज ऐकू येत नाही"? तेथे पहा तुमच्या इच्छेप्रमाणे पार्थ आपल्या पाशी येत आहे. तो पहा कपीमुद्रा असलेला झेंडा फडकत आहे. त्यांच्या येण्याने कौरवांच्या पलटणी पळून जात आहेत. तो अर्जुन पहा कसा तेजांनी चमकत आहे. त्याच्या मुकूटातील मौल्यवान रत्नं झकाकत आहेत. त्याच्या देवदत्त शंखूचा आवाज ऐका. त्याबरोबर जनार्दनाच्या शंखूचा सुद्धा ऐका. केशवाचे सुदर्शन चक्र पहा. ज्याची सगळे यदू नेहमी पुजा करतात. ते पहा हत्तींची शरीरं अर्जुनाच्या वारामुळें कोसळत आहेत. डोंगर कोसळावेत असे ते खाली पडत आहेत. त्याचा किती मोठा आवाज होत आहे. ते पहा पांचजन्याचा आवाज होत आहे. केशवाच्या गळ्यातीस कौस्तुभ कसा दिमाखाने चमकत आहे. अर्जुनाच्या हल्ल्याने घायाळ झालेले सैनिक पहा. हा सगळा त्याच्या दैवी आयुधांचा परिणाम आहे. त्या दैवी आयुधांमुळे मोठ्या संख्येने तो कौरवांचे सैन्य मारत आहे. तो आता आपल्या बाजूने येत आहे. तुमची मनिषा पूर्ण होत आहे. आपले शत्रू ठार मारले जात आहेत".

भिम बोलतो, "अरे विसोका, तू मला अर्जुन येत असल्याची शुभवार्ता सांगत आहेस म्हणून मी तुला दहा गांव इनाम देणार आहे, शंभर मुली सेविका म्हणून देणार आहे. वीस रथ देणार आहे, कारण मी तुझ्यावर फार खूष झालो आहे".

कर्ण पर्व भाग श्याहत्तरावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग सत्याहत्तरावा

संजय पुढे सांगतो, रथांचा गडगडाट व योद्ध्यांचे ओरडणे ऐकून अर्जुन गोविंदाला बोलतो, "आपला रथ जरा वेगांने पुढे ने", ते ऐकल्यावर कृष्ण बोलतो, मी भिम जेथे आहे तेथेच जात आहे". त्यावेळी कौरवांचा मोठा फौजफाटा अर्जुनावर चाल करून येत होता. त्यांच्यात लवकरच तुंबळ युद्ध होते. जसे विष्णू व असुरांमध्ये फार प्राचीन काळी झाले होते. एकटा पार्थ त्यांना पुरून उरतो. त्यांचे झेंडे, छत्र्या, पंखे, स्तंभ, घोडे, रथ असे सगळे तो उध्वस्त करत असतो. त्यात हत्तींचा मोठा संहार तो करत असतो. ते केल्यावर तो इंद्राचा मुलगा कर्णाचा समाचार घेण्यासाठी त्याच्याकडे जात असतो. त्यासाठी कर्णाला संरक्षण देणार्या तुमच्या फौजांत तो वेगांने घुसतो. त्याला येतांना पाहून तुमचे योद्धे एकत्रितपणे त्याच्यावर तुटून पडतात. परंतु, अर्जुन त्यांचे पारिपत्य करतो लिलया. जशा समुद्राच्या लाटा एका मागून एक येत असतात तसे तुमचे सैनिक त्याच्यावर हल्ला करण्यासाठी येत होते. ते सगळे पार्थ यमाकडे धाडत होता. त्यानंतर त्यांचा जोर ओसरतो व ते पळून जातात. एकंदर तो तुमचे चारशे योद्धे मारतो त्या लढाईत. बाकीचे पळून जातात. त्यानंतर पार्थ कर्णाकडे त्याचा रथ नेण्यास सांगतो. पार्थाला येतांना पाहून भिमाला उत्साह येतो. तो आणखीन जोरांने तुमचे योद्धे मारू लागतो. त्याच्या वार्यासारख्या जोराने येण्यामुळें तुमचे राजे खजिल होतात. ते पाहून दुर्योधन त्याच्या लष्कराला बोलतो, त्या पंडुच्या मुलाचा वध करा. तो मेला म्हणजे पांडव मेले असे समजले जाईल. ते ऐकून त्यांचे राजे भिमावर चालून जातात. अनेक हत्तीदल भिमाला गराडा घालतात. ते दृष्य पहाण्यासारखे होते. ते भिमावर त्यांचे बाण मारत असतात. भिमाचा वध करणे हा एकच उद्देश त्यात होता. त्या हल्ल्यातून तो सहीसलामत बाहेर येत असलेला दिसत होता. तो त्यातील दहा हजार हत्ती, शेकडो घोडे, शेकडो रथी त्याने मारले होते. त्यामुळे रणंगणात जो रक्ताचा चिखल झाला होता त्यात त्या मेलेल्या प्राण्यांचे अवयव रंगत होते अशा चिखलातून पार जाणे फार अवघड

झाले होते.  ती रक्त व पाण्याची वैतरणा नदी यमाकडे सगळ्यांना नेत आहे असे वाटत होते.
भिमाचे ते कर्तृत्व पाहून दुर्योधन शकूनीला बोलतो,  "त्या भिमाचा नाश केला पाहिजे. त्याच्या नाशात पांडवांचा नाश आहे". ते आज्ञा समजून शकूनी भिमावर चाल करून जातो. त्याच्या बरोबर त्याचे बंधू असतात. ते सगळे भिमाला अडवण्याचा प्रयत्न करू लागतात. परंतु, भिमाला ते आवरू शकत नाहीत. शकूनीचा एक बाण भिमाला त्याच्या चिलखतातून आरपार जाऊन लागतो. परंतु, त्यामुळें भिमावर कांहींच परिणाम होत नाही. अचानक भिम शकूनीवर एक मजबूत बाण मारतो. तो बाण शकूनी तोडून टाकतो. ते पाहून भिमाला फार राग येतो. तो शकूनीचे धनुष्य मोडून टाकतो. ते टाकून शकूनी नवीन धनुष्य घेऊन अनेक बाण भिमावर सोडतो. भिम त्याच्यावर एक शलाक फेकतो. परंतु, शकूनी तोंच पकडून भिमावर फेकतो. भिमाला जखमी करून तो खाली पडतो. ते पाहून कौरवांचे मोठ्या मोठ्याने ओरडून शकूनीचे कौतुक करतात. त्यामुळे संतापलेला भिम शकूनीचे घोडे मारतो. त्याचा सारथी मारतो. त्याचा झेंडा पाडतो व स्तंभसुद्धा खाली उतरवतो. बेसहारा शकूनी जमिनीवर उभा असतो. त्याच्या हातात त्याचे धनुष्य असते. त्यानंतर तो भिमाला अनेक बाण मारतो. ते सगळे बाण भिम उलटवतो. शकूनीला बाणाने घायाळ करतो. शकूनी बेहोष होऊन मातीत मेल्यासारखा पडलेला दिसतो. दुर्योधन त्याला उचलून युद्धातून बाहेर नेतो. शकूनी बाद झाला होता. ते पाहून कौरवांचे सैन्य पांगते. दुर्योधन सुद्धा त्या युद्धातू बाहेर होतो. ते पाहून तुमचे सैन्य सुद्धा पळून जाते. त्या पळणार्या तुमच्या सैन्यावर भिम मागून हल्ला करत असतो. त्यात तो असंख्य सैनिक मारतो. भिम त्यानंतर कर्णाच्या ठिकाणी जातो. कौरवांचे योद्धे कर्णाच्या संरक्षणाखाली भिमाशी लढण्यासाठी सज्ज होतात.
कर्ण पर्व भाग सत्त्याहत्तरावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग अठ्ठ्याहत्तरावा

धृतराष्ट्र बोलतात, "जेव्हां भिम आमचे सैन्य उधळवून लावतो तेव्हां दुर्योधन व शकूनी काय बोलतात? कर्ण काय बोलतो? कृप, कृतवर्मन, अश्वत्थामा, दु:शासन काय बोलतात? पंडुच्या मुलांचे मला कौतुक वाटते ते एका हाती लढत असतात व जिंकतात. मला सांग कर्ण त्याच्या प्रतिज्ञे नुसार वागत होता कां? तो कर्ण कौरवांचे सर्वस्व आहे. त्याच्यामुळे कौरवांना संमृद्धी मिळाली, यश मिळाले, त्याने जेव्हां पाहिले कीं, कुंतीच्या मुलांनी ते धुळीला मिळवले आहे तेव्हां तो काय बोलला? तो युद्धात काय करत होता? माझी मुलं व इतर राजे काय करत होते ते मला सांग". मला तुझा सांगण्याची पद्धत फार आवडते.

संजय बोलतो, त्या दुपारी कर्ण सोमकांचा नाश करू लागतो आणि तेसुद्धा भिमाच्या समक्ष तो करत असतो. त्याच वेळी भिमसुद्धा धृतराष्ट्रींचा नाश करत होता. तेव्हां कर्ण त्याच्या सारथ्याला सल्याला बोलतो, "मला पांडवांच्या फौजा जेथे आहेत तेथे घेऊन चल". तो पुन्हा सल्याला बोलतो, "मला पांचालांच्या फौजा आहेत तेथे घेऊन चल". ते ऐकल्यावर कर्णाच्या रथाचे घोडे छेड्डींच्या पलटणी जेथे होत्या तेथे घेऊन जातो. तेथे पांचाल व कुरुष सुद्धा लढत होते. कर्णाचा रथ येत आहे ते पाहून पांचाल सैनिक घाबरतात. त्याच्या रथाचा आवाज सगळ्यांना ऐकू जात होता. त्याठिकाणी गेल्यावर कर्ण पांडवांचे व पांचालांचे हजारो सैनिक मारून टाकतो. ते पाहिल्यालर पांडवांचे शिखंडी, भिम, धृष्टद्युम्न, नकूल, सहदेव कर्णावर तुटून पडतात. त्यावेशी पराक्रमी सत्यकी कर्णावर बाण मारण्यास सुरूवात करतो. शिखंडी वीस बाण मारतो, धृष्टद्युम्न पांच मारतो, द्रौपदीची मुलं प्रत्येकी पांच मारतात. नकूल व सहदेव शेकडो मारतात. भिम कर्णाच्या खांद्यावर बाण मारतो. परंतु, त्यामुळे कर्णावर कांहींच परिणाम होत नाही. तो सत्यकीचे धनुष्य तोडतो. त्यानंतर तो त्याला जखमी करतो. ते पाहून भिम रागावतो व कर्णावर बाणांचा मारा करू लागतो. त्यामुळे कर्ण सहदेवाचा झेंडा पाडतो. त्याच्या सारथ्याला जखमी करतो. त्यानंतर द्रौपदीच्या मुलांचे रथ तोडतो. ते खरोखरच विलक्षण होते. त्यामुळे ते रणांगणांतून निघून जातात. त्यानंतर तो पुन्हा पांचालांचे सैन्य कापू लागतो. त्याच्यावर मत्स्य आणि छेड्डीचे

सैन्य चाल करते पण ते सगळे ते पळवून लावतो. त्याचे युद्धकौशल्य पाहून सिद्ध आणि चरण फार संतुष्ट झालेले दिसतात. पांडवांचे असंख्य योद्धे तो मारत असतो त्यांमुळे रणांगणात मोठ्याने किंकाळ्या ऐकू येत असतात. सिंह हरणांच्या घोळक्यात घुसला कीं, हरणं कशी पळून जातात तसे पांडवांचे व पांचालांचे योद्धे कर्णाला पाहून पळत होते. शत्रूंचे झेंडे, फलक, घोडे तो तोडत होता जसें क्षत्रिय करतात. कर्णाच्या संहारकृत्यामुळें जमिनीवर रक्ताचा चिखल झाला होता. त्यामध्ये माणूस, हत्ती, घोडे अशा प्राण्यांचे रक्त मिसळलेले होते. वातावरणात फिरत असलेल्या बाणांमुळें जो अंधार पसरलेला होता त्यामुळें कोणी कोणाला नीटपणे पाहू शकत नव्हते. पांडवांचे योद्धे कर्णाच्या बाणाने घेरलेले होते. पांडवांच्या पलटणींना कर्ण फोडत होता ज्यामुळे त्याना कर्णावर संघटीतपणे हल्ला करता येत नव्हता. कर्णाने पळवलेल्या पांडवांच्या सैनिकांवर धृतराष्ट्री सेना हल्ला करत होती. त्यांच्यात मोठा गदारोळ होत होता. ते पाहून दुर्योधनाला फार आनंद झालेला होता. तो कौरवांच्या रणवाद्यवृंदाला त्या विजयाची धून वाजवावयाला सांगतो. त्यांमुळे पांचालांचे पुन्हा परत येतात जीवावर उदार होऊन लढण्यासाठी. परंतु, कर्ण त्याना साफ नष्ट करतो. त्यात वीस रथी आणि कित्येक छेड्डीचे असतात. हत्तीच्या मानेवर बसून लढणारे सुद्धा त्यात असतात. सोमकांचा नाश केल्यावर कोणी मारण्यासाठी उरला नव्हता म्हणून तो रणांगणांत एकटा इकडेतिकडे पहात उभा होता. परंतु, मार खाल्यानंतर सुद्धा पांचालांचे योद्धे पळून जात नाहीत. त्यावेळी दुर्योधन, कृप, अश्वत्थामा, कृतवर्मन, शकूनी, पांडवांचे सैन्य मारत होते. दुसर्या बाजूस धृष्टद्युम्न, सत्यकी, शिखंडी, द्रौपदीची मुलं कौरवांच्या पलटणी कापत होते. त्यात भिमाचा मोठा हिस्सा होता.

कर्ण पर्व भाग अठ्ठ्याहत्तरावा संपला.

# कर्ण पर्व
## भाग एकोणऐंशीवा

संजय पुढे सांगतो, अर्जुनाने कौरवांच्या चारही प्रकारच्या फौजांचा नाश केल्यानंतर तो कर्णाला पहातो. त्या लढाईत रक्ताच्या नद्या वहात होत्या. त्या रक्ताच्या नदीत माणसाचे अवयव तरंगत असलेले दिसत होते. माणसांची मुंडकी खडकासारखी त्यात पडलेली दिसत होती. हत्तींचे व घोड्यांचे मृत शरीरं त्यात दिसत होती. ते रक्त माणूस, घोडे व हत्ती असे सगळ्यांचे होते. थिजलेल्या रक्ताच्या थरात ते अडकलेले दिसत होते. त्यावर गिधाडं घिरट्या घालत होती. मोडलेल्या छत्र्या, रथाचे भाग त्यात पडलेले दिसत होते. त्यात ढाली व तलवारी सुद्धा पडलेली दिसत होती. जिंकणारे क्षत्रिय ते पाहून हसत होते व घाबरे ते पाहून दचकत होते. त्यातून जात असतांना विभत्सू कृष्णाला बोलतो, "अरे जनार्दना, तो पहा कर्णाचा झेंडा फडकत आहे. तेथे भिमसेन व इतर त्याच्याशी लढत आहेत. त्यात पांचाल आहेत, सोमकसुद्धा दिसत आहेत. पलिकडे दुर्योधन त्याच्या शूभ्र छत्रीत दिसत आहे. ते दोघे पांचालांचा विध्वंस करण्यात गुंतलेले आहेत. कृप, कृतवर्मन, अश्वत्थामा दुर्योधनाला संरक्षण देत आहेत. तो सल्य कर्णाचे सारथ्य करत आहे. मला त्या ठिकाणी जावयाचे आहे, तरी तू आपला रथ तेथे घेऊन जा. कर्णाचा वध केल्याशिवाय मी परत तंबूत जाणार नाही आज हे तुला माहीत आहे. त्याला नाही मारले तर तो पांचाल व श्रींजयांचा नाश करत राहील. कृष्ण त्यांचा शूभ्र घोडे असलेला रथ त्या दिशेने वळवतो. तेथे त्यांचे द्वंद्व व्हावे असे त्याला पाहिजे होते. अर्जुनाच्या रथाचा गडगडाट सगळ्यांना ऐकू येतो. अर्जुनाचा रथ येतांना सल्य पहातो व तो कर्णाला बोलतो, "तो पहा अर्जुन येत आहे तुला आव्हान देण्यासाठी. त्याच्या हातात गांडीव सज्ज आहे तुझ्याशी लढण्यासाठी. जर तू त्याचा आज वध केलास तर ती मोठी गोष्ट ठरेल कौरवांसाठी. तो येत आहे तसा तू सुद्धा त्याला सामोरी जा व द्वंद्वांस सुरूवात करा. तो इतर सगळ्या योद्ध्यांना सारून तुझ्याकडे येत आहे ते पहा. तू भिमाला हैराण केले आहेस तसेंच युधिष्ठीराला जखमी केले आहेस त्या सगळ्यांचे उकटे तो काढणार आहे तुझ्याशी लढून. शिखंडीची व धृष्टद्युम्नाची

व इतर पांडवांची जी अवस्था तू केली आहेस त्याचा वचपा तो काढणार आहे. त्याला सामोरी जा कारण, तुझ्याशिवाय दुसरा कोणी आपल्याकडे नाही जो पार्थाला भिडू शकेल. त्याच्या संरक्षणासाठी त्याच्या मागेपुढे बाजूला कोणी दिसत नाही म्हणजे तो कोणत्याही संरक्षणाशिवाय तुला आव्हान देत आहे. तू मात्र तुझ्या भोवती संरक्षक ठेवलेले आहेस. त्यामुळे तुझा विजय निश्चित आहे. एक जगन्नाथ सोडला तर इतर कोणी त्याचे संरक्षक दिसत नाहीत. अर्जुनाला घाबरून आपले मोठे मोठे शूरवीर पळून जात आहेत. त्याला जर तू मारलेस तर दुर्योधनाचा विजय निश्चित आहे. म्हणून तू त्याला सामोरी जा व लढावयाला सुरूवात कर. शरसंधान करतांना जनार्दनालासुद्धा बाण मारत जा कारण त्याचा सव्यसाचीला मोठा आधार आहे".

संजय पुढे सांगतो, कर्ण त्याला सांगतो, "तू आता चांगल्या मनस्थितीत आहेस हे मला आवडले. मी धनंजयाला घाबरत नाही. आज तू माझे कर्तृत्व पहात रहा. एका हाताने संरक्षकांच्या मदतीशिवाय मी त्याचा परामर्श घेणार आहे ते तू पहात रहा. मी आज त्याचा वध केल्याशिवाय दुर्योधनाला माझे तोंड दाखवणार नाही. मी त्या दोनही कृष्णांचा नाश करणार आहे. त्या दोघांना मारल्याशिवाय मी परत जाणार नाही माझ्या तंबूत आज नाहीतर मी ह्या रणभूमीत चीरनिद्रा घेत राहीन. जिंकणे अथवा हरणे हे आपल्या हातात नसते. प्रयत्न करत रहाणे आपल्या हातात असते".

सल्य त्यावर बोलतो, "अरे महारथी, हा अर्जुन एकटा सुद्धा अजिंक्य असतो. त्यात त्याला कृष्णाची साथ आहे, अशा परिस्थितीत कोण त्याच्याशी मुकाबला करणार"?

कर्ण बोलतो, "माझ्या माहितीप्रमाणे असा रथी अजून जन्मलेला नाही. तो कृष्णाने संरक्षित केला आहे हे खरे. परंतु, कदाचित तू सांगतोस तसे असेल तर तो मला यमाकडे धाडू शकेल. एक लक्षात ठेव जर कर्ण मेला तर सगळे कौरव सुद्धा मेले असें समज. हे माझे हात कधी घामाने भिजले नाहीत किंवा थरथरले नाहीत. माझ्या हातातील धनुष्य मजबूत असते. त्यात मोठी कसब आहे. त्यात चपळाई आहे. एक मात्र खरे कीं अर्जुनासारखा धनुर्धारी नाही. एका वेळी तो अनेक बाण मारू शकतो जसे ते एकच आहेत. त्याचा नेम कधी चुकत नाही. असा अतिरथी कृष्णाच्या साथीत आहे. त्याच्यावर अग्नीची कृपा आहे, कृष्णाचे चक्र त्याच्या बरोबर आहे, तो चपळ रथ व ते घोडे आहेत, त्याच्याकडे न संपणारे

भाते आहेत. अनेक दैवी अस्त्र व आयुध आहेत, इंद्राने दिलेला देवदत्त शंख आहे. त्याने असंख्य दैत्यांना मारले आहे. सगळे कलकेय राक्षस त्याने मारले आहेत. अशा बरोबर कोण बरोबरी करणार? त्याची तपस्या मोठी आहे, महादेवांची कृपा आहे, महादेवाने त्याचे पशुपत त्याला दिले आहे. विश्वातील अनेक देवांनी त्यांची विविध शस्त्रं त्याला बहाल केली आहेत, त्यामुळें त्याची उर्जा अमाप आहे. त्यामुळे तो सहजपणे असुरांना, राक्षसांना मारत होता. विराटाच्या नगरीत त्याने त्या कलखंजाचा वध केला. स्त्रीरुपात त्याने विराटांची जनावरं कौरवांपासून सोडवली त्यात माझी नामुष्की त्याने केली आहे हे मी विसरणार नाही. मी त्याच्या धैर्याचे कौतुक करतो परंतु, अशा बरोबर मी लढणार आहे ह्यातच माझे वैशिष्ट्य आहे असे मी समजतो. त्या दोघांना एका रथात येतांना पाहून माझ्या हृदयात कालवाकालव होते हे खरे आहे, पण त्यातूनच माझे धैर्य वाढत असते. अरे सल्या, मला माझे भाग्य वाचवेल त्यांच्या पासून. माझी इच्छा त्याच्या बरोबर द्वंद्व करण्याची आज पूर्ण होणार आहे. मला तू लवकर त्यांच्या समोर घेऊन जा". एक तर मी त्यांना हरवीन किंवा ते मला. असे कर्ण सल्याला बोलत असतो. तसे बोलल्यानंतर तो मोठ्या मोठ्याने आव्हानात्मक गर्जना करू लागतो. त्यानंतर तो तुमच्या मुलाला भेटतो. त्याशिवाय कृप आणि भोज राजा कृतवर्मन ह्यांना सुद्धा भेटतो. त्यानंतर तो शकूनी त्याचे बधू अशा सगळ्यांना भेटतो. ते झाल्यावर त्याच्या पायदला बरोबर तो अच्युत व अर्जुनांशी लढण्यासाठी निघतो. ते सगळे त्याला त्यांच्या शुभेच्छा देतात. त्याचे योद्धे अर्जुनावर बाणांचा वर्षाव करू लागतात. अर्जुन ते सगळे उलटवत असतो. अर्जुनाचे चापल्य विलक्षण होते. तो कधी बाण लावतो व फेकतो ते समजत नव्हते. फक्त त्याच्या बाणाने मेलेले प्राणी दिसत होते. तो लढत असतांना त्याच्याकडे पहाता येत नव्हते. कधी त्याचे बाण त्यांना लागत होते तेंच त्याना समजत नव्हते. त्याच्या शरसंधानाने तुमचे सैन्य मारले जात होते. ते होत असतांना कृप व कृतवर्मन त्याच्यावर जातात. त्यानंतर त्याना अश्वत्थामा जाऊन मिळतो. असे ते तिघे अर्जुनावर हल्ला करत असतात. परंतु, अर्जुन त्यांना भारी होत असतो. त्यांच्या छातीत त्याचे बाण रुतून जातात. अश्वत्थामा अर्जुना बरोबर कृष्ण व कपी मुद्रेवर सुद्धाबाण मारत असतो. त्यांचे ते सगळे बाण अर्जुन बाद करत असतो. त्याचे सारथी व घोडे सगळे त्याच्या बाणांने बाद होत असतात. त्यामुळें चिडलेला अश्वत्थामा

सापाचे बाण काढतो. त्या बाणांनी तो अर्जुन व कृष्ण दोघाना जखमी करतो. कृप व कृतवर्मन पांडवांच्या फौजांवर जातात. अर्जुन ते पहातो व कृपांवर व त्यांच्या घोड्यावर मारा करतो. त्याच्या मारामुळे पार्थाचे बाण तुटू लागतात. ते पाहून अर्जुन कृतवर्मनाचे घोडे मारून टाकतो. त्यानंतर तो कृपाना जखमी करतो. जसे भिष्माना त्याने केले होते त्यानंतर ते खाली पडले होते. त्यानंतर तो त्यांचे हत्ती मारू लागतो. त्यांचे ध्वज पाडतो. त्यामुळे कौरवांचे सैन्य पळू लागते. ते मारलेले योद्धे उजव्या बाजूला घेऊन ते आपला रथ वेगांने नेऊ लागतात. त्याच्याशी लढण्याची इच्छा असलेले राजे त्यांचा पाठलाग करू लागतात. त्यावेळी शिखंडी व सत्यकी, नकूल व सहदेव धनंजयाला संरक्षण देण्यासाठी जातात त्या अतिउत्साही राजांना आवरणासाठी. मोठा गदारोळ होत असतो. सगळ्या प्रकारचे योद्धे त्यात हत्तीस्वार, घोडेस्वार असे सगळे त्यांच्याशी लढू लागतात. तुंबळ युद्ध सुरू होते. त्या युद्धात आकाशात फेकलेल्या बाणांने सूर्याचा प्रकाश अडवला गेला व सगळीकडे अंधार पसरला.

कर्ण पर्व भाग एकोण ऐंशीवा संपला.

# कर्ण पर्व
## भाग ऐंशीवा
संजय पुढे सांगतो, भिमाला वाचवण्यासाठी धनंजय कर्णाच्या फौजांवर चालून जातो. त्यामुळे भिमाला सतावणारे दूर पळून जातात. अर्जुनाचे बाण तुमच्या फौजांचा नाश करत होते त्याशिवाय आकाशात ते सर्वत्र पसरलेले दिसत होते. धनंजय यमाचा अवतार बनून तेथे वावरत होता. ते रणांगण मेलेल्या योद्ध्याने भरलेले होते. तशी वैतरणी नदी असावी असें वाटत होते. जमिनीवर मोडलेले रथ त्याची चाकं आणि तुटलेले बाण असे सगळे विखूरलेले दिसत होते. अर्जुनाच्या बाणामुळें चारशे हत्ती त्यांच्यावरील माहूतासह खाली कोसळले होते. त्या मेलेल्या हत्तींच्या अंगावरून त्याचा रथ मोठ्या चपळाईने पुढे जात होता. गांडीवाच्या आवाजाने परिसर भरला होता. त्या बाणामुळें अशनिंचा पाऊस पडत असल्यासारखे वाटत होते. त्या पेटत्या बाणांमुळें सगळीकडे आगी लागल्यासारखे दिसत होते. अर्जुनाच्या हल्ल्याने बेजार झालेले तुमचे सैनिक पळून जात होते. जंगलात लागलेल्या आगीमुळें घाबरून जसे प्राणी धावत पळत जातात तसे ते जात होते रणांगण सोडून. अशारितीने भिमा भोवती असलेले कौरवांचे सैन्य घालवल्यानंतर अर्जुन भिमाला भेटतो. त्याच्याशी कांहीं तो बोलत असल्याचे दिसत होते. तो सांगतो कीं, युधिष्ठीराच्या अंगात घुसलेले सगळे बाण काढलेले आहेत आणि आता तो बरा आहे. त्यानंतर ते दोघे पुन्हा शत्रूच्या भागात घुसतात. त्यावेळी दुःशासनाचे दहा योद्धे त्यांना आव्हान देतात. ते आव्हान देणारे उजव्या बाजूस रहातील अशाप्रकारे तो त्यांचा रथ काढतो. तो कौरवांचे सैन्य यमाकडे पाठवू लागतो. धनंजय त्यांचे ध्वज पाडतो. त्यांचे स्तंभ पाडतो. त्यानंतर तो त्याच्या धारदार बाणांने त्यांची डोकी उडवायला सुरूवात करतो. त्या सगळ्या दहाजणांचा तो नाश करतो. त्यानंतर तो शत्रूंजय पुढे निघतो.

कर्ण पर्व भाग ऐंशीवा संपला.

# कर्ण पर्व

## भाग एक्याऐंशीवा

संजय पुढे सांगतो. त्या सुमारास नव्वद रथी कौरवांचे त्याच्यावर चाल करतात. तो मोठ्या मोठ्याने ओरडत येत असतात. परंतु, कृष्ण व अर्जुन त्यांना घाबरत नाहीत. ते कर्णाच्या रथाकडे कूच करतात. ते नव्वद संसप्तक धनंजयाचा पाठलाग करू लागतात. अर्जुन त्यांना रोखण्यासाठी त्यांची मुंडकी उडवू लागतो. ते सगळे ठार होतात. रणांगणांत ते इतस्ततः पडलेले होते जसे सिद्ध स्वर्गातून खाली कोसळतात जेव्हां ते भ्रष्ट होतात. इतर कौरव सैन्य त्यांचा पाठलाग करत असतात जेथे ते जातात तेथे ते त्यांच्या मागे असतात. ते धनंजयाला वेढा घालतात. ते अर्जुनाला शलाकांने मारावयाला सुरूवात करतात. त्यानंतर तो भाले, तलवारी अशी आयुध वापरतात त्याला अडवण्यासाठी. अर्जुन त्याच्या मंतरलेल्या बाणांने त्यांचा हल्ला परतवत असतो. दुर्योधनाच्या नेतृत्वात तेराशे हत्ती घेऊन म्लेच्छ त्यांच्यावर चालून जातात. ते विविध आयुध वापरत असतात. त्यामध्ये नलिका, काटेरी बाण, शलाक असे असतात. कांहीं हत्ती त्यांच्या सोंडीने भाले अर्जुनावर फेकत असतात. ते फार जोराने येत असतात. परंतु, अर्जुन ते सगळे उलटवत असतो. अर्जुनाच्या सोनेरी बाणाने ते हत्ती खाली कोसळत असतात. कांहीं हत्ती बेताल होऊन सैरावैरा धावू लागतात. त्यामुळें अर्जुनाचे सामर्थ्य समजत होते. ते पाहून भिम त्याच्या मदतीला धावतो. ते पाहून तुमचे सैन्य तेथून पळून जाते. कधीही न थकणारा भिम त्याची भलीमोठी गदा घेऊन पार्थाचे संरक्षण करत होता. त्याच्या गदेने तुमचे अनेक योद्धे ठार मारले जातात. तेथे फिरणारे मांसाहारी हिंस्त्र प्राणी ते खाऊ लागतात. अशारितीने तो दहा हजार घोडे मारतो. त्यानंतर भिम कौरवांच्या हत्तीदलात घूसतो. थोड्याच अवधीत तो ते सगळे हत्ती मारतो. ते केल्यानंतर भिम त्याच्या रथात चढतो व अर्जुनाच्या बरोबर जाऊ लागतो. ते पाहून दुर्योधन अतिदुःखी झालेला खिन्न होऊन त्या मेलेल्या हत्तींकडे पहात रहातो. त्यावेळी अर्जुन त्याच्या बाणांने उरलेले तुमचे योद्धे ठार मारत असतो. ते मरणारे जोराजोरांने किंकाळत असतात. तुमचे सैन्य वेगांने तेथून काढता पाय घेतात. तरी कौरव आणि पांडवांचे युद्ध तसेंच चालू होते. जखमी झाला नाही असा एकही सैनिक तेथे दिसत

नव्हता. सगळे त्यांच्या रक्ताने भरलेले होते. सगळे हत्ती, घोडे असे जखमी झालेले होते. सव्यसाचीचा जोम पाहून कौरवांना कर्णाच्याबद्दल काळजी वाटू लागली होती. अर्जुनाच्या बाणामुळे जखमी झालेले कर्णाला सोडून जात होते. कर्ण एकटा होत होता. त्याचे संरक्षण कमी होत होते. त्यावेळी दुर्योधन कर्णाच्या रथाकडे निघतो. कौरवांचे योद्धे त्याप्रमाणे कर्णाच्या संरक्षणात जाऊ लागतात. कर्ण त्या घाबरलेल्या योद्ध्याना सांगतो, "घाबरू नका, मी तुमचे संरक्षण करणार आहे. तो खोल श्वास घेत अर्जुनाचा मुकाबला करण्यासाठी सज्ज होतो. तो पांचालांवर चालून जातो. सव्यसाचीच्या समक्ष तो पांचालांवर हल्ला करतो. त्यांच्यापैकी कित्येक कर्णावर वार करू लागतात. त्यांचे हजारो बाण कर्णावर येतात. कर्ण त्यांच्यावर बाण मारत असतो.

कर्ण पर्व भाग एक्याऐंशीवा संपला.

# कर्ण पर्व

## भाग ब्याऐंशीवा

संजय पुढे सांगतो, कौरवांच्या फौजा पळत असतांना कर्ण पांचालांच्या सैन्याचा परामर्श घेत होते. तो अंजलिका बाण वापरून जनमेजयाचे घोडे व सारथी मारतो. त्यानंतर तो सतनिकाला बाण मारतो. श्रृतसोमाला बाण मारतो. त्यांचे धनुष्य तोडतो. त्या नंतर तो धृष्टद्युम्नाला सहा बाण मारतो. त्या बरोबर त्याचे घोडे मारून टाकतो. त्यानंतर सत्यकीचे घोडेसुद्धा मारून टाकतो. त्यानंतर कर्ण विसोकाला मारतो. तो कैकेयाचा मुलगा होता. त्याबरोबर कैकेयाचे सैनिक कर्णावर तुटून पडतात. त्यांचा नेता उग्रकर्मन कर्णाच्या मुलावर प्रसन्नावर हल्ला करतो. तेव्हां कर्ण त्याच्या धारदार बाणांने उग्रकर्मनाचे हात व डोके कापून टाकतो. तो मरून पडतो. त्याचवेळी कर्णाच्या मुलाला सत्यकी बाणाने असें मारतो कीं, तो खाली पडतो. त्यात प्रसन्नाचा मृत्यू होतो. ते ऐकून कर्णाला धक्का बसतो. तो संतापतो, तो सत्यकीला आव्हान देतो कीं, आता त्याचा मृत्यू निश्चित आहे. त्याच्यावर तो एक बाण मारतो परंतु, शिखंडी तो बाण तोडतो. त्याबरोबर कर्ण त्याचा ध्वज पाडतो व त्याच्यावर अनेक बाण मारत रहातो. त्यानंतर कर्ण धृष्टद्युम्नाच्या मुलाचे डोके उडवतो. त्यानंतर तो सुतसोमाला बाणाने भोसकतो. ते युद्ध होत असतांना व धृष्टद्युम्नाच्या मुलाच्या वधानंतर कृष्ण पार्थाला बोलतो, "अरे पार्थ, तो कर्ण पांचालांचा उध्वंस करत आहे. आता तू कर्णाचा वध केला पाहिजेस". ते ऐकल्यावर अर्जुन गालातल्या गालात हसत कर्णाच्या रथाकडे जाण्याचे कृष्णाला सांगतो. त्याच्या गांडीवाच्या आवाजानंतर इतके बाण तो सोडतो कीं, त्यामुळें अंधार पसरतो. त्या बाणांच्या वर्षावामुळे अनेक योद्धे मृत्यूमुखी पडतात. भिमसेन त्याच्या मागे होता. तो अर्जुनाला संरक्षण देत होता. ते दोघे मोठ्या वेगांने कर्णाच्या रथाकडे जात असतात. ते होत असतांना कर्ण सोमकांचा विध्वंस करत होता. त्यांचे अनेक हत्ती व घोडे तो मारत असतो. उत्तमौजस, जनमेजय, युधमन्यू, शिखंडी धृष्टद्युमनाच्या बरोबर मोठ्या मोठ्याने ओरडत कर्णावर चालून जातात. कर्णावर बाणांचा वर्षाव करत असतात. तरी त्याच्यावर कांहींच परिणाम झालेला दिसत नाही. तो मात्र त्यांची धनुष्ये, ध्वज, झेंडे असे सगळे मारत असतो. ते पाहून ते सगळे खिन्न झालेले

दिसत होते. त्यानंतर कर्ण शिखंडीला भोसकतो. उत्तमौजसाला सुद्धा भोसकतो, युधमन्युला तीन बाण मारतो. सोमकांच्या जनमेजयाला एक बाण मारतो. ते कर्णापुढे हार मानतात. त्यावेळी द्रौपदीचा पांच मुलं त्यांच्या सुसज्ज रथाने तेथे पोहोचतात. ते त्यांच्या मामांना कर्णाच्या पकडीतून सोडवतात. त्यावेळी सिनीचा नातू सत्यकी कर्णाचे बाण तोडत व कर्णावर वार करत, त्यानंतर दुर्योधनाला जखमी करतो. कृप, कृतवर्मन, तुमचा मुलगा, कर्ण स्वतः त्याच्या मागे लागतात. परंतु, तो यदूकुळी त्या चोघांना भारी जात असतो. त्याला हरवणे केवळ अशक्य होते. तो त्या सगळ्या रथी महारथींना थकवत असतो. त्यावेळी पांचालांचे योद्धे पुन्हा कर्णाच्या टोळीवर हल्ला करतात. ते सत्यकीला संरक्षण देत असता जसे मरुत इंद्राला आधार देत असतं दैत्यांशी तो लढत असतांना. कौरवांचे सैनिक मारले जात होते. त्यावेळी दुःशासन भिमावर चाल करून जातो. त्यांच्यात द्वंद्व सुरू होते. ते फार भीषण होते. ते एकमेकांना जबर जखमा करतात. वृकोदर दुःशासनाचे ध्वजस्तंभ मोडून टाकतो. त्यानंतर तो दुःशासनाच्या सारथ्याचे डोके धडापासून वेगळे करतो एका धारदार बाणानी. रथाची लगाम पकडत तो भिमावर बाण मारत असतो. ते फार मुष्कील होते. त्यानंतर दुःशासन एक मजबूत बाण भिमावर मारतो. त्यामुळे भिम खाली पडतो. त्याचे अवयव काम करेनासे होतात. तो त्याच्या रथात पडून रहातो. परंतु, थोड्याच वेळांत तो सावध होतो व डरकाळ्या फोडू लागतो.

कर्ण पर्व भाग ब्यांऐंशीवा संपला.

# कर्ण पर्व
## भाग त्र्यांऐशीवा

संजय पुढे सांगतो, दुःशासन मोठ्या हिम्मतीने त्यात लढत होता भिमाशी. तो भिमाचे धनुष्य तोडून टाकतो. त्यानंतर भिमाला तो बाण मारून जखमी करत असतो. त्या हल्ल्यामुळे संतापलेला भिम त्याच्यावर एक शलाक फेकतो. तो येत आहे ते पाहून त्याचे तुकडे दुःशासन करतो. ते त्याला जमल्यामुळे त्याचे सगळे कौतुक करू लागतात. त्यानंतर तो भिमाला बाणांने जखमी करतो. ती जखम खोल असते. भिम त्याला बोलतो, जरी मला जखमा झाल्या तरी माझ्या गदेच्या प्रहारानंतर तू रहाणार नाहीस. असें बोलून तो, त्याची भलीमोठी गदा घेतो व बोलतो दुःशासनाला, "अरे नीच माणसा, आज मी तुझे रक्त पिणार आहे". असे बोलत असतांना तुमचा मुलगा त्याच्यावर एक तीक्ष्ण शलाक फेकतो. त्याच वेळी भिम त्याची गदा शत्रूवर फेकतो. ती गदा त्या तीक्ष्ण शलाकाला तोडून दुःशासनावर पडते. तिच्या आघाताने दुःशासन खाली पडतो व तडफडू लागतो. ते पहात भिम तेथे असलेल्या इतर योद्ध्याना दुःशासनाची कृष्णकृत्ये सांगू लागतो. त्याला द्रौपदीचे त्याने केलेले अपमान आठवून सांगत असतो. त्यांचा केलेला अपमान ते सगळे तो त्या जमलेल्या शूरांना सांगत असतो. त्यानंतर भिम कृप, कर्ण, कृतवर्मन आणि अश्वत्थामा ह्यांना उद्देशून बोलतो. "मी आज ह्यांचे रक्त पिणार आहे". त्याच्या रथातून उडी मारून तो उतरतो व दुःशासनाकडे एकटक पहात असतो. त्यानंत तो त्याची तलवार काढतो, एक पाय दुःशासनाच्या मानेवर ठेवतो, त्याची छाती तलवारीने कापून उघडी करतो. त्यातून जोरात बाहेर उसळत येणारे रक्त तो पिऊ लागतो. सगळे कौरवांचे योद्धे ते पहात असतात. पुढे तो सगळ्यांना सांगतो, "माझ्या आईच्या दुधापेक्षा हे शत्रूचे रक्त मला जास्त चवदार लागत आहे. अमृतापेक्षा जास्त चांगले मला वाटत आहे. असे बोलत तो ते रक्त पित असतो. त्याचा मृत देह पाहून तो अक्राळ विक्राळ हसून लागतो. "त्याला मृत्यूने माझ्या हातून सोडवले आहे, नाही तर मी आणखीन हाल त्याचे केले असते असें तो बोलतो. त्याचा तो अवतार पाहून कित्येक बेशुद्ध झाले व खाली पडले. कांहींच्या हातातील शस्त्रं खाली पडली, बाकीचे पळून गेले. चित्रसेन म्हणतो, हा भिम माणूस नाही, हा राक्षस आहे

असे कांहीं बोलत होते. युधमन्यू त्यांच्यावर हल्ला करतो. त्याला बाणाने जखमी करतो. त्यांच्यात युद्ध सुरू होते. पांचाल पुत्र त्याला तीन बाण मारतो. त्याच्या सारथ्याला मारतो. त्यामुळे चित्रसेन कोसळतो. कर्णाचा तो मुलगा मेला हे त्याला समजते. कर्ण पांडवांशी लढू लागतो मोठ्या त्वेषाने. ते पाहून नकुल तेथे जातो. भिम पुन्हा दुःशासनाचे रक्त एका पेल्यात घेऊन सगळ्याना दाखवत कर्णाच्या पुढे पित असतो. तो बोलतो, कोणी कांहीं बोलो मी त्या नीचाचे रक्त पिणार आहे. असें बोलून तो पुन्हा हसू लागतो. "ते आम्हाला हसले आता आमची पाळी आहे त्यांना हसण्याची असें बोलत भिम पुन्हा जोराने हसत रहातो. त्याला त्या सगळ्या गोष्टी आठवत होत्या, विषप्रयोग, घराला आग लावणे, वनवास, द्युताचा खेळ असे सगळे तो आठवत मोठ्याने बोलत असतो. आम्ही सगळे तेरा वर्षे सहन केले आता तुमची पाळी आहे. भिमाच्या शरीरातून त्याचे रक्त वाहात होते. त्याला अर्जुन व कृष्णांचा आठवण येते. मी दुःशासनाबद्दल जे बोललो होतो ते खरे केले ह्याचा मला आनंद होत आहे. आता मला आणखीन कांहींजणाची वाट लावावयाची आहे. तो दुर्योधन, त्याचा जेव्हां मी वध करीन तेव्हां मला खरी शांती प्राप्त होईल. त्यानंतर त्याच्या गर्जना ऐकून इंद्राच्या गर्जनांची आठवण आकाशात बसलेल्या प्रेक्षकांना येत होती.

कर्ण पर्व भाग त्र्यांऐशीवा संपला.

# कर्ण पर्व
## भाग चौर्याऐंशीवा

संजय पुढे सांगतो, दुःशासनाच्या वधानंतर तुमचे दहा मुलगे जे कधी हरले नव्हते ते भिमाला गराडा घालतात. ते भीमावर बाणांचा वर्षाव करू लागतात, ते म्हणजे निशंजिन, कवचिन, पशिन, दुंधधर, धनुर्ग्रह, अलोलुप, सह, शांद, वतवेग आणि सुवर्चरस असे होते. त्यांच्या मोठ्या भावाच्या मरणाने ते व्यथीत झालेले होते. त्या सगळ्याना भिम पुरून उरतो. पार्थ त्या दहा जणाना त्याच्या बाणाने यमाकडे पाठवतो. ते दहाजण मेल्यामुळें कौरवांचे सैन्य रणभूमी सोडून जाऊ लागते. त्याच वेळी भिमाचा अवतार पाहून कर्णाला भिती वाटू लागते. सल्याला ते समजते, तो त्याला बोलतो, "दुःखी होऊ नकोस. तसे तुला शोभत नाही. भिमाला पाहून सगळे राजे पळत आहेत, दुःशासनाच्या वधामुळे त्यांची मनस्थिती बिघडलेली आहे. भिमाने त्याचे रक्त पिणे त्यांना विशेष त्रासदायक झाले आहे. दुर्योधन त्या धक्क्यातून बाहेर येऊ शकत नाही. अजून कृप व इतर योद्धे हयात आहेत. म्हणून पांडवांना तोंड देण्यासाठी तू तयार असले पाहिजेस. दुर्योधनाची सगळी मदार तुझ्यावर आहे. तुझे काम विजय मिळवून देणे आहे. त्यात जरी मेलास तरी स्वर्ग तुला खात्रीने मिळणार आहे". ते सल्याचे कर्णाला पटते. तो नव्या जोमांने अर्जुनावर चाल करतो. त्यावेळी भिम त्याची गदा घेऊन कौरवांच्या पलटणी नष्ट करत असतो. नकूल कर्णाच्या मुलावर चाल करतो. जसा मेघावत जंभावर गेला होता. तो त्याचा झेंडा पाडतो. त्यानंतर त्याचे धनुष्य तोडतो. त्यानंतर त्याच्या कडील दैवी आयुधांने तो त्याच्यावर हल्ला करतो. कर्णाचा मुलगा त्याची दुर्योधना कडील इमानदारी दाखवण्यासाठी त्याची ठेवणीतील अस्त्र काढतो. तो नकूलाचे घोडे मारतो. नकूल त्याच्या रथातून उतरतो व तलवार घेऊन लढण्यासाठी निघतो. त्या तलवारीने नकूल कौरवांचे दोन हजार योद्धे ठार मारतो. कर्णाचा मुलगा अचानकपणे नकूलावर चालून जातो त्याला ठार मारण्यासाठी. ते दोघे एकमेकांना मारण्यासाठी एकमेकांवर चालून जातात. वृषसेन नकूलाची तलवार तोडतो. त्यानंतर तो त्याच्यावर बाण मारत असतो. त्यानंतर वृषसेन नकूलाला जखमी करतो. जखमी झालेला नकूल भिमाच्या रथाकडे जातो. ते धनंजय पहात असतो. वृषसेन

त्या दोघा भावंडांवर बाणाचा मारा करू लागतो. त्यानंतर भिम आणि अर्जुन वृषसेन व इतर कौरवांवर चालून जातात. भिम पार्थाला सांगतो नकूल हा आपली जबाबदारी आहे त्याला फार लागले आहे. त्यासाठी वृषसेनाचा बंदोबस्त झाला पाहिजे. अर्जुन ते ऐकतो व समजतो कीं त्याने काय करावे असे आहे. कृष्ण त्यांचा रथ वृषसेनाकडे नेऊ लागतो.

कर्ण पर्व भाग चौर्याऐंशीवा संपला.

# कर्ण पर्व

## भाग पंच्याऐंशीवा

संजय पुढे सांगतो, पांडवांच्या शूरसेनेचे म्हणजे द्रुपदाचे पांच, सत्यकी, पांच द्रौपदीची मुलं असे अकरा नकूलाला मदत करण्यासाठी निघतात जेव्हां त्यांना समजते कीं, ते बेसहारा झाला आहे. ते अकराजण कौरवांचे हत्तीदल प्रथम नष्ट करतात. त्यानंतर घोडदळ, पायदळ असें नष्ट करत जातात. कौरवांचे कृतवर्मन, अश्वत्थामा आणि दुर्योचन, शकूनीचा मुलगा उलूक आणि कर्ण, देववृद्ध त्यांच्याशी दोन हात करण्यासाठी पुढे सरसावतात. पांडवांचे अकराजण त्या कौरवांचा मुकाबला करतात. त्यांना चांगल्या प्रकारे आवरतात. पांडवांचे मित्र राजे कुलिंदास त्यांचे हिमालयात वाढलेले प्रचंड हत्ती घेऊन कौरवांवर चाल करतो. कुलिंदासचा युवराज कृपावर बाणांचे वार करतो. त्या मारामुळे कृप खाली कोसळतात. त्याचा धाकटा भाऊ कृपांच्या रथाची मोडतोड करतो. ते करत असतांना ते मोठ्याने ओरडत असतात. ते होत असतांना शकूनी कुलिंदासचे डोके उडवतो. ते पाहून तुमचे फार खूष होतात व आनंदाने रणवाद्ये वाजवू लागतात. नवीन उत्साहाने तुमचे सैनिक पांडवांवर हल्ले करू लागतात. त्यावेळी कौरवांच्या फौजा एका बाजूस व दुसर्या बाजूस श्रींजय आणि पांडव असे युद्ध होते ते फार भीषण होते. त्यामध्ये विविध शस्त्रं वापरली गेली. त्यात भोज कुलिंदासचे मोठे हत्ती मारण्याचा सपाटा सुरू करतो. त्यात अश्वत्थामा त्याच्या लांब बाणाने हत्तीना ठार मारतो. ते कोसळतात. त्यांच्यांवरील सगळी शस्त्रं खाली पडतात. कुलिंदासाचा तिसरा मुलगा दुर्योधनावर वार करतो. त्या बदल्यात तुमचा मुलगा त्याच्यावर प्रतिहल्ला करतो. कुलिंदासचा मुलगा थोडक्यात बचावतो. तो दुसर्या हत्तीवर चढतो. त्याला कृपांचे बाण लागलेले असतात. त्या राजपुत्राला वृकाचे बाण लागतात व त्यात तो जखमी होतो. मगधचा युवराज बभ्रू सहदेवाच्या बाणांने जखमी झालेला होता. तो खाली पडतो. त्यानंतर कुलिंदास त्यांच्या हत्तीफौजेने शकूनीवर हल्ला करतात. त्यात गांधार राजा त्यांची मुंडकी उडवू लागतो. त्यावेळी सतनिकाच्या हल्ल्याने कौरवांच्या मोठ्या फौजा मारल्या जात होत्या. त्यावेळी कौरवांच्या बाजूने लढणारा कुलिंद योद्धा सतनिकाला बाण मारतो. परंतु, नकूल त्याचे डोके उडवतो. त्यानंतर कर्णाचा मुलगा

सतनिकाला बाण मारतो. त्या शिवाय तो अर्जुनाला सुद्धा बाण मारतो. तो भिमाला तीन व नकूलाला सात मारतो. त्याशिवाय जनार्दनाला बारा बाण मारतो. वृषसेनाचे ते कर्तब पाहून कौरवांच्या बाजूचे सगळे त्याचे कौतुक करतात. परंतु, ज्याना अर्जुनाचा खाक्या माहीत होता ते समजतात कीं आता वृषसेनाची यमाकडे जाण्याची पाळी आली आहे. अर्जुन त्याच्या धाकट्या भांवाने त्रासात पहातो व तो ते सहन करणार्यां पैकी नव्हता. त्यावेळी वृषसेन कर्णाच्या पुढ्यात राहून लढत होता. मिळाल्या यशामुळे मस्तीत तो कर्णाचा मुलगा अर्जुनावर चाल करतो. पार्थावर तो बाण मारतो. पुन्हा तो पार्थाच्या खाकेत बाण मारतो. कृष्णावरसुद्धा बाण मारत रहातो. अर्जुनाला त्याची ती आगाऊगिरी रुचत नाही. तो वृषसेनाचा वध करण्याचे ठरवतो. तो रागात येऊन त्याच्यावर बाण मारत असतो. तो कर्णाला बोलतो, "तुझ्या नजरेसमोर मी तुझ्या मुलाला आता मारणार आहे. त्याला यमाकडे धाडणार आहे". हे त्याचे उद्‌गार तेथे असलेले कौरवांचे मोठे सेनानी सुद्धा ऐकत असतात. "नकूल असहाय असतांना तो त्याला मारत होता त्याची किंमत तो आता देणार आहे. त्याला तुम्ही सगळे कितीही संरक्षण देण्याचा प्रयत्न केला तरी तो माझ्या हातून मरणार आहे. त्यानंतर मी तुलासुद्धा ठार मारणार आहे जो ह्या युद्धाचे मुख्य कारण आहे. त्यानंतर भिम दुर्योधनाला मारणार आहे हे ध्यानात घ्या".

त्या नंतर तो कांही  बाण मारतो वृषसेनावर. त्यामुळे त्याचे धनुष्य पडते व डोकेसुद्धा. तो मरून पडतो. कर्णाच्या समक्ष ते होते. कर्ण ते पाहून फार खच्ची झाल्यासारखा दिसतो. त्याला त्याचाच मृत्यू होत आहे असें वाटते. कर्ण त्याच्या मुलाच्या वधाचा जाब विचारण्यासाठी अर्जुनावर व कृष्णावर हल्ला करतो.

कर्ण पर्व भाग पंच्याऐंशीवा संपला.

# कर्ण पर्व
## भाग श्यांऐशीवा

संजय पुढे सांगतो, कर्णाचा जोर पाहून कृष्ण अर्जुनाला बोलतो, "सल्य सारथी असलेला कर्ण आता तुला आव्हान देण्यासाठी येत आहे. म्हणून अरे धनंजया, तुझे सगळे बळ एकत्र करून त्याच्याशी लढण्यास तयार हो. त्याचा ध्वज पहा, त्याला सगळे घाबरतात. तो दुर्योधनाला संतुष्ट करण्यासाठी त्याच्या जीवाची बाजी लावत आहे. त्याच्या विजय धनुष्याचा आवाज ऐक. त्याला उत्तेजन देण्यासाठी वांजत्री वाजवत आहेत ते पहा. त्याच्या आव्हानामुळे पहा कसे आपले पांचाल बाजूला सरकले आहेत. तुझ्याशिवाय कोणी त्याच्या समोर उभा रहात नाही. मला माहीत आहे कीं, तू त्याचा मुकाबला योग्यप्रकारे करणार आहेस. तू त्या ईशान सारखा कर्णाशी लढणार आहेस. ज्याला कपर्दीन सुद्धा म्हणतात. तू स्थानूला हरवले होतेस म्हणून तू कर्णाला सहज बाद करू शकशिल. इतर देवांनीसुद्धा तुला वर दिले आहेत. त्यामुळे कर्णाला मारणे तुला फार अवघड जाणार नाही".

अर्जुन त्याला बोलतो, "माझा विजय निश्चित आहे. कारण माझ्याबरोबर तू आहेस. ते घोडे आहेत व हा रथ आहे. हृषिकेश माझा सारथी आहे, त्यामुळें कर्णाचा वध करूनच मी परत जाईन आपल्या तंबूत. आज तू पहाशिल कर्णाचे तुकडे झालेले. सगळ्या जगाला हादरवून सोडणारे ते द्वंद्व लवकरच सुरू होणार आहे". अशारितीने पार्थ जनार्दनाला आश्वासन देतो. त्यानंतर त्यांचा रथ कर्णाच्या दिशेने जाऊ लागतो. थोड्याच वेळांत त्यांचा रथ कर्णाच्या रथासमोर येतो.

कर्ण पर्व भाग श्यांऐंशीवा संपला.

# कर्ण पर्व

## भाग सत्याऐंशीवा

संजय पुढे सांगतो, वृषसेनाचा वध झाला हे पाहून कर्ण दुःखी होतो. त्याशिवाय क्रोधीतसुद्धा होतो. त्याच्या डोळ्यांतून अश्रू वहात असतात. तो अर्जुनाला द्वंद्वांचे आव्हान देतो. त्यांचे रथ सूर्यासारखे चमकत असतात. ते समोरासमोर येतात. ते इंद्र व विरोचनाच्या वली सारखे आकाशातील प्रेक्षकांना वाटतात. त्यांचे रथ मोठा आवाज करत असतात जेव्हां ते एकमेकांवर येत असतात. त्यांच्या धनुष्याचे आवाज त्यात भर घालत असतात. त्यांचे झेंडे जोराने फडकत असतात. त्यांचे द्वंद्व पहाण्यासाठी सगळे राजे एकत्र जमा झालेले असतात. ते त्यांच्या आवडत्या योद्ध्यासाठी टाळ्या वाजवत असतात. रुमाल उडवत असतात. कौरवांची रणवाद्ये वाजू लागतात. त्याप्रमाणे पांडवांचेसुद्धा करत असतात. त्या आवाजाने त्यांच्या युद्धाचे वातावरण चांगलेच तापलेले होते. ते दोन योद्धे त्यांच्या शस्त्रानिशी सज्ज समोरासमोर उभे होते असे सगळे पहातात. एकाचा सारथी होता कृष्ण व दुसर्याचा सल्य. त्या दोघांच्या डोक्यावर छत्र्या होत्या. त्या दोघांच्या सर्वांगाला चंदनाचे गंध चोपडलेले होते. ते एकमेकांकडे क्रुद्ध दृष्टीने पहात होते. ते दोघे देवांचे पुत्र होते. एकाचा पिता सूर्य होता व दुसर्याचा इंद्र. त्यामुळे त्यांच्यात दैवी गुण दिसत होते. त्यांना समोरासमोर पाहून त्यांच्या सैनिकांचा जोम वाढला होता. त्यातील कोण अखेर जिंकणार असा प्रश्न लोक विचारत होते. त्याचे उत्तर कोणालाही माहीत नव्हते. ते दोघे कार्तवीर्य किंवा रामासारखे शूर होते. ते दोघे शिव अथवा विष्णू सारखे तेजस्वी होते. त्याना समोरासमोर पाहून आकाशातील सिद्ध व चरण आनंदाने टाळ्या वाजवू लागतात. त्यानंतर धृतराष्ट्री त्यांच्या पलटणी घेऊन कर्णाला संरक्षण देण्यासाठी पुढे सरसावले होते. त्याच प्रमाणे पांडवांचेसुद्धा करत होते. त्याचा प्रमुख होता धृष्टद्युम्न. बाकीचे लढण्याचे थांबवतात व ते द्वंद्व पहाण्यासाठी उभे रहातात. जसे कसोटीचा लढा होणार होता असें वातावरण होते. ते परस्पराना ठार मारण्याच्या उद्देशाने समोरासमोर उभे झालेले होते तसा त्यांचा जोर होता. देवांमध्ये त्यांच्या बाजूने व विरोधात असे गट तयार झाले होते व त्यांच्या चर्चा जोरात सुरू झाल्या होत्या. देव, गंधर्व, दानव, पिशाच्च, नाग, राक्षस असे

सगळे आपापली मत सांगत होते. त्यांचे द्वंद्व पहाण्यासाठी सगळे आकाश भरलेले होते. तारे कर्णाच्या बाजूने बोलत होते तर पृथ्वीचे (डोंगर, दर्या, वन, समुद्र इत्यादि) अर्जुनाची बाजू घेत होते. सगळे वेद, उपनिषद, पुराणं अर्जुनाच्या बाजूने होते. वासुकी, चित्रसेना, तक्षक, उपतक्षक, कद्रूची विषारी साप असलेले सर्प अर्जुनाची बाजू घेत होते. ऐरावत व त्याची मुलं, सुरभीची संतति, वैषली आणि भोगीनी त्यांची अपत्ये अर्जुनाची बाजू घेत होते. सगळे लहान साप, लांडगे, कोल्हे, जंगली हिंस्त्र पशू कर्णाची बाजू घेत होते. सगळे शुभकारक जे होते ते अर्जुनाची बाजू घेत होते. सगळे वसु, मरुत, साध्य, रुद्र, विश्वदेव, संन्याशी, अग्नी, इंद्र, सोम, पवन, दाही दिशा धनंजयाच्या बाजूने होते. सगळे आदित्य, वैश्य व शुद्र, मिश्र रक्ताचे जाती कर्णाच्या बाजूने होते. दैवी पितर, यम, वैश्रावण, वरुण, अर्जुनाच्या बाजूने होते. सगळे ब्राह्मण, क्षत्रिय, यज्ञ, दक्षिणा अर्जुनाच्या बाजूने होते. प्रेत, पिशाच्च, राक्षस, समुद्रातील राक्षस, कुत्री, कर्णाच्या बाजूने होते. दैवी ऋषी, ब्राह्मण, धनंजयाच्या साठी होते, गंधर्व, टूंवृ अर्जुनाच्या बरोबर होते, त्याशिवाय लांडगे, सांबर, हत्ती ज्यांची वाहनं आहेत असे ऋषी, अप्सरा कांही प्रकारचे यक्ष व गंधर्व ते द्वंद्व पहाण्यासाठी जमलेले होते. कांहीं ऋषी हवेतून उडत तर कांहीं जमिनीवर चालत आले होते. केवळ स्वाध्य खाणारे पितर, वैरागी, औषधी वनस्पती सुद्धा ते पहाण्यासाठी जमलेले होते. त्यामुळे त्या बघ्यांचा बराच गोंधळ ऐकू येत होता. स्वतः भव ते द्वंद्व पहाण्यासाठी त्याच्या भूतपिशाच्चांसह आले होते. कर्णास पाहून सूर्य बोलतो, कर्ण अर्जुनाचा पराभव करील. त्या उलट शक्र बोलतो अर्जुन कर्णाचा पराभव करील. त्यांच्यात वाद होत होता. त्या युद्धात देव अर्जुनाची व असुर कर्णाची बाजू घेतात. प्रत्येक आपापल्या प्रकारे विचार करत होते. ते पाहून ब्रह्माला ते बोलतात, आपण कोणाचा जय होणार ते सांगा, त्या दोघाच्या मारामारीमुळे सगळे विश्व उध्वस्त झाले नाही म्हणजे मिळवले. त्यांच्यात बराबरी झाली तर चागले असे कांहीं ऋषी सांगत असतात. ब्रह्म सांगतात त्यांचे बराबरीने होईल, ते ऐकल्यावर शक्र उठून बोलतात, "अहो ब्रह्मदेव, तुम्हीच बोलला होता कीं, जेथे दोन कृष्ण असतात तेथे विजय माला जाते. म्हणून तसेच झाले पाहिजे". ते ऐकल्यावर ब्रह्म व ईशानदेव (महादेव) बोलतात, जय विजयाचाच होणार, कारण त्यांने अग्नीला खांडववनात मदत केली होती आणि तो स्वर्गात येऊन राहिला होता तुझ्याकडे. कर्ण दानवांच्या बाजूने

आहे. म्हणून त्याचा पराजय होणार. त्यामुळे देवांचे भले होणार आहे. देव जिंकणे विश्वाच्या कारभारासाठी आवश्यक असते. ह्या विश्वाची व्यवस्था चांगुलपणावर अवलंबून असते. तो वाढणे ही जगाची गरज असते, म्हणून अर्जुनाचा विजय आवश्यक आहे. कर्ण अहंकाराचे (तमोगुणाचे) प्रतिक आहे ते नष्ट झाले पाहिजे. अर्जुन निरहंकाराचे (सत्त्वगुणाचे) प्रतिक म्हणून तो जिंकला पाहिजे. ते दोघे कृष्ण दृष्य व अदृश्य सृष्टीचे जनक आहेत. सगळे सृष्टी चालवणारे ऋषी त्यांच्या बरोबर असतात. त्यामुळें ते जिंकणे क्रमप्राप्त आहे. कर्णाला वसुंचा अथवा मरुतांचा दर्जा मिळूद्या. पण जय धनंजयाचाच होणार. असे ब्रह्म व ईशान देव सांगून टाकतात. त्यावर इंद्र त्याना नमस्कार करतो. ईशानदेवाच्या निर्णयामुळें सगळे संतुष्ट झालेले दिसतात. स्वर्गातून सुगंधी द्रव्य आणि दैवी फुलांचा वर्षाव होतो. त्यानंतर ते सगळे ते द्वंद्व पहाण्यासाठी शांतपणे वाट पहात रहातात.

कर्ण व अर्जुन त्यांचे शंखू वाजवू लागतात. त्यानंतर कृष्ण व सल्य त्यांचे शंखू वाजवू लागतात. जसे शक्र व संवर एकमेकांना आव्हान देत होते प्राचीन काळी तसे ते करू लागतात. इतिहासाची पुनरावृत्ती होत होती. त्यांचे झेंडे तेजाने चमकत होते जसे आकाशात  राहू व केतू असतात. कर्णाच्या झेंड्यावरील हत्तीची लगाम सापासारखी वाटत होती. धनंजयाच्या झेंड्यावरील कपीमुद्रा ज्याचे तोंड उघडे होते व त्याचे दात चमकत होते. तो आव्हान देत आहे असे वाटत होते. तो कपी झेंड्यातून बाहेर येऊन लढण्यासाठी उतावीळ आहे असें वाटत होते. असें वाटत होते कीं, तो हत्तीचा लगाम कपीला आव्हान देत आहे किंवा कपी त्याला आव्हान देत आहे. त्यांचे घोडेसुद्धा एकमेकांना खिंकाळून आव्हान देत आहेत असे वाटत होते. कृष्ण सल्याकडे तीक्ष्ण नजरेने पहात होता. त्याप्रमाणे सल्यसुद्धा तसांच पहात होता. वातावरण फार गंभीर झाले होते. त्यानंतर कर्ण सल्याला बोलतो, "मला सांग सल्या, अर्जुन मला मारू शकेल कां"?

सल्य बोलतो, "जर तू मारला गेलास तर मी त्या दोघांना मारून टाकीन". पुढे पुन्हा तो बोलतो, "अरे कर्णा, तुला त्याने मारले तर मी त्यांना मारून टाकीन".

संजय पुढे सांगत असतो, अर्जुन कृष्णाला तसाच प्रश्न विचारतो. कृष्ण त्याला बोलतो, "तसे झाले तर सूर्य खाली जमिनीवर आला असे होईल", असें बोलून तो हसू लागतो. "तसे होणे म्हणजे पृथ्वीचे शतशः तुकडे होण्यासारखे आहे". म्हणजे ते शक्य नाही असें

त्याला सुचवावयाचे होते. "परंतु, जर समजा तसे झालेच तर हे विश्व नष्ट होईल. मी माझे दिव्य रुप धारण करून त्याला व सल्या मारून टाकीन. ते ऐकल्यावर अर्जुन गालातल्या गालात हसतो व बोलतो, "ते दोघे जरी एकत्र आले तरी मी त्यांना भारी आहे, जनार्दना". "आज तू पहा कर्णाचे झेंडे, शस्त्रं घोडे सगळे माझ्या बाणांने मी कसे संपवतो. कर्णाच्या बायकांना आज विधवा होण्याचा योग आहे. त्यांने जे आपल्या कृष्णाशी केले त्याची किंमत त्याला आज चुकती करावयाची आहे. मी त्या गोष्टी कधीच विसरू शकणार नाही. त्याचा नाश मी आज तुझ्यापुढे करणार आहे. मला तुझ्या शुभेच्छा हव्या आहेत. आज अभिमन्यूची आई शांत होईल. तुझ्या मामीला (कुंती ) चांगली बातमी देण्यासाठी तयार रहा. आज खर्या अर्थाने द्रौपदी शांतपणे झोपू शकेल. आमचे ज्येष्ठ बंधू सुद्धा शांत होतील".

कर्ण पर्व भाग सत्याऐंशीवा संपला.

# कर्ण पर्व
## भाग अठ्ठ्याऐंशीवा

संजय पुढे सांगतो, आकाशातील मंडपात बरेच नाग, असुर, सिद्ध, यक्ष, गंधर्व, राक्षस, राजर्षी, ब्रह्मर्षी, ब्राह्मण, गर्दीकरून त्या द्वंद्वाची वाट पहात होते. त्याच प्रमाणे खाली पृथ्वीवर माणसे तेंच पहाण्यासाठी जमा झाली होती. आकाशातून स्वर्गीय वाद्यवृंद सुमधूर धून वाजवत होते. जणू काय तो एक मोठा सोहळा होणार होता. खाली पृथ्वीवर कौरवांची व पांडवांची रणवाद्ये गर्जत होती. सगळ्या दाही दिशा त्यामुळें दणाणून गेल्या होत्या. त्याचवेळी जमिनीवर मृत शरीरांचा खच पडलेला होता. कौरव पांडवांचे युद्ध म्हणजे देव व असुरांचे युद्ध असेच दिसत होते. त्यात पांडव देवांची भूमिका करत होते व कौरव असुरांची. द्वंद्व सुरू झाले तसें ते दोघे प्रथम त्यांच्या असंख्य बाणांनी सगळे आकाश भरून टाकतात. त्यामुळे भर दिवसा अंधार पसरतो. सगळे त्याच्या कलाप्रमाणे पांडवांची अथवा कर्णाची बाजू घेत होते. ते दोघे एकमेकांचे बाण उलटवत होते. हा खेळ बराच काळ चालू होता. दोघे त्यांच्या फौजांना सांगत होते कीं, काही झाले तरी त्यांनी रणभूमी सोडून जावयाचे नाही. त्यानंतर ती दोनही सैन्य आपापल्या ठिकाणी सज्ज राहीले होते. दोघे परस्परांवर दबाव आणण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसत होते. त्याची चपळाई, कसब, शौर्य असे सगळे दिसत होते. जणू ते एकमेकांत भिडले होते. त्यांच्या बाणांमुळें आजूबाजूला जमलेले दोनही पक्षाचे सैनिक नाहक मरत होते. तसेंच हजारो मारले जात होते. त्याबरोबर घोडे व हत्तीसुद्धा मारले जात होते. ते होऊ लागल्यामुळे ते जमलेले सैनिक तेथून काढता पाय घेत असल्याचे दिसत होते. ते होत असतांना कर्णाला मदत करण्याच्या उद्देशाने दुर्योधन, कृप, शकूनी कृतवर्मन धनंजयावर हल्ला करतात. परंतु, अर्जुन त्यांचा हल्ला सहजपणे उडवून लावतो. त्याची सगळी शस्त्रं अस्त्रं तो नष्ट करतो लिलया. त्याच बरोबर तो कर्णालासुद्धा जखमी करत असतो. त्याचे कसब विलक्षण होती. ते होत असतांना शंभर रथ शक आणि तुर्क व यवनांचे कंबोजांच्या नेतृत्वाखाली धनंजयावर चालून जातात. परंतु, त्यांचा परामर्श तो घेतो. ते पळून जाऊ लागतात. ते पाहून आकाशातील प्रेक्षक आनंदाने तुतार्या वाजवू लागतात. स्वर्गात त्याच्या स्तुतीचे गान

सुरू होते. आकाशातून सुगंधी फुलांचा वर्षाव अर्जुनावर होतो. त्यामुळे दुर्योधन व कर्ण नाराज झालेले दिसतात. त्यावेळी अश्वत्थामा दुर्योधनाचा हात पकडून त्याला विनवणी करतो की, "आता त्याने पांडवांशी समझौता करणेंच कौरवांच्या भल्यासाठी श्रेयस्कर आहे. त्यामुळे उरलेली इज्जत शाबूत राहील. त्यांच्याशी लढून कांही मिळणार नाही हे स्पष्ट झाले आहे. ह्या युद्धामुळे आपलेच सगळे नष्ट होत आहे. पांडवांच्या बरोबर भागीत रहाण्यातच कौरवांचे व त्यांच्या दोस्तांचे भले आहे. पांडवांपैकी कोणालाही युद्ध नको आहे, केवळ तुझ्यामुळे हा संहार होत आहे. जर तू समझौता करण्यास तयारी दाखवली तर ते लगेच तयार होतील ह्यात मला शंका नाही. युधिष्ठीर नेहमीच समझौता मागत असतो. वृकोदराला शांत करणे अशक्य नाही. तो त्याच्या ज्येष्ठ बंधूच्या आज्ञेत असतो. त्यामुळे जे राजे अजून मेलेले नाहीत ते त्यांच्या ठिकाणी सुरक्षितपणे जातील. सगळे मारले गेले तर त्याचे दुःख तुला सहन होणारे नसेल. हा अर्जुन एकटा सगळे जग पादाक्रांत करू शकतो, ते त्यांने अनेक वेळी सिद्ध केले आहे. सगळ्यांच्या हिताचे राजाने करावयाचे असते असे समजतात, त्याप्रमाणे तू तुझा आग्रह सोडून समझौता करण्यास तयार हो. आता प्रतिष्ठेचा प्रश्न करून कांहीं उपयोग होणार नाही. आता पर्यंत ज्यांना प्रतिष्ठेचे प्रश्न करत लढले ते सगळे मारले गेले आहेत, जसे वल, प्रचेता, यक्षांचा राजा कोणीही धनंजयाच्या तावडीतून सुटू शकत नाही. तू माझे नेहमी ऐकतोस तर आतासुद्धा ऐक. माझे जर तू मान्य करणार असशील तर मी कर्णाला समजावून शांत करीन. असें सांगतात किं, चार प्रकारचे मित्र असतात, एक जे स्वाभाविकपणे मित्र असतात, दुसरे सल्ल्याने होतात, तिसरे संपत्तीच्या मोहांने होतात व चौथे जबरदस्तीने केलेले असतात. पांडव तुझे पहिल्या प्रकारचे मित्र आहेत. त्यांना तू शांत करू शकशिल".

मित्राचा तो सल्ला ऐकल्यावर दुर्योधन मोठा श्वास घेऊ लागतो. तो बोलतो, "दुःशासनाला ज्या प्रकारे भिमांने मारले ते मला सलत आहे. तो त्याचे रक्त प्याला ते मला सहन होत नाही. अशा परिस्थितीत समझौता कसा शक्य होणार? अर्जुन कर्णाला सहन करणार नाही कारण आपल्या लोकांनी त्यांचा जो छळ केला आहे तो ते कसे विसरणार"? आता गोष्टी खूप पुढे गेल्या आहेत. त्याशिवाय हा एक चांगला मौका आहे कारण अर्जुन खूप थकलेला

आहे तेव्हां तो कर्णाकडून मारला जाण्याची जास्त शक्यता मला दिसते. अशावेळी समझौत्याच्या गोष्टी करणे म्हणजे कर्णाबद्दल अविश्वास दाखवण्यासारखे होईल".

एवढे बोलून तुमचा मुलगा त्याच्या फौजांना पांडवांवर स्वारी करण्याचा हुकूम करतो.

कर्ण पर्व भाग अठ्ठ्याऐंशीवा संपला.

# कर्ण पर्व

## भाग एकोणनव्वदावा

संजय पुढे सांगतो, त्यानंतर रणवाद्यांचा आवाज जास्त मोठा होतो. तुमच्या मुलाच्या आग्रहाखातर ते युद्ध होत होते. ते एकमेकांवर बाणांचा वर्षाव करत होते. प्राचीन काळी विरोचन आणि शक्र ह्यांच्यात जशी लढाई होत होती तशी ती होती. त्यांची शरीरं जखमानी भरलेला होती. त्याचे सैनिक त्यांच्या बाजूने लढत होते. त्यांचे द्वंद्व पाहून प्रेक्षक टाळ्या वाजवत होते. रुमाल हलवून त्यांचे अनुमोदन दाखवत होते. सोमक ओरडून बोलतात, "लवकर कर्णावर हल्ला कर अर्जुना, त्याचे डोके उडवं, त्याने हा वादच संपुष्टात आण". त्याच प्रमाणे कर्णाच्या बाजूचे त्याला उत्तेजन देत असतात.

ते होत असतांना कर्ण पार्थाला एक बाण वर्मी मारतो. त्या बदल्यात पार्थ दहा बाण मारतो. त्याचे बाण कर्णाच्या छाताडात घूसतात. एकमेकांच्या उणीवा शोधत ते मारा करत असतात. त्यान द्वंद्वांत खेळ आणि युद्ध असे दुहेरी ते करत होते. त्यांचे सैनिक विविध आयुध वापरून लढत होते. अर्जुनाचे बाण कर्णाच्या रथात घुसले होते. पांडवांचे योद्धे मोठ्या जोमांने कर्णाच्या फौजांवर तुटून पडतात. अर्जुन जे अग्नेय अस्त्र कर्णावर फेकतो त्यामुळे सगळीकडे आग पसरते. स्वतः पार्थालासुद्धा त्या झळीचा त्रास होतो. परंतु, ते पहाताच कर्ण वरुण अस्त्र काढतो व ती आग विझवून टाकतो. त्याच्यामुळें सगळीकडे अंधकार पसरतो. त्यातून येणार्या पाण्याने पसरलेली आग विझते. कर्णाच्या अस्त्रामुळे पसरलेली ढग अर्जुन त्याच्या वायव्य अस्त्राने लांब ढकलून देतो. त्यांचे मंत्र जोरदार असतात. अंजलिका आणि क्षलिका ह्या शस्त्राने ते त्यांचे युद्ध करत असतात. त्यांचा आवाज जीवघेणा असतो. अर्जुनाच्या बाणानी कर्णाचे झेंडे, स्तंभ, खाली पडतात. त्यामुळे कर्णाचा राग अनावर होतो. तो भार्गव अस्त्र काढतो. त्यांमुळें अर्जुनाचे सगळे बाण तुटून पडतात. त्या धुमश्चक्रीत अनेक घोडे. रथ, हत्ती व माणसे मारली जातात. ते पाहून कर्ण अर्जुनाला हसू लागतो. त्यानंतर तो पांचालांवर बाणांचा मारा करू लागतो. त्याच्या हल्ल्याने चिडलेले सोमक व पांचाल कौरवांच्या फौजावर जोराचा मारा करू लागतात. ते पाहून कर्ण त्यांना बाण मारू लागतो. त्यात अनेक मरतात. ते पाहून तुमच्या लोकांना

वाटते कीं, कर्ण जिंकला व ते आनंद व्यक्त करू लागतात. अर्जुनाचे शस्त्र कर्णाने निकामी केल्यासारखे झालेले वाटते व त्यामुळें भिमाला फार राग येतो. तो अर्जुनाला बोलतो, "अरे हा नीच माणूस विनाकारण पांचालांचे योद्धे मारत आहे, तुझ्या समक्ष होत आहे, कालकेयां तू हरवले आहेस, तुझ्याकडे स्थानूची अस्त्र आहेत, त्यांचा उपयोग काय? कशाला तू ते सगळे शिकलास? त्या बदमाषाला तू ताबडतोब कां नाहीं मारत? तू काय आरंभले आहेस हे? तो तुझी तीळाच्या बियांची तुलना करत होता, ते तू खरे करत आहेस कां? मला खरोखरच आश्चर्य वाटते. तू आपल्यावर झालेले अन्याय विसरलास कां"? ताबडतोब त्याला मारून टाक". ज्या निश्चयाने तू खांडव वनातील प्राणी मारलेस, तो जोम कोठे गेला. मी त्याला माझ्या गदेने चिरडून टाकणार आहे जर तू ते करणार नसशिल". त्यानंतर कृष्णसुद्धा पार्थाला ताकीद देतो कीं असे होणे आपल्या कामाच्या विरुद्ध आहे. त्याला तू कां संधी देत आहेस. ते कौरव मोठ्या आनंदाने नाचत आहेत व तुझे हसे होत आहे ते तुला समजत नाहींकां"? अनेक युगात तू अनेक पापात्म्यांचा नाश केला आहेस त्याप्रमाणे तू आता ह्या कर्णाला मारून टाकले पाहिजेस. तुझा तो उत्साह ज्यांने तू शत्रूंना मारत होतास तो कोठे गेला? तुझ्या आयुधाने तू कर्णाचे सगळे साथी मारू शकतोस त्याचा तुला विसर पडला आहे कां? ते केल्यावर तू युधिष्ठीराला सगळी पृथ्वी देणार आहेस त्याचा तुला विसर पडला आहे कां"? त्यामुळे तुला जगात प्रसिद्धी प्राप्त होईल". कृष्णाचे ते ऐकून अर्जुन भानावर आला. भिमाने व कृष्णाने सावध केल्यावर त्याला त्याची प्रतिज्ञा आठवते किं, तो कर्णाचा वध करण्यासाठी बांधलेला आहे. तो केशवाला बोलतो, जगाच्या भल्यासाठी मी ती भयंकर आयुध वापरण्याचे टाळत आहे. एका सुताचा नाश करण्यासाठी ते कशाला असे मी समजतो. मला परवानगी दे म्हणजे मी त्यांचा वापर करून कर्णाचा नाश करून टाकतो. ते बोलून तो ब्राह्मास्त्र काढतो. जे फक्त मनाच्या ताकदीने चालवता येत होते. कर्ण तेसुद्धा बाद करतो, त्याचे तेज वाढलेले दिसते. ते झाल्याने भिमाचा राग अनावर होतो. लोक म्हणतात, तू एक महान योद्धा आहेस पण मला वाटते तू तितका चांगला नाहीस, सव्यसाची दुसरे आयुध वापर. अधिक प्रभावी असलेले. ते ऐकल्यावर पार्थ आणखीन एक आयुध काढतो. त्यामुळे तो कर्णाचा रथ व्यापतो. त्याच्या आयुधामुळे आजूबाजूचे योद्धे मरून पडतात. दुर्योधनाचे मोठे पराक्रमी योद्धे तो मारून टाकतो. त्यामुळे

कर्णा भोवताचे संरक्षण कमी होते. कर्ण भिमाला व अर्जुनाला बाण मारू लागतो. तो जोरा जोराने ओरडू लागतो. भिम व कृष्णाला कर्णाचे बाण लागत आहेत ते अर्जुनाला सहन होत नाही. तो कर्णावर आठ बाण मारतो. त्यानंतर सल्यावर बाण मारतो. त्यानंतर सभापती नांवांच्या कौरवांच्या राजाला मारतो. त्यानंतर तो पुन्हा कर्णाला बाण मारू लागतो. त्याच्या बाणाने कर्ण, त्याचे घोडे व रथ अदृष्य करतो. कौरव कर्णाला सांगत असतात कीं, अर्जुनाला त्याने त्वरित मारून टाकावे. नाहीतर तो आपले सगळे सैन्य असेंच मारून टाकेल. कर्ण त्यानंतर अर्जुनावर सतत बाणांचा वर्षाव करू लागतो. त्याच्या बाणांमुळे पांडवांचे सैनिक मरत असतात. युधिष्ठीर त्याच्या अंगात घुसलेले बाण काढल्यानंतर व औषधी व मंत्र प्रयोग झाल्यानंतर बरा झालेला रणांगणात लढण्यासाठी येतो. तो अर्जुन व कर्णाचे द्वंद्व पहात असतो. त्यांचे रथ एकमेकांत अडकलेले असतात. त्यांच्या बाणांच्या आवाजाने सगळी सृष्टी भरलेली होती. कर्ण अर्जुनाला कृष्णाला व भिमाला सतत बाण मारत होता. त्यानंतर तो सोमकांना बाण मारू लागतो. त्याच्या बाणांने ते सगळे बधीर झालेले होते. त्यात असंख्य मरतात. त्या युद्धाचे स्वरुप असे झाले होते कीं, सगळ्यांना वाटत होते कीं, कर्णाने अर्जुनाला हरवले आहे. त्यामुळें कौरव फार खूष दिसत होते. तसे वाटत असतांना अर्जुन त्याचे बाण जोराने फेकू लागतो व त्याने सगळे आकाश भरून जाते. अर्जुन सल्यावर वार करतो. कर्णावर बारा बाण मारतो. त्यामुळे कर्णाचे अंग त्याच्या रक्ताने भरते. कर्ण त्यानंतर धनंजयाला तीन बाण मारतो, कृष्णाला पांच मारतो. ते कृष्णाच्या अंगातून आरपार जाऊन मातीत पडतात. ते बाण मातीतून पुन्हा बाहेर येतात व कर्णावर जातात. ते तक्षकाच्या मुलाचे अश्वसेनाचे बाण होते. अर्जुन ते सगळे तोडून टाकतो. कृष्णाच्या पायाला जखम झालेली तो पहातो. तो कर्णाच्या सगळ्या अंगात बाण असे मारतो कीं त्याचे सगळे अंग बाणाने भरून जावे. त्या मारामुळें कर्ण बधीर होतो. तो थरथरू लागतो. सव्यसाची त्यावेळी कौरवांचे दोन हजार योद्धे मारतो. जे कर्णाला संरक्षण देत होते. ते असे योद्धे होते ज्यांच्यावर दुर्योधनाचा फार भरोसा होता. त्यानंतर कौरवांचे सैनिक तेथून पळून गेले व कर्ण एकटा पडला. त्याला आता संरक्षण देण्यासाठी कोणी राहीले नव्हते. तरी त्याची खंत कर्णाला वाटत नव्हती. ते पाहून तो अर्जुनावर चालून जातो. कर्ण पर्व भाग एकोणनव्वदावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग नव्वदावा

संजय पुढे सांगतो, अर्जुनाच्या बाणांच्या भडीमारामुळे कौरवांचे सैन्य पळून जाऊ लागते. ते आता लांब अंतरावर थांबून अर्जुनाचे कसब पहात असतात. त्यावेळी कर्ण अर्जुनाचे डाव उलटवत असतो त्याच्या कारवाईने. जरी ते बाण कौरवांचे सैन्य नष्ट करत होते, कर्णाने त्यावर मात करण्यासाठी त्याची खास आयुध वापरावयाला सुरूवात केली होती. कर्ण बाणांचा वर्षाव करत होता. भार्गवाकडून मिळालेल्या आयुधांच्या मदतीने तो अर्जुनाचे डाव पुन्हा पुन्हा उलटवत होता. त्यात अथर्व वेदातील कांहीं होते. ते द्वंद्व मोठे विलक्षण आणि भयंकर होते. आकाशाच्या चारही दिशा त्याने भरलेल्या होत्या. तेथे पहात असलेल्या कौरवांना व सोमकांना आकाशात बाणांचे जाळे पसरलेले दिसत होते. त्यामुळें सभोवार अंधार झाला होता. त्याच्या परस्पर आयुधाच्या चुरशीत कधी अर्जुन जिंकत होता तर कधी कर्ण. त्यांच्या हिम्मतीची व धाडसाची परीक्षा होत होती. एकमेकातील दोष शोधण्यात ते गुंतलेले होते. त्या चुरशीच्या द्वंद्वांमुळें आकाशातील प्रेक्षकांची भरपूर करमणूक होत होती. कधी ते अर्जुनाची वहाव्वा करत तर कधी कर्णाची. त्या रणभूमीत फिरणार्या रथांच्या, हत्तींच्या अशा भारामुळे पृथ्वी दाबली जात होती. त्यावेळी पाताळात असलेला अर्जुनाचा द्वेष्टा नाग, अश्वसेना जो खांडववनातून पळून गेला होता, त्याचा राग काढण्याचे ठरवतो. त्या पराक्रमी नागाला त्याच्या मातेच्या मृत्यूचा सूड उगवावयाचा होता. तो जमिनीतून वेगांने उसळी मारून वर येतो. अर्जुन व कर्ण ह्याच्या द्वंद्वांचा त्याला फायदा उठवावयाचा असतो. तो त्याच्या सिद्धीने कर्णाच्या बाणांच्या भात्यात शिरतो आणि एका बाणाचे रुप घेतो. त्यावेळी त्या दोघांच्या बाणामुळें आकाशात बाणांचे छत तयार झालेले दिसत होते व ते पाहून सगळे इतर सैनिक घाबरून गेलेले दिसत होते. कारण, भर दिवसा त्यांना कांहीं दिसत नव्हते. त्यावेळी दोघे योद्धे श्रमाने झकलेले दिसत होते व ते एकमेकांकडे पहात होते. स्वर्गातील अप्सरा त्यांना पंख्याने वारा घालत होत्या. जसे शक्र व सूर्याना त्या घालत असतं. त्या अप्सरा त्यांचे घामाने भरलेले चेहरे पुसत असतात. त्यावेळी कर्ण अर्जुनापेक्षा जास्त

थकला होता. तो अर्जुनाला हरवू शकणार नाही हे समजला होता. कारण अर्जुन अजिबात थकलेला नव्हता. ते दोघे जखमाने भरलेले होते. तरी लढण्याचा उत्साह कमी झालेला नव्हता. कर्णाच्या भात्यात एकच बाण होता ज्याला नागाचे तोंड होते, तो नागमुखी बाण त्याने मुद्दाम अर्जुनाला मारण्यासाठी राखला होता. कर्ण तो बाण त्याच्या धनुष्याला लावतो. तो नाग ऐरावताच्या वंशाचा होता. त्या बाणाने त्याला पार्थाचे डोके उडवावयाचे होते. त्यावेळी आकाशात प्रकाश पसरला, अशनि पडू लागले. त्यावेळी इंद्र मोठ्याने किंकाळी मारतो. कर्णाला माहित नव्हते कीं, तो त्याचा बाण नाही तर तो वेगळा आहे. अश्वसेना त्याच्या भात्यात शिरलेला त्याला माहित नव्हते. जसा तो त्या बाणाचा नेम पार्थावर लावतो सल्य त्याला बोलतो, "ह्या बाणाने तू पार्थाचे मुडके उडवू शकणार नाहीस. पुन्हा पहा तुझ्या भात्यातील बाण". ते ऐकल्यावर चिडलेला मानी कर्ण त्याला बोलतो, "हा कर्ण एकच बाण दोनदा वापरत नाही. आम्ही भ्रष्ट क्षत्रियांसारखे लढत नाही". असे बोलून कर्ण तो बाण पार्थावर फेकतो. तो ओरडून अर्जुनाला बोलतो, "अरे पार्था तू आता मेलास". तो बाण आकाशात जातो व तेथून अर्जुनावर येणार तेव्हां कृष्ण त्याचा रथ खाली दाबतो व त्याचवेळी त्याचे सगळे घोडे खाली बसतात. त्यामुळे कर्णाचा नेम चुकतो. आकाशातील प्रेक्षक आनंदाने टाळ्या वाजवता. ते कृष्णाचे कौतुक करतात. कर्णाचा तो बाण अर्जुनाचा दैवी मुकूट फक्त उडवतो. अश्वसेना तो मुकूट मोडून तोडून टाकतो. त्याच्या आवाजाने सगळ्या दिशा दणाणून निघतात. अर्जुन त्या शिरस्त्राणा शिवाय तेथे उभा असतो. त्या नागिणीचा मुलगा फक्त त्याचा टोप नष्ट करू शकतो. अश्वसेना त्याचा सूड उगवला असे समजून समाधानाने निघून जातो. त्याआधी तो कर्णाला सांगतो कीं मला पुन्हा अर्जुनावर मार कारण मला त्याचा नाश करावयाचा आहे व तो तुझासुद्धा शत्रू आहे. म्हणून आपण मिळून त्याला यमाकडे पाठवू. कर्णाला ते पसंत पडत नाही, तो त्याला सांगतो कीं, मी एक बाण पुन्हा वापरत नाही.

अर्जुन त्या प्रकाराने अजब झालेला कृष्णाला विचारतो. तेव्हां कृष्ण त्याला खांडवनातील प्रसंग सांगतो. त्याच्या आईच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी तो तसे करत होता.

संजय पुढे सांगतो, ते ऐकल्यावर अर्जुनाला फार राग येतो. तो त्या नागाला बाण मारतो त्याला यमाकडे धाडतो. ते झाल्यावर कृष्ण त्यांचा रथ पुन्हां वर काढतो व त्यांचे घोडेसुद्धा पुन्हा उभे रहातात. तो प्रकार तिरक्या नजरेने कर्ण पहात कृष्णावर दहा बाण मारतो. त्याबरोबर अर्जुन कर्णावर वीस बाण मारतो. त्यातील एक बाण विषारी होता तो कर्णाच्या वर्मी लागतो. त्यामुळे त्याचे रक्त वाहू लागते. त्या बाणाच्या आघातामुळे कर्ण फार चिडतो. तो जनार्दनाला बारा बाण मारतो. अर्जुनाला नऊ मारतो. त्यातील एक बाण भारी होता. त्याचा त्रास पंडुच्या मुलाला होतो. ते पाहून कर्ण त्याच्याकडे पहात हसू लागतो. अर्जुनाला त्याचे ते कुत्सितपणे हसणे अजिबात रुचत नाही. तो कर्णाच्या सगळ्या अवयवांवर बाण मारत रहातो. त्या मारामुळें कर्णाचे सगळे शरीर थरथरू लागते. त्यानंतर कर्णाचे मुकूट व कानातील अलंकार तो कापून काढतो. ते जमिनीवर पडतात. त्यानंतर अर्जुन कर्णाचे मौल्यवान कपडे फाडू लागतो. ते करुन समाधान न झाल्यासारखा तो त्याच्यावर धारदार बाणांचा वर्षाव करतो. त्या मारामुळें कर्णाला वाटते कीं, तो आजारी झाला आहे. अर्जुनाचे शरसंधान जोरात चालूच असते. कर्ण त्याच्या रक्ताने नाहून निघाला होता. पुन्हा अर्जुन कर्णाच्या छातीत बाण मारतो. कर्ण त्याचे धनुष्य खाली ठेवतो भाता बाजूला करतो व स्तंब्धपणे उभा रहातो. त्याला समजत नव्हते कीं, त्याने काय करावे. त्याच्या शरीरात भयंकर वेदना होत असतात. तो कसातरी जेमतेम उभा असतो. युद्धनितीचे पालन करणारा अर्जुन त्याला त्या अवस्थेत पाहून ठार न मारण्याचे ठरवतो. कर्णा त्याला बोलतो, "अरे पंडुपुत्रा तू मला कां मारत नाहीस"? खरे शहाणे शत्रूच्या कठीण परिस्थितीचा फायदा उठवत असतात. तू कां तसे करत नाहीस"? मला ठार मारण्याची अशी संधी तुला कदाचित पुन्हा मिळणार नाही. जसें इंद्राने नमुचीला त्याच्या अडचणीच्या वेळी मारले, तसे तू मला मारून टाक नाहीतर ही संधी घालवल्याचा तुला पश्चात्ताप होईल. ते ऐकल्यावर अर्जुन कर्णावर बाण मारू लागतो. कर्णाचे सगळे रथ, घोडे वगैरे त्याच्या बाणाने भरले जातात. कर्ण त्याच्या रक्ताने लालबुंद झाला होता. त्यानंतर कर्णाने सुद्धा शरसंधान सुरू केले. त्या विश्रांतीनंतर कर्णाने पुन्हा त्याचे जोरदार शरसंधान चालू केले. अर्जुन व कृष्ण दोघांना तो बाण मारत होता. त्यानंतर अर्जुनाने त्याची दैवी शस्त्र वापरावयाला सुरूवात केली. जसा कर्णाचा मृत्यू समय

जवळ येत होता, काळ अदृष्यपणे ब्राह्मणाच्या शापाचे रुप घेऊन येत होता. तो कर्णाला सांगत होता कीं, त्याची जाण्याची वेळ येऊन ठेपली आहे. तो सांगतो पृथ्वी तुझ्या रथाचे चाक गिळंकृत करणार आहे. त्याच प्रमाणे कर्णाला त्याच्या दैवी अस्त्रांचे मंत्र आठवेनात. ते भार्गवाच्या शापामुळे होते. त्याच्याकडे ब्रह्मास्त्र असूनही त्याचे मंत्र तो विसरला होता. त्याच सुमारास पृथ्वी त्याच्या रथाचे डाव्या बाजूचे चाक खेचू लागते. त्याचा नागमुखी बाण अर्जुनाने तोडला होता, कर्णाच्या मनात दुःखाच्या भावना उत्कटपणे येऊ लागल्या. त्याला ते सहन होईना. तो सगळी शस्त्र टाकून चांगुलपणाच्या गोष्टी बोलू लागतो. तो बोलतो अर्जुनाकडे पहात, "चांगुलपणामुळें चांगल्या लोकांचे भले होते. आपण सगळे आपल्या कुवतीनुसार चांगुलपणा वाढवत असतो. परंतु, तोच चांगुलपणा आपल्याला भोवत असतो. ते बोलत असतांना अर्जुनाचे बाण त्याला लागत असतात. त्याचे घोडे व सारथी त्यांच्या जागी नव्हते. त्याच्या वर्मावर बाण लागत असल्यामुळें त्याला तो काय करत आहे त्याचे भान राहीले नव्हते. तो चांगुलपणाच्या गोष्टीच करत होता स्वताशी. युद्धात चांगुलपणा कसा उपयोगी येतो त्यावर तो बडबडत असतो. त्या नंतर कर्ण कृष्णाच्या हातावर जोरदार बाण मारू लागतो. पार्थ त्याच्यावर सात बाण मारतो. ते कर्णाच्या अंगातून जाऊन जमिनीवर पडतात. कर्ण ब्रह्मास्त्राचे मंत्र आठवण्याचा प्रयत्न करत असतो. त्यावेळी अर्जुन ऐंद्र अस्त्र वापरण्याचे ठरवतो. त्याचे मत्रोच्चार योग्य होतात व त्या अस्त्रामुळे आकाशातून जोराने शस्त्रांचा मारा सुरू होतो. कर्ण ते अस्त्र उलटवतो. ते पाहून कृष्ण अर्जुनाला सांगतो, "जास्त मोठ्या क्षमतेची अस्त्र वापर". ते ऐकल्यावर अर्जुन ब्रह्मास्त्र काढतो. त्या अस्त्राने प्रभावित असलेले बाण तो कर्णावर मारत असतांना कर्ण त्याच्या धनुष्याची दोर कापतो. तसे दोनदा होते, तिनदा, चारवेळा असे बर्याच वेळा होत रहाते. कर्ण त्याच्या गांडीवाच्या दोरांचे कापणे करत असतांना त्याला समजत नाही, कीं, किती दोर त्या गांडीवाला आहेत. गांडीवाला शंभर दोर होते. त्यामुळे त्याचे सरसंधान अव्याहतपणे चालूच राहीले होते. आता अर्जुन कर्णावर सर्पमुखी बाण मारू लागतो. त्या दोघांतील ती चुरस मोठी मनोरंजक होती आकाशातील प्रेक्षकांसाठी. अशी वेळ येते कीं, कर्ण धनंजयापेक्षा सरस ठरू लागतो. कृष्ण धनंजयाला बोलतो, "कर्णावर तुझी खास आयुध वापरावयाची वेळ आली आहे".

धनंजय ईरेला पेटतो. तो महादेवाचे रुद्र काढतो. त्याबरोबर पृथ्वी कर्णाच्या रथाचे चाक पकडून ठेवते. कर्ण ताबडतोब खाली उतरतो व ते मातीत घुसत असलेले चाक काढण्याचा प्रयत्न करू लागतो. कर्णाच्या डोळ्यात अश्रू येतात. तरी त्याचा अर्जुनावरील राग वाढत असतो. तो रांगाने त्याला बोलतो, "अरे पार्थ, मला हे चाक काढू दे त्यानंतर तुझे शरसंधान सुरू कर. माझे डाव्याबाजूचे चाक जमिनीत फसले आहे. अशा परिस्थितीत माझ्यावर बाण मारणे केवळ भित्र्याचे काम ठरेल म्हणून तू थोडावेळ थांब". "खरे योद्धे निःशस्त्र योद्ध्यावर हल्ला करत नाहीत. जो युद्धातून माघार घेतो, ज्याचे शस्त्र निकामी झाले आहे अशांवर वार करत नाहीत. तू जगातील श्रेष्ठ योद्धा आहेस म्हणून तू त्या नियमांचे पालन केले पाहिजेस. हे एवढे चाक मला काढूं दे मग आपण पुन्हा द्वंद्व सुरु करू. मी फक्त युद्धनितीच्या नियमांची तुला आठवण करून देत आहे. मी तुला किंवा तुझ्या कृष्णाला भीक घालणार्यांपैकी अजिबात नाही. तू क्षत्रिय परंपरेनुसार वागावेस एवढेंच सांगत आहे. कारण त्यातच खरा चांगुलपणा आहे. ज्याची तुम्ही पांडव नेहमी गोष्ट करत असता".

कर्ण पर्व भाग नव्वदावा संपला.

## कर्ण पर्व

## भाग एक्यांण्णवावा

संजय पुढे सांगतो, कृष्ण त्याच्या रथातून कर्णाला सुनावतो, "सुदैवाने अरे राधासुता, तुला आता चांगुलपणाची आठवण झाली आहे. असे सामान्यपणे दिसून येते कीं, जे लोक नीच प्रवृत्तीचे असतात त्यांना त्यांच्या कठिण परिस्थितीत चांगुलपणाची आठवण येते. त्यांची कृष्ण कृत्यं ते त्यावेळी विसरतात. तू तुझा मित्र दुर्योधन आणि दुःशासन, शकूनी द्रौपदीचा एकवस्त्र असतांना जो अपमान करत होते तेव्हां तुम्हाला चांगुलपणा कां आठवला नाही? त्यावेळी कोठे गेला होता तुझा चांगुलपणा? भिमाला सापांच्या वेटोळ्यात तुझा मित्र सोडत असतांना तू कां चांगुलपणा आठवला नाहीस? तेव्हां कोठे गेले होते तुमचे चांगुलपण? वनवासानंतर पांडवांचे राज्य त्याना परत करण्याची अट आपणाला कां नाही आठवली ज्यामुळे हे युद्ध सुरू झाले? वरनावतात पांडवांना जाळून टाकण्याचे योजले होते तेव्हां कोठे गेला होता राधासुता तुझा धर्म? त्या भर सभेत द्रौपदी एकवस्त्रात नहाण असतांना दुःशासन ओढून आणतो तेव्हां तू मोठ्याने हसत होतास तेव्हां कोठे गेला होता तुझा धर्म? तू द्रौपदीला सांगत होतास कीं, पांडव खल्लास झाले आहेत, ते कायम नरकात गेले आहेत, म्हणून तिने नवीन सोयरीक करावी असा सल्ला देत होतास, तेव्हां कोठे गेला होता तुझा धर्म? त्या सगळ्या प्रकारांने तू खूष झाला होतास तेव्हां तुझा चांगुलपणा कोठे गेला होता? अभिमन्यूवर सहाजण वार करत होते जेव्हां तो थकलेला होता तेव्हां युद्ध निती कोठे गेली होती तुझा धर्माची"? शकूनीच्या नादी लागून पांडवांना द्युत खेळावयाला लावले ते कोणत्या चांगुलपणात बसत होते ते सांग. आता तुला सगळे चांगुलपणाचे नियम आठवू लागले आहेत. नळाला पुष्कराने हरवले कलीच्या प्रभावाखाली पण अखेरीस नळ जिंकला ते तुला माहीत असेलच. पांडवसुद्धा त्यांचे राज्य ताब्यात घेणार आहेत हे तुझ्या लक्षात आले असेलच. त्यांनासुद्धा मित्र आहेत. त्याच्या बलाढ्य शत्रूंचा पराभव करून ते व सोमक राज्य मिळवणार आहेत हे तुझ्या ध्यानात आले असेलच. तुमचे सगळे धृतराष्ट्री पांडवांच्या हातून मारले जाणार आहेत व त्यात तू सुद्धा आहेस".

संजय पुढे सांगतो, अशारितीने कृष्ण त्याला विचारत असतो. कर्ण तेव्हां मान खाली घालून गुपचुप उभा होता. त्याच्याकडे उत्तर नव्हते. तो त्याचे धनुष्य उचलतो व पार्थाबरोबर बाणांचेयुद्ध सुरू करतो. ते पाहून वासुदेव पार्थाला बोलतो, अरे पार्था, तुझ्याकडील दैवी आयुधांचा आता वापर करू लाग कर्णाशी लढतांना. आता खेळ बंद, खरे युद्ध करण्यास सुरूवात कर. अर्जुन मोठ्या त्वेषाने लढण्यास सुरूवात करतो. कृष्णाचे कर्णाला जे प्रश्न होते ते तो आठवतो व सुडाच्या भावनेने कर्णाचा पराभव करण्यासाठी सज्ज होतो. त्याच्या अंगातून सुडाचा अग्नी भडकलेला दिसत होता. ते पाहून कर्ण ब्रह्म अस्त्र काढतो. त्याचे बाण अर्जुनावर फेकत असतो. अर्जुन ते सगळे उलटवत असतो त्याच्या ब्रह्मास्त्राने. त्यानंतर तो कर्णावर अग्नेय अस्त्र फेकतो. कर्ण त्यावर वारूणास्त्र वापरतो व त्याचा प्रभाव नष्ट करतो. त्या अस्त्राच्या प्रभावामुळे सगळीकडे अंधार पसरतो जसा पावसाळ्यात होतो. अर्जुन वायव्य अस्त्राच्या मदतीने तो अंधार दूर करतो. कर्ण कुंतीपुत्राला मारण्यासाठी एक भयंकर बाण काढतो . ते बाण त्याने धनुष्याला लावला तोच सगळीकडे पृथ्वी हादरू लागली. वादळीवारे पाहू लागतात. सगळीकडे धूळ उडू लागते. पांडवांचे लोक ते पाहून चिंतातूर होतात. तो बाण अर्जुनाच्या छातीत घुसतो. त्याच्यामुळे अर्जुन वेडावाकडा लोळू लागतो. त्याची गांडीवावरील पकड ढिली होते. ते त्याच्या हातून पडते. तो पडला आहे ते पाहून कर्ण त्या संधीचा फायदा करण्यासाठी त्याचे जमिनीत रुतलले चाक काढण्याचा प्रयत्न करू लागतो. आपल्या दोन हाताने तो ते चाक पकडून खेचण्याचा प्रयत्न करत असतो. त्याचे प्रयत्न व्यर्थ जातात. दैवात जे लिहीले होते तेच होणार होते. त्या सुमारास अर्जुन सावध होतो. त्याच्या कडील एक विनाशकारी बाण ज्याला अंजलिका म्हणतात तो घेतो. वासुदेव त्याला बोलतो, "अरे पार्था, आत्ता त्याचे डोके उडवून टाक ह्या बाणाने. तो त्या चाकात अडकला आहे तेवढ्यात ते कर". वासुदेवाचे ते बोलणे मान्य करून तो अर्जुन एका बाणाने कर्णाचा झेंडा पाडतो. ज्यावर सूर्याचे चित्र होते. त्यात हत्तीचा लगाम सुद्धा दाखवलेला होता. त्या झेंड्याची मोठी किर्ती होती. त्या झेड्याला सगळे राजे घाबरत असतं. मुकूटधारी अर्जुन ते करतो व त्यामुळे त्या झेंड्याची किर्ती लयास जाते. त्याबरोबर कौरवांच्या हरण्याची सुरूवात झाली असे सगळे समजू

लागतात. तो पडलेला पाहून कौरवांच्या सैन्याची उरली सुरली उमेदसुद्धा नष्ट होते. त्या नंतर कर्णाचा नाश करण्यासाठी तो अंजलिका आयुध घेतो. ते इंद्राच्या वज्रासारखेच होते. ते कोणाही प्राण्याच्या अंगात घूसू शकणारे होते. ते मौल्यवान होते. त्याला रक्ताची आस होती. ते दोन हात लांब होते. ते राक्षसांना मारण्यासाठी बनवलेले होते. ते नारायणाच्या चक्रासारखे प्रभावी होते व शंकराच्या पिनाकाशी तुलना करण्यायोग्य होते. अर्जुन त्याची पुजा करतो. अर्जुनाच्या हातात ते आहे हे पाहून सगळे भयचकीत होतात. ते अर्जुनाने उगारल्यावर सगळे ऋषी "शांती, शांती", म्हणून प्रार्थना करू लागतात. अर्जुन ते त्याच्या गाडीवावर लावतो आणि बोलतो, "हे माझे हत्यार माझ्या शत्रूचा नाश करो". पुढे तो प्रार्थना करतो, "जर मी प्रामाणिकपणे जगलो असेन, माझ्या देवांना संतुष्ट केले असेल, व्रतस्थ जीवन जगलो असेन तर हे शस्त्र माझ्या शत्रू कर्णाचा नाश करील. असे बोलून तो ते कर्णावर सोडतो. अथर्वेदात अंगिरसाने जसे सांगितले आहे तसे तो करत असतो. तो शेवटी प्रार्थना करतो कीं, "हे कर्णाला यमाच्याकडे पोहोचवेल". पुढे तो बोलतो, "हा बाण मला अंतीम विजय मिळवून देईल". कर्णाबद्दल असलेली आसुया उराशी बाळगून तो अंजलिका बाण गांडीवावर लावतो. जसे इंद्र वृत्राचे शिर उडवतो तसे तो कर्णाचे शिर उडवणार असतो. अखेरीस तो त्या बाणांने कर्णाचे मुंडके उडवतो. तेव्हां दुपार झाली होती. डोके तुटलेला कर्णाचा देह जमिनीवर खाली कोसळतो. त्याबरोबर कौरवांचा सरसेनापती मारला गेला. सूर्य अस्ताला जावा तसे झाले होते. तो वैभवात राहीलेला आता मातीत पडलेला होता. त्याच्या इच्छेविरुद्ध तो मेला होता. त्याच्या तुटलेल्या मानेतून रक्ताच्या चिरकांड्या उडाल्या होत्या. त्या मृत शरीरातून एक तेजस्वी प्रकाश निघाला व तो थेट सूर्याकडे झेपावला. तो विलक्षण देखावा सगळे पहात होते. पांडव त्यांची वाद्ये शंखू वाजवून आनंद व्यक्त करू लागतात. अर्जुन व कृष्ण मोठे ओझे उतरले अशाप्रकारे श्वास सोडत असतात. पांडवांचे सैन्य आनंद घोष करू लागतात. तुतारी वाजवू लागतात. सोमकांचा आनंद गगनात मावत नव्हता. ते आपापले झेंडे फडकवत होते. कांहीं आनंदाने नाचत होते. एकमेकांना मिठ्या मारत होते. कर्ण मेला, कर्ण मेला, अशा घोषणा ते देत होते. सगळे लढवय्ये आपापली लढाई थांबवून त्याचे कलेवर

पहाण्यासाठी तेथे जमा होऊ लागतात. अर्जुनाने त्याला नाश ठरल्याप्रमाणे केला होता. ती भर दिवसाची वेळ होती जेव्हां कर्ण मारला गेला. कर्णाच्या देहाबाजूला त्याचा जीव घेणारा बाण, अंजलिकासुद्धा पडलेला होता. ते दृष्य पहाण्यासाठी दोनही बाजूचे सैनिक गर्दी करत होते. युद्ध संपले आहे असे सगळे एकमेकांना सांगत होते. त्याला मेलेला पाहून सल्य त्याचा सारथी, तो रथ घेऊन रणांगण सोडून जातो. कर्णाचा झेंडासुद्धा त्याच्या जवळ पडलेला होता.

कर्णाच्या वधानंतर कौरवांचा युद्धातील रस संपुष्टात आला असे वाटत होते. बहुतेक राजे आपापल्या फौजांना परत फिरण्याचे आवाहन करत असतात. कौरव हरले आहेत हे सिद्ध झाल्यासारखेच होते. अर्जुनाच्या चेहर्यावर एक विलक्षण तेज चमकत होते. कर्णाचे डोके असे पडलेले होते कीं तो मावळतीकडे पहात आहे. त्याचे डोळे उघडेच होते.

कर्ण पर्व भाग एक्याण्णवावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग ब्यांण्णवावा

संजय पुढे सांगतो, कर्ण व अर्जुनाच्या लढाईत अनेक योद्धे मारले गेले होते. सल्य तो रथ घेऊन निघून जातो. त्याचा राग अनावर होता. त्याचे सैन्य हत्ती घोडे व रथ ह्यांचा झालला नाश तो पहात होता, ते दुर्योधन पहात होता. त्याचे अश्रू थांबत नव्हते. त्याचा श्वास जोरांने होत होता. त्याला पुढचे चित्र स्पष्ट दिसत होते. त्यांचे योद्धे कर्णाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी जमा झालेले होते. त्याचे रक्ताने माखलेले शरीर ते पहात होते. ते पहाण्यासाठी दोनही बाजूचे जमलेले होते. कांहीं रडत होते तर कांही हसत होते. कांहींच्या चेहर्यावर भिती दिसत होती. कौरवांचे योद्धे युद्ध संपले असे धरून त्यांची चिलखतं, शस्त्रं तेथेच टाकून रणांगण सोडून जात असल्याचे दिसत होते. ते पाहून भिंम मोठ्यानो ओरडून बोलतो, उड्या मारून व दंड थोपटून तो त्याचा आनंद दाखवत असतो. तो सगळ्या धृतराष्ट्रांना आव्हान देत असतो. मित्र राजे दोनही बाजूचे आपापल्या फौजा हलवण्यास सुरूवात करत असतात. पांडवांचे त्यांचे झेंडे जोराजोराने फडकवत असतात. सोमक, पांचाल, श्रींजय आपापले झेंडे फडकवत असतात. रणवाद्ये जोराने वाजत असतात. कौरवांचे शांतपणे भित असल्यासारखे एकमेकांकडे पहात असतात. पांडव युद्ध जिकले हे बहुतेक सगळे मान्य करत असतात. तरी सल्य, दुर्योधनला भेटण्यासाठी त्या कर्णाच्या रथानेच जातो. केवळ कर्ण आणि अर्जुनाच्या लढाईत कितीतरी प्राणी मारले गेले त्याचा विचार दुर्योधन करत असतो. पांडव साक्षात यमाचे रुप घेऊन युद्धात आले होते असे वाटत होते. इतका संहार आधी कधी झाला असेल असें वाटत नाही असें ते विचार करत असतात. कर्णाने चांगली लढाई केली परंतु, दैव पांडवांच्या बाजूचे असल्याने त्याचे कांहींच चालले नाही. भाग्य त्याना मदत करत होते व कौरवांना विरोध करत होते हेंच खरे असे ते समजत असतात. बाकी कर्तृत्वात हिम्मतीत, धाडसात दोघे समसमान होते हे दिसत होते. मोठे मोठे योद्धे पांडवानी सहजपणे मारले होते त्याचे पटणारे कारण मिळत नव्हते. दैवापुढे कोणाचे

चालत नाही हेंच खरे.  सल्याचा ते विचार दुर्योधनाचे समाधान करण्यास पुरेसा नव्हता. त्याची बुद्धि बद्ध झाली होती.  कर्ण पर्व भाग ब्यांण्णवावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग त्र्याण्णवावा

धृतराष्ट्र विचारतात, "त्या दुर्दैवी दिवशी कौरव आणि श्रींजयांची काय स्थिती होती"? कर्ण व अर्जुनांच्या बाणांच्या भडिमारामुळे त्यांची मोठी हानि होत होती. ते पळत होते असे समजते.

संजय सांगतो, ऐका राजे, त्यावेळी हत्ती, घोडे व माणसे ह्यांचा कसा व किती संहार झाला ते सांगतो. कर्णाच्या वधानंतर पार्थ सिंहगर्जना करतो. त्यानंतर मोठी लढाई होते. कर्णाच्या मृत्यूनंतर तुमचे कोणीही योद्धे लढण्यासाठी उत्सूक नव्हते. त्यांचा एकमेव आधार अर्जुनाने नष्ट केला होता. शिडं फाटलेल्या जहाजासारखी त्यांची अवस्था झाली होती. त्या असहाय अशा तुमच्या सैन्याचा संहार पांडवांचे सैनिक करू लागतात. सव्यसाचीच्या मारामुळे बेजार झालेले ते गोंधळलेल्या अवस्थेत सैरावैरा पळत होते. त्यांच्या चेहर्यावर भिती स्पष्टपणे दिसत होती. त्यांना दिसत होते कीं, पार्थ अथवा भिम त्यांच्या मागे त्यांना मारण्यासाठी धावत आहे. त्यांचे घोडे, हत्तीसुद्धा तसे धावत होते. त्यात ते एकमेकांवर आदळून पडत होते. कित्येक रथ त्यात मोडून गेले होते. धावणार्यांना सगळीकडे पार्थ व भिमच दिसत होते. त्यामुळे त्यांची भिती जास्त वाढलेली होती. त्याचे सैन्य अशाप्रकारे पळत आहेत ते दुर्योधन पहात असतो. तो उसनं अवसान आणून बोलतो, "पार्थ माझा मुकाबला कधीच करू शकणार नाही. माझे घोडे सावकाशपणे त्या धावणार्या सैनिकांच्या मागे राहू देत. मी ह्या माझ्या सैनिकांच्या मागे राहून जर त्याच्यावर वार केले तर तो मला काहींच करू शकणार नाही. अर्जुन, कृष्ण व भिम ह्यांचा वध मलाच करावा लागेल. ते झाले कीं, सगळे सोपे होईल. ते ऐकल्यावर त्याचा सारथी त्यांचा रथ त्या पळणार्या सैनिकांच्या मांगे ठेवून चालवू लागतो. त्यानंतर साधारणपणे वीस हजार पायदळ लढण्याच्या तयारीने जाऊ लागते. त्यांच्या बरोबर हत्ती व घोडदळ सुद्धा तयार होते.

भिमसेव, धृष्टद्युम्न त्या तुमच्या फौजांना आव्हान देतात. भिमसेनाचा उत्साह फार मोठा होता. त्याच्या रथातून उतरून तो हातात गदा घेऊन युद्ध करत होता. त्यांने

कौरवांच्या सैनिकांचा नाश करण्यास सुरूवात केली होती. त्याची गदा यमाच्या सोट्यासारखी काम करत होती. तो पाच पन्नास सैनिकांना असेंच मारतो. त्यानंतर आणखीन योद्धे तो मारत जातो. त्याला धृष्टद्युम्नाची साथ होती. दुसरीकडे पार्थ कौरवांचे शिरकांड करत होता. मोठ्या उत्साहाने माद्रीचे नकूल व सहदेव तेंच काम करत होते. त्यांना कोणी तुमचा विरोध करत नव्हते. ते शकूनीचे सैनिक जास्त मारत होते. त्यात शकूनीला मारण्यासाठी ते प्रयत्न करत होते. शकूनीसुद्धा मोठ्या जोरांने त्यांच्याशी लढत होता. पांडवांचे योद्धे पाहून कौरवांचे योद्धे पळून जात होते. तशात पंचविस हजार तुमचे सेनिक भिम एकटा मारतो. त्याच्या बरोबर धृष्टद्युम्न असतो. त्या पळणार्या कौरवांच्या सैन्यामागे माद्रीचे दोन, सत्यकी, धृष्टद्युम्न धावत होते त्यांच्या रथातून. पळणार्यात गांधारचे सैनिक जास्त होते. चेकितन, शिखंडी, द्रौपदीचे पांच असे सगळे त्या पळणार्या तुमच्या सैनिकांना रणभूमीतून हाकलत होते जणू. ते होत असतांना तरीसुद्धा कांहीं कौरवांचे वीर लढण्यासाठी सज्ज उभे सव्यसाची पहातो व त्याचा त्याला फार राग येतो. सव्यसाची त्याचे गांडीव सावरून त्यांच्यावर चाल करतो. त्याचा बाणांचा भडिमार सुरू होतो. धावणारे सैनिक हवेत धुळ उडवत असतात त्यामुळे काय घडत आहे ते नेमके समजत नव्हते. सज्ज असलेले कुरु सैन्य पांगते त्या मारामुळे. ते पाहून दुर्योधन त्याची पलटण घेऊन तेथे निघतो. तो पांडवांना आव्हान देतो. पार्थावर बाणांचा मारा करू लागतो. ते पाहून पांडव एकत्रपणे त्याच्यावर चाल करतात. तुमचा मुलगा त्यांच्याशी लढत असतो. त्याचे मनोधैर्य मोठे होते. पराजय स्पष्टपणे दिसत असतांना तरीसुद्धा तो जोराने लढत होता. कौरवांच्यापैकी कोणालाही तसा उत्साह नव्हता. त्यांनी पराजय स्वीकारला होता. पांडवांच्या बाणांनी तुमचे सैनिक घायाळ होत होते. दुर्योधन त्याच्या लढणार्या सैनिकांना शाब्बासकी देत उत्तेजन देत होता. तो त्यांना सांगत असतो, "तुम्ही कोठेही गेलात तरी पांडव तुम्हाला पकडून ठार मारणार मग न पळता लढत लढत मरणे क्षत्रियाला शोभणारे काम तुम्ही करत रहा. असेंच मरण्यापेक्षा लढत मरणे क्षत्रियांसाठी जास्त योग्य आहे. पांडवांचे सैन्य तुलनेने आता कमी झालेले आहे, ते दोन कृष्ण सुद्धा घायाळ झालेले आहेत, म्हणून आपण लढत राहीले तर अजूनही यश आपलेच आहे. न लढता मरणे क्षत्रियाला शोभत नाही.

लढून मेलात तर स्वर्गात जाल. त्या भिमाला मारा, क्षत्रियाने पळून जाणे ह्यापेक्षा मोठे पाप नाही त्यासाठी. म्हणून पळून जाऊ नका, लढत रहा".

संजय सांगतो कीं, अशाप्रकारे तो त्याच्या योद्ध्याना लढण्यासाठी सांगत होता. ते तो बोलत असतांना तो स्वतः घायाळ झालेला लढत होता परंतु, त्याचे सैनिक मात्र त्याच्या बडबडीकडे दुर्लक्ष करत पळून जात होते.

कर्ण पर्व भाग त्र्याण्णवावा संपला.

# कर्ण पर्व
## भाग चौर्याण्णवावा

संजय पुढे सांगतो, सल्य पहातो कीं तुमचा मुलगा त्याच्या सैन्याची जमवाजमव करत आहे. त्याच्या चेहर्यावर भिती स्पष्ट दिसत होती. तो दुर्योधनाला बोलतो, "ते भयंकर रणांगण पहा, त्यात असंख्य प्राणी मारलेले दिसत आहेत. ते त्यांच्या रक्ताने माखलेले आहेत. कांहींच्या अंगात घुसलेले बाण दिसत आहेत. कांहीं अजून जीवंत आहेत ते कण्हत आहेत. त्यांच्या बाजूला मेलेले तुझे सैनिक त्यांच्या शस्त्रासह पडलेले दिसत आहेत. मोडलेल्या रथांचे ढीग पडलेले दिसत आहेत. त्यांच्या भोवती त्यांचे झेंडे व इतर सामान पडलेले दिसत आहे. कित्येकांची शरीर बाणांनी छिन्नभिन्न झालेली दिसत आहेत. त्यात कित्येक आपले व श्रींजयांचे आहेत. त्यांना जे बाण लागले आहेत ते कर्ण व पार्थाने मारलेले आहेत. सगळे रणांगण विविध प्रकारच्या शस्त्राने भरलेले दिसत आहे. त्या शस्त्रांने रक्त लागलेले दिसत आहे. त्या गदा, तलवारी, कुर्हाडी, भाले असे कितीतरी तेथे विखरून पडलेले दिसत आहे. कित्येकांचे मुकूट, शिरस्त्राणं पडलेली दिसत आहेत. गळ्यातील हार, इतर दागिने सुद्धा पडलेले आहेत. ते लोक त्यांचे मजेचे जीवन सोडून येथे तुझ्यासाठी मरावयाला आले आहेत. त्यांत त्यांचा कोणता फायदा होता ते समजत नाही. केवळ तुझ्यासाठी ते मेलेले आहेत. त्यांच्या मृत्यूला तू जबाबदार आहेस. आता त्यांना पुन्हा लढावयाला लावू नकोस, त्यांना त्यांच्या तंबूत जाऊन विश्रांती घेऊ दे. तो सूर्य उतरणीला लागलेला दिसत आहे. अरे राजा, ह्या विध्वंसाला तू कारणीभूत आहेस. एवढे बोलून तो दुःखी अंतःकरणाने गप्प होतो. दुर्योधन "कर्ण, कर्ण", असे सारखे बोलत रडत होता. ते पाहून अश्वत्थामा व इतर राजे त्याचे सांत्वन करण्यासाठी पुढे होतात. ते त्याला घेऊन त्यांच्या तळाकडे जात असताना मागे पुन्हा पुन्हा वळून पहात असतात पार्थाचा कपी असलेला झेंडा. कर्णाच्या जाण्याचे सगळ्यांना दुःख झालेले स्पष्ट दिसत होते. कर्णाचा मृत देह तेथेच पडलेला होता. स्वर्गातील ऋषी त्याचा तो निष्प्राण देह पहात होते. ज्यांनी त्यांचे द्वंद्व पाहिले ते त्याचा वर्णन करत होते. कर्णाच्या देहावरील कपडे फाटलेले होते तरी

त्यातूनसुद्धा तो देह तेजस्वी दिसत होता. त्याच्या मृत्यूतून कांहीं क्षत्रिय स्फुरण घेत होते. कर्णाचा अग्नी पार्थाने कायमचा विझवला होता. त्याच्या शौर्याची किर्ती ठेवून तो स्वर्गात गेला होता. कर्णाच्या सद्गुणांची तारिफ होत होती सर्वदूर. युद्धाला निघण्या आधी त्यांने त्याची अफाट संपत्ती ब्राह्मणांना दान केली होती. महिलांमध्ये तो फार प्रिय होता त्याच्या सत्वशिलतेमुळें. त्याच्या मृत्यूमुळे तो क्षत्रियांच्या अतिउच्च लोकांत गेला होता. त्याच्या मृत्यूमुळें सगळा निसर्ग जणू निस्तेज झाला होता. एक चांगला व महान इसम मेला होता. त्याच्या कृपेने कित्येकांचे जीवन बनले होते. त्याची सगळे आठवण करत होते. राक्षस व इतर निशाचर आनंदी झालेले दिसत होते.

अर्जुन त्याच्या कपी ध्वजाने व कृष्ण त्याच्या गरूड ध्वजाने त्या रणांगणात शोभत होते. आपला विजय साजरा करण्यासाठी ते त्यांचे शंखू काढतात व जोराने फुंकून त्यांचा आवाज काढतात. ते पाहून युधिष्ठीर आनंदी झालेला दिसत होता. त्याच्या शंखूचा आवाज सर्वदूर गेला तो ऐकल्यावर आज्ञाधारक सेवकाप्रमाणे सगळे कौरवांचे सैनिक रणभूमी सोडून जाऊ लागतात. त्यावेळी इतर प्रकारचे लोक अर्जुनाचे व कृष्णाचे कौतुक करत त्यांना अभिवादन देत असतात. त्या लोकांत ते तेजाने चमकत असतात. आपली शस्त्र व इतर सामान उतरवून ते त्यांच्या निवासस्थानी जातात. कर्णाच्या वधानंतर गंधर्व, चरण, ऋषी, यक्ष, नाग कृष्णाची व अर्जुनाची पुजा करतात. त्यांच्या यशाचे कौतुक करतात. त्यानंतर ते त्यांच्या मित्रमंडळींसह त्यांच्या निवासस्थानी आराम करण्यास जातात.

कर्ण पर्व भाग चौर्याण्णवावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग पंच्याण्णवावा

संजय पुढे सांगतो, कर्णाच्या वधानंतर कौरव दाहीदिशा निघून जातात. कौरवांच्या साठी लढणारे राजे आपापल्या फौजा युद्धातून काढण्याच्या गोष्टी करू लागतात. तुमचा मुलगा त्यांना समजू लागतो. कारण ह्यापुढे लढण्यात कांहीं अर्थ नव्हता ते तो सुद्धा समजतो. त्यानंतर ते सल्याचा सल्ला घेण्याचे ठरवतात. कृतवर्मन त्याचे नारायणी सैन्य घेऊन त्यांच्या तळीवर निघतो. शकूनी त्याच्या अजून जीवंत असलेल्या गांधार फौजा घेऊन कृपांकडे जातो. त्यांचे हत्तीदल त्याप्रमाणे त्यांच्या तळाकडे निघते. अश्वत्थामा सुद्धा त्याच्या तंबूकडे निघतो. शूशर्मन त्याचे संसप्तक सैनिक जे अजून खूप जास्त होते घेऊन त्याच्या तळाकडे जातो. दुर्योधन त्यांचे दुःख आवरू शकत नव्हता. सल्य त्याच्या तंबूकडे जातो. उरलेले योद्धे सुद्धा शरमेने खाली मान घालून आपापल्या ठिकाणी जातात. निघून जाणार्या सैनिकांपैकी कांहीं अर्जुनाची तारिफ करत असतात तर कांही कर्णाची करत असतात. तुमच्या कोणत्याही क्षत्रियाला आणखीन लढण्याची इच्छा उरलेली नव्हती. तुमचे सगळे जीवनाकडे नैराश्याने पहात होते. कसलीच उमेद त्याना उरलेली नव्हती.

रणभूमी शांत झालेली दिसत होती जरी अजून दिवस बाकी होता.

कर्ण पर्व भाग पंच्यांण्णवावा संपला.

# कर्ण पर्व

## भाग श्याण्णवावा

संजय पुढे सांगतो, कौरवांच्या फौजा निघून गेल्यावर कृष्ण अर्जुनाला मिठी मारतो. तो बोलतो प्राचीन काळी तू वृत्राचा वध केला होतास त्या काळातील अस्त्रांनी त्याप्रमाणे ह्यावेळी तू कर्णाचा बाणाने वध केला आहेस. ह्या दोन वधाच्या कथा लोक ऐकत रहातील पुढच्या युगात. आता आपण युधिष्ठीराला ती वार्ता सांगण्यासाठी गेले पाहिजे. अनेक वर्षाची इच्छा आता पूर्ण होत आहे. तू त्याला दिलेला शब्द आज पुरा केला आहेस. तुम्ही दोघे लढत असतांना धर्माचा मुलगा ते पहाण्यासाठी आला होता परंतु, तेथे होणार्या शरसंधानामुळें तो जबर जखमी झाला म्हणून तेथून निघून गेला. त्यानंतर ते सगळे पुन्हा त्या जागी जातात जेथे कर्ण विसावला होता. कृष्ण त्याच्या सैनिकांना आदेश देतो कीं, धृष्टद्युम्नाच्या देखरेखीखाली ते तेथेच पहारा देत असतील जोवर ते कर्णाचे अंत्यदर्शन घेऊन येत आहेत. त्यांच्या बरोबर माद्रीची मुलं. युयुत्सू, युयुधन कर्णाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी जातात. तेथे युधिष्ठीर कृष्णाला पुन्हा पुन्हा आलिगनं देत असतो. तेथे कृष्ण ते द्वंद्व कसे झाले त्याची सविस्तर माहिती देतो. त्या भयंकर युद्धात ते पांचही पांडव सुरक्षित आहेत ह्याचे त्याना विशेष वाटते. ते पहात असतांने ते एकमेकांना शुभेच्छा देत असतात. आपण युद्ध जिंकले आहे ह्याचा त्याना फार आनंद होत असतो. ह्या युद्धात पृथ्वी पुष्कळ रक्त प्याली आहे असे ते सांगतात.

कर्णाचा देह तेथे शांतपणे पडलेला होता. त्याचे तुटलेले शिर कोणीतरी त्याच्या मानेला लावून ठेवले होते. त्याचे डोळे उघडे होते. त्या भोवती असंख्य दिवे लावलेले होते ज्यात सुगंधी तेलाच्या वाती ला्वलेल्या होत्या. त्याचे शरीर बाणाने भरलेले दिसत होते. ते तसेंच ठेवलेले होते कारण, त्यात क्षत्रियांचे भूषण मानले जात होते. कृष्ण बोलतो युधिष्ठीराला. "आता तुझे शत्रू संपले आहेत. आता तुला कोणी त्रास देणारा नाही. तू सुखाने सुराज्य स्थापन करू शकशिल".

संजय पुढे सांगतो, युधिष्ठीर कृष्णाचा हात हातात घेऊन बोलतो, "नारदानी मला पूर्वीच सांगितले आहे की, तू व अर्जुन प्राचीन कालचे ऋषी नर व नारायण अहात.

तुमचे कार्य जगात चांगुलपणा वाढवण्याचे असते. जे त्याच्या विरुद्ध जातात त्यांचा नाश तुम्ही दोघे करता असें ते मला सांगत होते. तुम्हाला सदैव यश मिळणार असे ब्रह्मदेवाने सांगितले आहे, त्याप्रमाणे हे होत आहे. पुढे तो बोलतो, "आता मी पृथ्वीचा राजा झालो आहे. तुमच्या मदतीने ते शक्य झाले आहे. म्हणून ते राज्यसुद्धा तुमचेच आहे. तेरा वर्ष आपण कशी काढली आपल्याला ठाऊक. आता बरे दिवस येतील असे दिसते कारण, आता आपल्याला कोणी शत्रू उरलेला नाही. आज मी शांतपणे झोपणार आहे".

संजय पुढे सांगतो, कर्णाला व त्याच्या मुलाला मेलेले पाहून युधिष्ठीराला त्याचा नवीन जन्म झाला आहे असेच वाटत असते. त्यानंतर सगळे इतर मित्र युधिष्ठीराला भेटून त्याला अभिवादन करत असतात. आनंदाचे वातावरण झाले होते. त्यात नकूल, सहदेव, धृष्टद्युम्न, सत्यकी. शिखंडी, पांचालांचे अनेक योद्धे श्रींजयांचे, सोमकांचे त्यात होते. युद्ध विश्राम झाला आहे ह्याचे वेगळे सुख त्यांच्या मुखावर दिसत होते. सगळे गप्पा मारण्याच्या मनस्थितीत होते. भाट आले होते व ते सगळ्या पांडवाच्या शौर्याच्या कथा गाऊन सांगत होते. सुमधून संगीत वाजत होते. उत्तम खाण्या पिण्याची व्यवस्था होती त्याचा आस्वाद ते घेत होते. आता दुःखाचे दिवस संपले असे ते एकमेकांना सांगत होते.

वैशंपायन पुढे सांगतात जनमेजयाला, कौरवांचा पिता ते वृत्त ऐकून त्याच्या आसना वरून खाली पडतो. तो बोहोष झाला होता. ते ऐकल्यावर गांधारी सुद्धा कोसळते. वातात गेल्यासारखी ती कर्णाच्या मृत्यूबाबत बोलत असते. घरातील बायका तिला सावरतात. तेथे विदूर व संजय धृतराष्ट्राला सांभाळतात. धृतराष्ट्राला त्याचे भवितव्य स्पष्ट दिसत असते. परंतु, तो आता पुन्हा बेशुद्ध होत नाही. त्या युद्धाच्या रुपाने एक मोठा यज्ञ झाला होता ज्यात असंख्य आहुत्या दिल्या गेल्या होत्या. ज्ञानी सांगतात, विष्णू हांच यज्ञ आहे. त्याप्रमाणे अग्नी, सोम, वायू, सुर्य त्याचे साथीदार आहेत. म्हणून जर कोणी शुद्ध मनाने हे पर्व वाचनात ठविल अथवा श्रवण करील त्याला पुण्य प्राप्त होईल. त्याना संपत्ती, वैभव, प्रसिद्धी प्राप्त होईल. त्यामुळे भव आणि विष्णू दोघे त्याच्यावर संतुष्ट होतील. जे ब्राह्मण ही संहिता वाचतील ते वेद वाचल्याचे पुण्य

मिळवतील. व्यासाने ते लिहीले आहे ते कधीही खोटे होणार नाही. कर्ण पर्वाचे वाचन केल्याने मोठे पुण्य प्राप्त होते.

**– कर्ण पर्व संपले -**

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चानें शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

# ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

**विशेष सुचना** - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा. तुमच्या मित्रांनासुद्धा ती द्या.

http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.
esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद